मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर, विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

**वितरण**
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | बुधवार, १३ ऑगस्ट २०२५ | वर्ष: १ | अंक:७४ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३


## १६ ऑगस्टपासून फास्टॅगचा वार्षिक पास

**नवी दिल्ली, दि. १२ वृत्तसंस्था**

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण ने वाहनचालकांसाठी FASTag वार्षिक पास सुविधा सुरू करण्याचा निर्णय घेतला असून, ही सुविधा १५ ऑगस्टपासून लागू होणार आहे. या उपक्रमामुळे वाहनचालकांना वारंवार टोलसाठी फास्टॅग रिचार्ज करण्याची गरज भासणार नाही. यामुळे वेळेची बचत, खर्चात घट, आणि टोल प्लाझांवरील गर्दी कमी होण्यास मदत होणार आहे. फास्टॅगच्या नियमांमध्ये बदल करत खासगी कार, जीप, व्हॅनसारख्या खासगी गाड्यांसाठी वार्षिक पास देण्याचा निर्णय घेतला आहे. सध्याच्या परिस्थितीत टोल नाक्यावर वाहनाच्या वजनानुसार वेगवेगळं शुल्क घेतलं जातं. त्यानुसार आता २०० टोल क्रॉस करण्यासाठी जवळपास १०००० रुपये लागू शकतात. पण आता एक टोल क्रॉस करण्यासाठी १५ रुपये शुल्क आकारलं जाईल. त्यामुळे केवळ ३००० रुपयांमध्ये काम होईल.

# 15 हजार पोलीसपदे भरण्याचा महाराष्ट्र सरकारचा निर्णय

**मुंबई, दि. १२ प्रतिनिधी**

**महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाने आज महत्त्वाचा निर्णय घेत पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या राज्यातील हजारो युवकांना दिलासा दिला आहे. पोलीस भरतीची वाट पाहणाऱ्या हजारो युवकांसाठी आनंदाची बातमी राज्य सरकारने दिली आहे. आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत पोलीस दलातील तब्बल १५ हजार पदे भरण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.**

आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत चार मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. महाराष्ट्र डीजीआयपीआर या एक्स हँडलवरून या निर्णयाची माहिती देण्यात आली आहे.

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १३,५६० पोलिसांची रिक्त पदे भरण्याची घोषणा केली होती. त्यापूर्वी जून महिन्यात पोलीस महासंचालकांनी सुमारे १० हजार पोलिसांची भरती करण्याचे आणि १५ सप्टेंबरला मैदानी चाचणी होणार असल्याचे सांगितले होते. मात्र, त्यानंतरही पोलीस भरतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली नव्हती. त्यामुळे विद्यार्थी समन्वय समितीने काही दिवसांपूर्वी नाराजी व्यक्त केली होती. सप्टेंबरपूर्वी शासन निर्णय, अर्ज भरणे, अर्ज छाननी आणि परीक्षा घेणे अशक्य आहे, अशी मागणी विद्यार्थी समन्वय समितीने मागच्याच आठवड्यात केली होती.



### मंत्रिमंडळाने घेतलेले चार महत्त्वाचे निर्णय

- महाराष्ट्र पोलीस दलात सुमारे १५ जार पोलीस भरतीस मंजुरी
- राज्यातील रास्त भाव दुकानदारांच्या मार्जिनमध्ये वाढ. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्य वितरण.
- सोलापूर-पुणे-मुंबई हवाई प्रवासाकरिता Viability Gap Funding निधी देण्याचा निर्णय.
- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अखत्यारीत महामंडळांमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कर्ज योजनेतील जामीनदाराच्या अटी शिथिल. शासन हमीस पाच वर्षासाठी मुदतवाढ.

### एकनाथ शिंदे, भरत गोगावलेंच्या अनुपस्थितीची चर्चा

आजच्या मंत्रिमंडळ बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे अनुपस्थित असल्याची चर्चा आहे. जम्मू-काश्मीरचा दौरा आटोपून ते आजच्या बैठकीला हजर राहणार होते. मात्र त्यांचा मुक्काम लांबल्यामुळे ते अनुपस्थित राहिले. तसेच रायगड आणि नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदावरून असलेल्या नाराजीचेही पडसाद आजच्या बैठकीत दिसले. शिवसेनेचे (शिंदे) रायगडचे नेते मंत्री भरत गोगावले हेदेखील बैठकीला गैरहजर राहिल्याचे म्हटले जात आहे.

## अग्रलेख
## खरीखरी
### १५ हजारांनी काय होणार?

महाराष्ट्र सरकारने पोलीस दलामध्ये १५ हजारांची पोलीस भरती करणार असे जाहीर केलेले आहे ही अत्यंत आनंदाची बाब आहे. परंतु संपूर्ण पोलीस खात्यात ही भरती अत्यंत कमी पडेल असे नमूद करावेसे वाटते कारण सध्या १५००० पोलीस केवळ वाहतूक विभागाच्या विभागासाठीही कमी पडतील अशी परिस्थिती आहे. आपल्या राज्यातील पोलीस दलाला इतर अनेक आघाड्यांवर काम करावे लागते, राज्यातील वाहतुकीचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. गुन्हेगारी वेगाने वाढत आहे, अगदी किडे, मकोडे किंवा मुंग्या मारल्यासारखे खून पडत आहेत. पोलिसांची जबाबदारी आहे हे मान्य आहे. मात्र त्याच पोलिसांना जबाबदारीची इतकी कामे आहेत की त्यासाठी १५००० पोलीस म्हणजे मुंबई शेजारच्या अरबी समुद्रामध्ये १०० ग्रॅम खसखस टाकण्यासारखे आहे. आपल्या राज्यामध्ये लोकसंख्या ज्या प्रमाणात वाढलेली आहे त्या प्रमाणात पोलिसांची भरती करण्यात आलेली नाही. इतर सरकारी कामासाठी ठेकेदारांकडून करारावर माणसे आणता येतात. मात्र पोलीस खाते हा एकमेव विभाग असा आहे की 'तिथे पाहिजे जातीचे, येऱ्या गबाळ्याचे काम नोहे' अशी परिस्थिती आहे. राज्यातील प्रत्येक जिल्हा आणि तालुक्यामध्ये वाहतूक शाखा आहे. तिथेही वाहतुकीचे अनेक प्रश्न आहेत म्हणजेच आजकाल सर्वाधिक मोठी समस्या कोणती असेल तर ती वाहतुकीची आहे. याशिवाय आपल्या राज्यातील वाहन चालवणाऱ्या लोकांची मानसिकता अशी काही झालेली आहे की, शिस्त पाळणे म्हणजे आपली बदनामी आहे, अपमान आहे किंवा बरबादी आहे असेच प्रत्येकाला वाटते. आम्ही वाहतूक विभागाचा खास उल्लेख यासाठीच केला आहे की या विभागावर फारच मोठी जबाबदारी आहे. वाहतूक शाखेमध्ये काम करणाऱ्या पोलिसांना सातत्याने उभे राहून काम करावे लागते. तरीही कोणत्याही शहरात गेल्यावर महाराष्ट्रातील वाहतूक विभागाच्या सेवेमध्ये जे पोलीस आहेत त्यांचे काम वाहतूक शिस्त कशी राहील. हे पाहण्याचे आहे पण त्या पलीकडे वाहन चालक आणि म्हणजे जनतेने चुका कराव्यात आणि आपण त्याचे फोटो काढून सरकारच्या कमाईत भर टाकावी हेच आहे काय. मोठ्या शहरात हे प्रमाण बरेच मोठे आहे, यातील म्हणजे वाहतूक विभागातील शिपायांना सतत उभे राहून काम करावे लागते, थोडेसे अपवाद वगळले तर मोठ्या प्रमाणावर वाहतूक पोलीस आपले काम पार पडतातच. त्यातच सध्या अपराधाचे प्रमाण प्रचंड वाढलेले आहे दररोज मारामाऱ्या करणे आणि समाज विघातक कामे करणे हाच काय तो गुंडांचा धंदा झालेला आहे. क्राइम ब्रांच हा पोलीस विभागाचा महत्त्वाचा भाग नेहमीच राहिलेला आहे पण सध्या पोलीस इतके कमी आहेत की त्यांनी अपराध्यांच्या शोधापेक्षा घरी राहणेच पसंत केलेले दिसते. सरकारने पंधरा हजार पोलिसांची भरती करणे म्हणजे उंटाच्या तोंडात दहा ते पाच ग्रॅम अन्न टाकण्यासारखे आहे आणि आता तर सायबर गुन्ह्यांचे प्रमाण इतके वाढलेले आहे. या विभागातही फसवणुकीचे प्रचंड मोठ्या प्रमाणात प्रकार घडत आहेत, त्याबद्दल बोलता येण्याची सोय नाही. ते काहीही असले तरी १५००० पोलिसांची भरती केल्यावर ही समस्या सुटेल असे वाटत नाही. सरकारने किमान एक लाख पोलिसांना पोलीस दलात भरती केल्याशिवाय पर्याय किंवा गुन्हे कमी करण्यासाठी तरणोपाय दिसत नाही.


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


## राज ठाकरे सध्या तरी आमच्या आघाडीत नाहीत- चैनिथल्ला

**पुणे,दि. १२ प्रतिनिधी**

महाराष्ट्रात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू असून विविध राजकीय पक्षांनी तयारी देखील सुरू केली आहे. त्याच पार्श्वभूमीवर आज काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि महाराष्ट्र प्रभारी रमेश चैनिथला यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदेश काँग्रेस पदाधिकारी कार्यशाळेचा समारोप होत आहे. या कार्यशाळेत बोलताना चैनिथला यांनी राज्यातील निवडणुकांबाबत बोलताना मोठं वक्तव्य केलं आहे. आघाडीबाबत आम्ही बसून चर्चा करून निर्णय घेऊ, दोन भाऊ एकत्र येत असतील तर आम्हाला काय अडचण नाही. मात्र, राज ठाकरे सध्या तरी आमच्या आघाडीत नाहीत, असे रमेश चैनिथला यांनी म्हटलं.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, सतेज पाटील, अमित देशमुख, नसीम खान, विश्वजित कदम, यशोमती ठाकूर यांच्या उपस्थितीत ही कार्यशाळा संपन्न झाली. तर, पृथ्वीराज चव्हाण आणि नाना पटोले यांनी दोन दिवसीय कार्यशाळेला दांडी मारल्याचं दिसून आलं. या कार्यशाळेत पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना चैनिथला यांनी आगामी निवडणुकांच्या अनुषंगानेही संकेत दिले आहेत.

आगामी निवडणुकीत आघाडी होऊ शकते किंवा होऊ ही शकणार नाही, असे रमेश चैनिथला यांनी म्हटल्याने महाविकास आघाडीच्या भवितव्यावर मोठं वक्तव्य केल्याचं दिसून येत आहे. आघाडीबाबत आम्ही बसून चर्चा करून निर्णय घेऊ, दोन भाऊ एकत्र येत असतील तर आम्हाला काय अडचण नाही. मात्र, राज ठाकरे सध्या तरी आमच्या आघाडीत नाहीत, असे रमेश चैनिथला यांनी म्हटलं. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही कार्यशाळा आहे. जोपर्यंत मोदी राहतील तोपर्यंत देशात स्वातंत्र राहणार नाही. विधानसभा निवडणुकांबाबत सगळ्यात पहिले महाराष्ट्र राज्याने आवाज उठवला होता, मतांची चोरी होत आहे. मतांच्या यादीत घोळ करून महाराष्ट्र आणि हरियाणामधील सत्ता भाजपने घेतली. मतदार याद्यात घोळ केला, त्यामुळे जोपर्यंत मोदी शाह आहेत तोवर देशात मोकळ्या भीतीमुक्त निवडणुका होणार नाहीत, असे चैनिथला यांनी म्हटले.

## आधार कार्ड नागरिकत्वाचा अंतिम पुरावा म्हणून स्वीकारता येणार नाही - सुप्रीम कोर्ट

**नवी दिल्ली, दि. १२ वृत्तसंस्था**

बिहारमधील मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमावरून निर्माण झालेल्या वादावर सर्वोच्च न्यायालयाने एक महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले आहे. 'आधार कार्ड हे नागरिकत्वाचा अंतिम पुरावा म्हणून स्वीकारले जाऊ शकत नाही आणि त्याची सखोल पडताळणी करणे अत्यावश्यक आहे,' असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी राबवण्यात येत असलेल्या या प्रक्रियेतील त्रुटींवर बोट ठेवणाऱ्या याचिकेवर सुनावणीदरम्यान न्यायालयाने हे मत व्यक्त केले.

मंगळवारी झालेल्या सुनावणीत न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी निवडणूक आयोगाच्या भूमिकेचे समर्थन करत म्हटले की, 'आधार कार्डला अंतिम पुरावा मानता येणार नाही, या निवडणूक आयोगाच्या मताशी आम्ही सहमत आहोत. त्याची पडताळणी होणे आवश्यक आहे.' या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल



यांनी जोरदार युक्तिवाद केला.

सिब्बल यांनी निदर्शनास आणून दिले की, '१९५० नंतर भारतात जन्मलेली प्रत्येक व्यक्ती देशाची नागरिक आहे, मात्र सध्याच्या प्रक्रियेत गंभीर त्रुटी आहेत.' उदाहरण देताना ते म्हणाले, 'एका लहान विधानसभा मतदारसंघात १२ जिवंत व्यक्तींना मृत घोषित करण्यात आले, तर बूथ लेव्हल ऑफिसरने कोणतेही काम केलेले नाही.' ज्येष्ठ विधिज्ञ गोपाल एस. यांनी सांगितले की, 'सुमारे ६५ लाख नावे यादीतून वगळण्यात आली आहेत, जे एक प्रकारे सामूहिक वगळण्याचे षडयंत्र आहे.' निवडणूक आयोगाची बाजू मांडताना ज्येष्ठ विधिज्ञ राकेश द्विवेदी यांनी सांगितले की, 'ही केवळ एक प्रारूप यादी आहे. एवढ्या मोठ्या प्रक्रियेत किरकोळ चुका होण्याची शक्यता नाकारता येत नाही,' मात्र, जिवंत व्यक्तींना मृत दाखवल्याचा आरोप त्यांनी फेटाळला.

न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी विचारले, 'फॉर्ममध्ये सर्व कागदपत्रे अनिवार्य आहेत, असे कुठे नमूद केले आहे?' त्यांनी पुढे म्हटले की, 'बिहार हा आपल्या भारताचाच एक अविभाज्य भाग आहे. त्यामुळे, जर बिहारमधील नागरिकांकडे आवश्यक कागदपत्रे नसतील, तर अशीच परिस्थिती देशातील इतर राज्यांमध्येही असू शकते. ही समस्या फक्त बिहारपुरती मर्यादित नाही. ओळख पटवण्यासाठी अनेक प्रकारचे दस्तऐवज स्वीकारले जातात. यात केंद्र सरकारी कर्मचाऱ्याचे ओळखपत्र, एलआयसी ने जारी केलेले कागदपत्र, असे अनेक पर्याय उपलब्ध आहेत.

यावर सिब्बल यांनी आकडेवारी सादर करत म्हटले की, 'बिहारमध्ये केवळ ३.०५% लोकांकडे जन्म प्रमाणपत्र, २.७% लोकांकडे पासपोर्ट आणि १४.७१% लोकांकडे मॅट्रिकचे प्रमाणपत्र आहे.'

ज्येष्ठ विधिज्ञ प्रशांत भूषण यांनी एक धक्कादायक बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणली. ते म्हणाले, 'बूथ लेव्हल ऑफिसरने (BLO) अनेक मतदारांच्या नावापुढे 'शिफारस केली/ शिफारस केली नाही' असा शेरा दिला आहे. आम्हाला दोन जिल्ह्यांची यादी मिळाली असून, त्यानुसार अर्ज भरलेल्यांपैकी १०-१२% मतदारांच्या नावाची शिफारस केलेली नाही. हे कोणत्या आधारावर केले जात आहे? देशाच्या इतिहासात निवडणूक आयोगाने असे कधीही केलेले नाही.'

सरतेशेवटी, न्यायालयाने याचिकाकर्त्यांच्या त्या दाव्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले, ज्यात कोट्यवधी लोकांची नावे वगळली जाण्याची भीती व्यक्त करण्यात आली होती. न्यायमूर्ती सूर्यकांत म्हणाले, 'जर ७.९ कोटी मतदारांपैकी ७.२४ कोटी मतदारांनी प्रतिसाद दिला असेल, तर एक कोटी मतदार वगळले जाण्याची शक्यता कशी असू शकते?' या प्रकरणाची पुढील सुनावणी सुरू राहणार असून, न्यायालयाच्या अंतिम निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## नाशिक महानगरपालिकेत महाजनांनी दिला १०० पारचा नारा

**नाशिक, दि. ११ प्रतिनिधी**

आगामी महानगरपालिकांच्या निवडणुकांच्या दृष्टीने सर्वच राजकीय पक्षांनी तारीला सुरुवात केली आहे. नाशिक महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने महायुतीकडून संघटनात्मक बांधणीवर भर दिला जातोय. भाजपने १०० पारचा नारा दिला आहे तर, शिवसेना शिंदेंच्या शिवसेनेतील इच्छुकांमध्येही संभ्रम अवस्था आहे.



नाशिक महानगरपालिकेमध्ये एकूण १२२ जागा आहेत. नाशिक महानगरपालिकेवर महायुतीचा झेंडा फडकवला जाणार अशा निर्धार महायुतीने केला आहे. मात्र भाजप आणि शिंदे यांच्या शिवसेनेतील सुरु असलेली इन्कमिंग आणि इच्छुकांची वाढती संख्या बघता दोन्ही पक्षाकडून स्थानिक पातळीवर स्वतंत्र लढण्याची तयारी केली जात आहे. मंत्री गिरीश महाजन यांनी देखील नाशिक महानगरपालिकेत १०० पारचा नारा दिला आहे. त्यामुळे शिंदे यांच्या शिवसेनेतील इच्छुकांमध्ये मात्र संभ्रम अवस्था आहे.

### प्रत्येक पक्षाला आपला पक्ष वाढवण्याचा अधिकार : दादा भुसे

भाजप आणि शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते नाशिकमधील आढावा बैठकांवर जोर देताना पाहायला मिळत आहेत. मंत्री दादा भुसे यांनी देखील भाजपने 100 पारचा नारा दिला असेल तर प्रत्येक पक्षाला देखील आपल्या पक्ष वाढवण्याचा अधिकार आहे असं म्हणत आगामी निवडणुकीत आम्ही देखील स्वबळाची तयारी करत असल्याचं म्हटलं आहे.

### युतीचा निर्णय वरिष्ठांवर सोडावा

निवडणुका स्वबळावर लढायच्या की स्वतंत्र लढायच्या हा सर्व निर्णय वरिष्ठ पातळीवर दोन्ही पक्षाच्या नेत्यांकडून घेतला जाईल. मात्र, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इच्छुकांनी असे कोणतेही बेताल वक्तव्य करु नये, युतीमध्ये मिठाचा खडा टाकू नये. शिंदेंच्या नेत्यांकडून देखील संयमाची भूमिका घेत युतीचा निर्णय वरिष्ठांवर सोडावा असा सल्ला भाजपचे प्रवक्ते अजित चव्हाण यांनी शिंदे यांच्या शिवसेनेला दिला आहे

## नॉनव्हेज विक्रीचा वाद पेटला
## १५ ऑगस्टला केएफसी, मॅक्डोनाल्ड्स बंद ठेवणार का? - राजू पाटील

**कल्याण, दि. १२ प्रतिनिधी**

'१५ ऑगस्ट देशाचा स्वातंत्र्य दिवस आणि त्याच दिवशी श्रीकृष्ण जयंती पण आहे, त्यात श्रावण ! अर्थातच बहुसंख्य लोक त्यादिवशी शाकाहार करणे पसंत करतील. परंतु काहीतरी निमित्त काढून जर कल्याण-डोंबिवलीचे आयुक्त त्या दिवशी मटण व मच्छी विक्री वर बंदी आणण्याचा फतवा काढत असतील तर त्याला विरोध तर होणारच', असं मनसे नेते राजू पाटील यांनी म्हटलंय. पुढे त्यांनी असंही म्हटलंय की, १५ ऑगस्टला मांसाहारी हॉटेल्स, केएफसी, मॅक्डोनाल्ड्स सारखे उपाहारगृह बंद ठेवणार आहात का? असा सवाल राजू पाटील यांनी केलाय. त्यांनी एक ट्वीट करत स्वातंत्र्य दिनानिमित्त चिकन आणि मटण विक्रीवर बंदी घालणाऱ्या कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या या अजब निर्णयावर भाष्य केले आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्राला लागूनच असलेला ठाणे, उल्हासनगर, नवीमुंबई महानगरपालिका व जि.प. क्षेत्रात असा कुठलाच फतवा काढला नसताना आमच्या आयुक्तांना ही उपरती का झाली हे अनाकलनीय आहे, असल्याचेही म्हणत राजू पाटलांनी टोला लगावला आहे.

## गणेशोत्सवात मुंबईला जायचे आणि दंगल घडवायची हाच जरांगेंचा प्रोग्राम; लक्ष्मण हाकेंचा खळबळजनक आरोप

**बीड, दि. १२ प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील २९ ऑगस्ट रोजी मराठा समाजासोबत मुंबईकडे कूच करणार आहेत. यावरूनच ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी जरांगे पाटलांवर टीका केली. बीड शहर जरांगे पाटील यांनी जाळलं. त्याच गोष्टी त्यांना मुंबईमध्ये करायच्या आहेत. जरांगे पाटील यांनी जी तारीख निवडली ती गणेशोत्सवाची आहे. याच दरम्यान गणेशोत्सवात मुंबईला जायचं आणि दंगल घडवून आणायची हा एकमेव प्रोग्राम जरांगे पाटील यांचा असल्याचा खळबळजनक आरोप लक्ष्मण हाके यांनी केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती करत जरांगे पाटील यांना अंतरवालीतच उपोषण करू द्या. पण महाराष्ट्रात सणासुदीचे वातावरण जाळपोळ करण्याचा डाव जरांगे पाटील यांना करायचा तो प्रयत्न रोखावा, अशी मागणी देखील हाके यांनी केली. पश्चिम महाराष्ट्राच्या दौऱ्यानंतर लक्ष्मण हाके हे मराठवाड्याच्या दौऱ्यावर आले आहेत. यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर निशाणा साधलाय.

महाराष्ट्रातील वातावरण बिघडवायचे हा एकमेव कार्यक्रम शरद पवार आणि जरांगे पाटील यांचा आहे. जरांगेच्या झुंडशाहीला



बळी पडून प्रशासनाने वेगळा निर्णय घेतला तर त्याला ओबीसी समाज प्रत्युत्तर देईल, असा इशारा देखील लक्ष्मण हाके यांनी दिला आहे. मंडल आयोगाचे जनक शरद पवार ही शुद्ध भामटेगिरी असून ओबीसींना वेड्यात आणि मुर्खात काढण्याचा प्रयत्न शरद पवार पक्षाचा असल्याची टीका देखील त्यांनी केली आहे.

लक्ष्मण हाके पुढे म्हणाले की, मनोज जरांगेंची भाषा चिथावणीखोर आहे. त्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करून तुरुंगात डांबलं पाहिजे. बेकायदेशीर मागणी करत असताना त्यांचे लाड का केले जातात? असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला आहे. तर जरांगे पाटील यांनी थोडासा अभ्यास करून हिंदी विषयाचे अवलोकन करावे, असा सल्ला देखील लक्ष्मण हाके यांनी यावेळी दिला आहे. आता लक्ष्मण हाके यांच्या आरोपांवर मनोज जरांगे काय प्रत्युत्तर देणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.


www.pmfby.gov.in

## प्रधानमंत्री पीक विमा योजना
UIN: IRDAN126RP0001V01201617

(भारत सरकार व महाराष्ट्र शासनाची योजना, एआयसी द्वारा लागू)

फसल बीमा कराओ सुरक्षा कवच पाओ

खरीप 2025

विविध नैसर्गिक आपत्तींमुळे नुकसानीपासून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्याच्या दृष्टिकोनातून राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. **खरीप हंगाम विमा योजनेतील पिके:** भात (धान), खरीप ज्वारी, बाजरी, नाचणी (रागी), मका, तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग, तीळ, कारळे, कापूस व कांदा या अधिसूचित पिकांसाठी, अधिसूचित क्षेत्रातील शेतकऱ्यांना भाग घेता येईल.



**महत्त्वाच्या बाबी**

- अंतिम मुदत: १४ ऑगस्ट २०२५
- योजनेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याचा ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक आणि ई पीक पाहणी बंधनकारक आहे.
- अधिसूचित क्षेत्रात अधिसूचित पिके घेणारे सर्व शेतकरी या योजनेत भाग घेऊ शकतात.
- कर्जदार आणि बिगर कर्जदार शेतकऱ्यांना योजनेतील सहभाग ऐच्छिक आहे.
- ई पीक पाहणी व विमा घेतलेले पीक यात तफावत आढळल्यास विमा अर्ज रद्द होईल व भरलेला विमा हप्ता जप्त होईल.
- विमा अर्ज भरण्यासाठी प्रति शेतकरी सीएससी विभागास रुपये ४० मानधन केंद्र शासनाने निर्धारित करून दिले आहे. ते संबंधित विमा कंपनी मार्फत सीएससी विभागात दिले जाते त्यामुळे शेतकऱ्यांनी त्यांचा विमा हप्ता व्यतिरिक्त इतर शुल्क सीएससी चालक यांना देऊ नये.
- एखाद्या अर्जदाराने बोगस किंवा फसवणूक करून विमा योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना पुढील किमान पाच वर्ष काळ्या यादीत टाकून शासनाच्या कोणत्याही योजनेचा लाभ मिळणार नाही.
- मंजूर नुकसान भरपाई अर्जदार यांचे आधार संलग्न बँक खात्यात थेट केंद्र शासन पोर्टलवरून जमा करण्यात येणार आहे.
- सर्व पिकांसाठी जोखीम स्तर ७० टक्के.

**उंबरठा उत्पादन**

अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांचे उंबरठा उत्पादन हे मागील सात वर्षातील सर्वाधिक उत्पादनाची पाच वर्षांच्या सरासरी उत्पादन गुणिले त्या पिकाचा जोखीम स्तर विचारात घेऊन निश्चित केला जातो.

**विमा संरक्षणाच्या बाबी:**

पीक पेरणी पासून काढणी पर्यंतच्या कालावधीत विविध नैसर्गिक घटक कीड व रोगांचा प्रादुर्भाव इत्यादी कारणांमुळे पीक कापणी प्रयोगाद्वारे येणारे सरासरी उत्पादन हे त्या महसूल मंडळासाठीच्या उंबरठा उत्पादनापेक्षा कमी आल्यास त्या महसूल मंडळामधील त्या पिकाचा विमा घेतलेल्या सर्व शेतकऱ्यांना समप्रमाणात नुकसान भरपाई मिळणार आहे.

**विमा योजनेत सहभागी होण्याकरिता शेतकऱ्याने काय करावे?**

अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी पीक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यास या विमा योजनेत सहभाग बंधनकारक नाही. त्यासाठी शेतकऱ्याने विमा योजना भाग घेण्याच्या अंतिम दिनांक आधी किमान सात दिवस आधी संबंधित बँकेस विमा हप्ता न भरणे बाबत लेखी कळवणे गरजेचे आहे.

बिगर कर्जदार शेतकऱ्याने आपला ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक, ७/१२ चा उतारा, बँक पासबुक, आधार कार्ड आणि पीक पेरणीचे स्वयंघोषणापत्र घेऊन प्राधिकृत बँकेत विमा अर्ज देऊन व हप्ता भरून सहभाग घ्यावा. याशिवाय कॉमन सर्विस सेंटर (सीएससी) च्या मदतीने आपण विमा योजनेत सहभाग घेऊ शकता किंवा www.pmfby.gov.in या पोर्टलचे सहाय्य घेऊ शकता. भाग घेतलेल्या शेतकऱ्याने नंतर ई पीक पाहणी नोंद पूर्ण करावी

योजनेच्या माहितीसाठी संपर्क पीक विमा योजनेच्या अधिक माहितीसाठी किंवा नुकसान भरपाई माहितीसाठी केंद्र शासनाचे कृषी रक्षक पोर्टल हेल्पलाइन १४४४७ वर संपर्क करावा, किंवा संबंधित विमा कंपनी प्रतिनिधि, स्थानिक कृषी विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा



**जिल्हे**
अहिल्यानगर, नाशिक, चंद्रपूर, सोलापूर, जळगाव, सातारा, वाशिम, बुलढाणा, सांगली, नंदुरबार, परभणी, वर्धा, नागपूर, नांदेड, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, हिंगोली, अकोला, धुळे, पुणे, जालना, गोंदिया, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, भंडारा, पालघर, रायगड, यवतमाळ, अमरावती, गडचिरोली

**विमा कंपनी**
एग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड

अधिक माहितीसाठी QR Code स्कॅन करावा.

HO/25-26/1A/16

AIC | भारतीय कृषी बीमा कंपनी® | AGRICULTURE INSURANCE COMPANY OF INDIA LTD
मुंबई क्षेत्रीय कार्यालयः "लोक चेंबर्स", मरोळ मरोशी रोड, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००५९ | मुख्य कार्यालयः प्लेट B & C, ५ वा मजला, ऑफिस ब्लॉक १, ईस्ट किडवाई नगर, नवी दिल्ली-११००२३
ईमेलः pikvima@aicofindia.com, वेबसाईटः www.aicofindia.com | सीआयएनः U74999DL2002PLC118123, आयआरडीएआयः 126
aicofindialtd | aicofindia | aicofindia

कृषि रक्षक पोर्टल हेल्पलाइन १४४४७

*केवळ जाहिरात

* केवळ जाहिरात (योजनेच्या सर्व अटी व शर्ती लागू). | फसल हो या कृषि संपदा । बीमा सुरक्षा हमारा वादा ॥ | विमा आग्रहाची विषय वस्तू आहे

## ➤ महत्त्वाचे

### दिंडोरीत बिबट्याच्या हल्ल्यात महिला ठार



**दिंडोरी ।** तीन महिन्यात बिबट्याने चौघांचा बळी घेतल्याने नागरिकांनी वनविभागाच्या विरोधात तीव्र संताप व्यक्त केला आहे.दिंडोरी शहरातील बदादे वस्तीवर ६५ वर्षीय महिलेवर बिबट्याने हल्ला करुन महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. दिंडोरी शहरात बिबट्याच्या हल्ल्यात चौथा बळी गेल्याने तीव्र संताप उसळला असून मयत महिलेचे नातेवाईकांनी वनविभागाच्या कार्यालयासमोर मृतदेह आणून रास्ता रोको आंदोलन केले. रक्षाबंधन सणाच्या निमित्ताने सर्वत्र नागरिकांची लगबग सुरु होती. दुपारी ४ वाजेच्या सुमारास दिंडोरी शहरातील बदादे वस्तीवरील जनाबाई जगन बदादे (६५) ह्या शेतात काम करीत असतांना मागील बाजूने येवून बिबट्याने झडप घातली. बिबट्याच्या डरकाळीने व जनाबाई बदादे यांच्या ओरड्याने परिसरातील शेतकऱ्यांच्या ही बाब लक्षात आली. जनाबाईचा मोठा मुलगा संजय बदादे हे बिबट्याच्या शोधात ऊसाकडे पळाले. त्यात बिबट्या जनाबाईला तोंडात घेवून चाललेला दिसला. यावेळी संजय बदादे यांनी बिबट्याच्या तावडीतून जनाबाईला सोडवले. त्यांना दिंडोरी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. यावेळी वनविभागाचे अधिकारी तत्काळ पोहचले नाही तसेच वनविभागाने बिबट्याचा बंदोबस्त केला नाही म्हणून व दिंडोरी शहरातील चौथा बळी असल्याने संप्तत नागरिकांनी नाशिक-सुरत महामार्गावर रास्ता रोको सुरु केला. त्यामुळे दोन्ही बाजूने वाहतूक ठप्प झाली. पोलिस निरीक्षक रघुनाथ शेगर यांनी नातेवाईकांची समजुत काढण्याचा प्रयत्न केला परंतू सारखे बळी होत चालल्याने दिंडोरीकरांनी मृतदेह रस्त्यावर ठेवत वनविभागाचा निषेध व्यक्त केला. वनविभागाचे अधिकारी वनपरिक्षेत्र अधिकारी पाटील, वनपाल अशोक काळे यांनी समजुत काढण्याचा प्रयत्न केला. यावेळी नागरिकांतर्फे जाब विचारण्यात आला. अखेर पाटील व काळे यांनी लेखी आश्वासन दिले. पोलिस निरीक्षक रघुनाथ शेगर यांनी नातेवाईकांची समजुत काढली. नंतर नातेवाईकांनी रास्ता रोको आंदोलन मागे घेतला. जनाबाई बदादे यांच्यावर शवविच्छेदन करण्यात आले व दिंडोरी येथे रात्री अंत्यविधी करण्यात आला.

### रक्षाबंधनानिमित्त गोदावरी मातेच्या नावाने 'राखी शपथ'

**नाशिक ।** जागतिक आदिवासी दिवस आणि रक्षा बंधन या दुहेरी पर्वानिमित्त तपोवन येथे ७१ फूट उंच श्रीराम शिल्पास राखी अर्पण करून भाविकांना गोदावरी मातेच्या स्वच्छतेची शपथ देण्यात आली. श्रीराम कपिला गोदावरी नदी आरती समितीच्या वतीने



आलेल्या नाशिककर व भाविकांना राख्यांचे वाटप करण्यात आले. या वेळी प्रत्येकाने गोदावरीच्या नावाने राखी बांधून नदीला मातेचा दर्जा आहेच, पण ती आपली बहीणसुद्धा आहे. तिला कुठलाही कचरा, घाण किंवा निर्माल्य लागता कामा नये, गाड्या धुवू नयेत, आणि कोणी नदीत घाण टाकत असल्यास त्याला थांबवावे अशी शपथ घेतली. कार्यक्रमात आदिवासी वेशभूषेत आलेल्या विद्यार्थिनींनी गोदावरीची आरती करून तिला संस्कृतीची जननी म्हणून राखी अर्पण केली.

### बिटको परिसरात दोन फ्लॅटमध्ये घरफोडी

**एकलहरे ।** दोन फ्लॅटच्या दरवाजांचा कडीकोयंडा तोडून चोरट्याने घरफोडी करून सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह रोकड असा १ लाख ३१ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना बिटको येथे घडली. फिर्यादी दत्तात्रय रेवजी जमदाडे रा. गुरू स्नेह अपार्टमेंट, बिटको, नाशिकरोड यांनी दिलेल्या फिर्यादी नुसार फिर्यादी आणि फ्लॅट क्रमांक ३ चे मालक विनय झाल्टे या दोघांच्या फ्लॅटच्या दरवाजाचा कडीकोयंडा अज्ञाताने तोडून आत प्रवेश केला. त्यावेळी फिर्यादी जमदाडे यांच्या घरातून ४५ हजार रुपये किमतीचे १२ ग्रॅमचे सोन्याचे मंगळसूत्र व ५० हजार रुपये रोख, तसेच झाल्टे यांच्या घरातून ३० हजार रुपये किमतीचे ५०० ग्रॅम वजनाचे चांदीचे ताम्हण, तीन हजार रुपये किमतीचा चांदीचा दिवा व तीन हजार रुपये रोख असा दोन्ही घरफोड्यांमध्ये मिळून १ लाख ३१ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. चोऱ्यांमुळे परिसरात भीतीचे वातावरण आहे. उपनगर पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक पोलीस निरीक्षक शेजवळ तपास करीत आहेत.

# तळेगाव दिंडोरी पाझर तलावातील पाणी अयोग्य, मात्र अधिकारी अनभिज्ञ

## गेल्या पाच ते सहा दिवसापासून पाणी हिरवेगार



> संबधित प्रशासनाने दूषित जलस्त्रोतांतर त्वरित योग्य उपाय करून ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्यदृष्ट्या स्वच्छ आणि सुरक्षित पाणी मिळावे व जलस्त्रोतांचे संवर्धन व उपाययोजना करणे गरजेचे असून, नागरिकांच्या आरोग्याची प्रशासन दखल घेणार का?
> **- सुकदेव खुर्दळ, उपसरपंच, खतवड**

**दिंडोरी ।** तालूक्यातील तळेगाव दिंडोरी शिवारातील पाझरतलावातील जलस्त्रोत दूषित व रासायनिकदृष्ट्या अपायकारक असल्याचे निष्पन्न झाले आहे.या दूषित पाण्यामुळे नागरिकांसह जनावरे व सिंचनास अपायकारक असतांनाही संबधित विभागाच्या वतीने कुठल्याही प्रकारे दखल घेतली नसल्याने, नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

दिंडोरी तालूक्यातील,तळेगाव दिंडोरी गावच्या पश्चिमेस असलेल्या पाझर तलावात गेल्या पाच ते सहा दिवसा पासून पाण्याचा अचानक रंग बदला असून ,तलावातील पाणी पुर्णपणे हिरवे गार झाले आहे.या पाण्याचा उग्र वास येत असल्याचे स्थानिक नागरिक सांगत आहे. सदर पाझरतलावातील पाणी नाल्याद्वारे खतवड गावापर्यंत जावून पोहचले असून,खतवड येथे असलेल्या नाल्या लगत पिण्यासाठी पाणी पुरवठा करण्यात येणारी सार्वजनिक विहिरिला व लगतच्या शेतक-यांच्या विहिरी व बोअरवेल मध्ये दुषीत पाणी आल्यास नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न उद्भवू शकतो.याबाबत शेतकरी सहकारी संघाचे संचालक संतोष कथार,खतवड येथील उपसरपंच सुकदेव खुर्दळ व तळेगाव ग्रामपंचायत अधिकारी अमोल शिंदे यांनी सदर बाब संबधित महसूल, पंचायत समिती विभागाचे अधिकारी,आरोग्य विभाग यांच्या निदर्शनास आणून दिली असता आरोग्य विभागाच्या वतीने, नमून्यांची नाशिक येथील प्रयोगशाळांमध्ये जलस्त्रोतांची रासायनिक तपासणी केली असून पाणी नमूने, पेयजलासाठी अयोग्य ठरले असतानाही प्रशासकीय अधिकारी अद्यापही फिरकले नसल्याने तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. डेंग्यू कॉलरा, हिपॅटायटिस, टायफॉइड यांसारखे गंभीर आजार निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न उद्भवल्यास जबाबदार कोण असा सवाल उपस्थित केला जात आहे.

# पेन्शनधारकांच्या राष्ट्रीय संघर्ष समितीच्या आंदोलनाला खासदारांचा पाठिंबा

**नाशिक ।** दिल्ली नवी येथील ईपीएस ९५ (EPS-95) पेन्शनधारकांच्या राष्ट्रीय संघर्ष समितीच्या आंदोलनाला अनेक खासदारांनी दर्शविला पाठिंबा दर्शविला आहे.

नवी दिल्ली येथे ईपीएस ९५ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या राष्ट्रीय संघर्ष समितीच्या गेली 10 वर्षापासून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या त्यांना मिळत असलेल्या सध्याच्या पेन्शनमध्ये वाढ करून ती रुपये ७५०० + महागाई भत्ता व मेडिकल सुविधा मोफत मिळाव्यात यासाठी नवी दिल्ली, जंतर मंतर येथे दि. ४ व ५ ऑगस्ट २०२५ रोजीच्या आंदोलनाला अनेक खासदारांनी भेट दिली व पाठिंबा दिला. आंदोलनामार्फत गेल्या दहा वर्षांपासून प्रलंबित असलेल्या EPS-95 पेन्शनधारकांच्या मागण्यां साठी लढा दिला जात आहे. त्यांच्या मागण्यांना पाठिंबा दिला व सदर मागण्यांचा सकारात्मक विचार करून संसदेत हा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लागावा यासाठी आम्ही स्वतः पुढाकार घेऊ, असे समस्त खासदारांनी आंदोलनकर्त्यांना आश्वस्त केले. यावर लगेच कोल्हापूरचे खासदार छत्रपती शाहू महाराज यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना ईपीएस 95 पेन्शन मध्ये वाढ करून ती कमीत कमी ९००० रुपये करण्यात यावी याचे निवेदन देण्यात आले. याप्रसंगी निर्मला सीतारामन यांनी सकारात्मकता दाखवून यावर निर्णय घेऊ, असे आश्वासन शिष्ट मंडळाला दिले.

या प्रसंगी महाराष्ट्रातील 24 खासदार उपस्थित होते. यामध्ये डॉ..शोभा बच्छाव, नरेश म्हस्के, वर्षा गायकवाड, कल्याणराव



काळे, नामदेव कीर्तने, गोपाळ पाडवी, प्रशांत पाडोळे, प्रणिती शिंदे, प्रतिभा धानोरकर, श्यामकुमार बर्वे , शिवाजीराव काळगे, बळवंतराव वानखेडे, रवींद्र चव्हाण, अमर काळे, सुरेश म्हात्रे, विष्णू सावरा आदी खासदारांचा समावेश होता. दोन दिवसांमध्ये श्रीरंग बारणे (मावळ), डॉ. शोभा बच्छाव (धुळे), कल्याणराव काळे (जालना), राजेंद्र चव्हाण (नांदेड), राजाभाऊ वाजे (नाशिक), भास्करराव भगरे, (दिंडोरी), मेघा कुलकर्णी (पुणे) (राज्यसभा), नरेश म्हस्के (ठाणे), बंडू जाधव (परभणी), बळवंतराव वानखेडे (अमरावती), प्रतिभा धानोरकर, संदीपान भुमरे, श्यामकुमार बर्गे , बळवंतराव वानखेडे, शिवाजीराव काळगे, रवींद्र चव्हाण, ओमराजे निंबाळकर, राजाभाऊ वाजे, भास्कर भगरे, नामदेव कीरसान, निलेश लंके, भाऊसाहेब वाकचौरे, कल्याणराव काळे महाराष्ट्रातील वरील खासदारांनी तसेच अमरा राम, राजस्थान, तनुजा पुनिया बाराबंकी, उत्तर प्रदेश, नेगीबेन साबरकांटा आदी बाहेरील राज्यातील खासदारांनी उपस्थित राहून तसेच काहींनी मोबाईलवर फोन करून आंदोलनास पाठिंबा दिला. दि. ६ ऑगस्ट रोजी संसद भवनाच्या मकरद्वारावर जालना लोकसभा मतदारसंघाचे खासदार कल्याणराव काळे यांच्या नेतृत्वात ईपीएस ९५ योजना सरकारने त्वरित लागू करावी यासाठी आंदोलन करण्यात आले.

# ज्येष्ठांनी शरीरात होणाऱ्या बदलांमध्ये लक्ष ठेवणे गरजेचे : डॉ. पार्थ देवगांवकर

## लोकज्योती ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे मासिक सभा संपन्न

**नाशिक ।** सतत थकवा येणे, सूज येणे, लघवीमध्ये बदल, पाठदुखी किंवा श्वासोच्छवासाचा त्रास जाणवत असेल तर डॉक्टरांची तात्काळ मदत घेणे महत्वाचे आहे. वर्षातून २ वेळा आरोग्य तपासण्या करणे तितकेच महत्वाचे असते. खास करून ज्येष्ठ नागरिकांनी शरीरात होणाऱ्या बदलांमध्ये वेळीच लक्ष देऊन डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन देवगांवकर हॉस्पीटलचे किडनीविकार तज्ञ डॉ. पार्थ देवगांवकर यांनी केले. लोकज्योती ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे मासिक सभा आयोजीत केली होती. त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करतांना डॉ. देवगांवकर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष रंजनभाई शाह, उपाध्यक्ष बाळकृष्ण दंडगांवकर, रमेश डहाळे, देवराम सैंदाणे, मुकुंद दीक्षित, जितेंद्र येवले उपस्थित होते. सुरुवातीला संस्थेचे सचिव रमेश डहाळे



यांनी आदिवासी पाडयावर नवीन कपडे वाटप उपक्रमाची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. या उपक्रमात सहभागी झालेल्या ५२ ज्येष्ठांचे कौतुक करून आभार मानले. तसेच ऑगस्ट महिन्यात वाढदिवस असलेल्या सभासदांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. डॉ. देवगांवकर म्हणाले की, किडनीचा त्रास जाणवू लागल्यास आवश्यक आरोग्य चाचण्या जसे की ब्लड टेस्ट, युरिन रुटीन टेस्ट सारख्या तपासण्या करून वेळीच निदान करणे गरजेचे असते. ज्या नागरिकांना उच्च रक्तदाब, धूम्रपान, मधुमेह, लठ्ठपणा अशी लक्षणे असतात त्यांच्यामध्ये किडनीविकाराचा धोका अधिक असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी मोठ्या संख्येने ज्येठ नागरिक उपस्थित होते.

# उच्च शिक्षणातून कौशल्य, मूल्यांचा विकास व्हावा : प्राचार्य डॉ. देशमुख

## कर्मवीर गणपत दादा मोरे निफाड महाविद्यालयात दीक्षारंभ समारंभ

**निफाड ।** महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांनी अध्यापनाबरोबरच कला, साहित्य, क्रीडा उपक्रमात भाग घ्यावा. महाविद्यालय हे कौशल्य आधारित शिक्षण देणारे केंद्र आहे. महाविद्यालयीन शिक्षणानंतर विद्यार्थी समाजात एक आदर्श नागरिक म्हणून जीवन जगत असतो, महाविद्यालय हे आदर्श नागरिक घडविणारे प्रशिक्षण केंद्र आहे. महाविद्यालयीन शिक्षणातून मुल्य आणि सामाजिक जाणीव निर्माण होत असते, असे मत मविप्रचे शिक्षणाधिकारी प्राचार्य डॉ. विलास देशमुख यांनी व्यक्त केले. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात पदवी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित दीक्षारंभ (इंडक्शन) समारंभ प्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे, प्रा. डॉ. प्रवीण ढेपले, प्रा. डॉ. सुसान लॉरेन्सिया, प्रा. प्रवीण शार्दुल, प्रा. योगेश कडलग, प्रा. दीपाली शेंडे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. देशमुख पुढे म्हणाले की, महाविद्यालय हे विद्यार्थ्यांच्या जडणघडणीचे केंद्र असल्याने येथे नेतृत्व, संघटन, कौशल्य, जबाबदारी घेण्याची वृत्ती आदी मूल्यांची पायाभरणी होत असते, म्हणून विद्यार्थ्यांनी अष्टावधानी राहुन, मिळालेल्या संधीचे सोने केले पाहिजे. विद्यार्थ्यांनी परिस्थितीचा बाऊ करू नये. प्रत्येकाच्या वाट्याला संघर्ष असतोच, त्या संघर्षातून ताऊन सलाखून पुढे गेलेले विद्यार्थी स्वतःचे नवे अस्तित्व निर्माण करतात, असे प्रतिपादन त्यांनी केले. प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचा इतिहास सांगून, शिक्षणाने जीवनात प्रेम,



सद्भावना, सत्यनिष्ठता, सदाचार ही मूल्य मिळत असतात असे मत व्यक्त केले. यावेळी डॉ. प्रवीण ढेपले, प्रा. योगेश कडलक, ग्रंथपाल दीपाली शेंडे, प्रा. चंद्रशेखर मोरे, प्रा. भाऊसाहेब मुंतोडे, श्रद्धा गवळी, प्रा. शंकर गायकवाड यांनी महाविद्यालयातील विविध उपक्रमांची माहिती दिली.

प्रास्ताविकात प्रा. प्रविण शार्दूल म्हणाले, विद्यार्थ्यांना अध्यापनाबरोबर विविध उपक्रमांची आणि महाविद्यालयीन नियमांची माहिती मिळावी. शासकीय पातळीवरील विविध सोयी आणि सवलतींची माहिती समजावी. शिक्षणाबरोबरच क्रीडा विभाग व त्यातील विविध खेळांची माहिती, राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास मंडळ, ग्रंथालय विभाग, परीक्षा विभाग, सांस्कृतिक विभाग यांच्यासह इतर विभागांच्या कामकाजाचे स्वरूप विद्यार्थ्यांना कळावे यासाठी इन्डक्शन प्रोग्राम महत्वाचा असल्याचे सांगितले. शेवटी प्रश्नोत्तरे व चर्चेतून विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी व समस्या यावर मार्गदर्शन केले गेले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रविण शार्दूल यांनी केले तर आभार डॉ. सुसान लारेन्सिया यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक यांनी परिश्रम घेतले.

# तिसऱ्या श्रावण सोमवारनिमित्त नागापूर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन

**मनमाड ।** परिसरातील नागापूर (नांदगांव) येथील अतिप्राचीन कालीन नागेश्वर मंदिरात आज तिसऱ्या श्रावणी सोमवार रोजी बम,बम भोलेच्या गजरात भाविकांची मोठी गर्दी उसळली होती,त्यामुळे पहाटेपासूनच मंदिर परिसर भक्तांनी गजबजून गेला होता.

दरम्यान मंदिराच्या परिसरात नागापूर ग्रामचायतीचे लोकनियुक्त सरपंच राजेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मनमाड-




नांदगांव रोडवर असलेल्या नागापूर येथे अति प्राचीन कालीन श्री क्षेत्र नागेश्वर मंदिर असून याठिकाणी श्रावण महिन्यात आणि महाशिवरात्रीला या ठिकाणी जिल्ह्यासह इतर जिल्यातून भाविक नागरिक मोठ्या संख्येने गर्दी केली होती. नागापूर ग्रामपंचायत आणि समता रक्तपेढी नाशिक यांच्या संयुक्त विद्यमानाने सरपंच राजेंद्र पवार यांच्या अध्यक्षतेखाली भव्य रक्तदान शिबिर आयोजन करण्यात आले. यावेळी उपसरपंच निलेश पवार,ग्रामविकास अधिकारी दिलीप निकम,डॉ.इरफान खान,गणेश राजे पवार,नवनाथ पवार,गणेश अशोक पवार,सिताराम शिलावट,हिरामण शिलावट,अनिकेत जाधव,मनोज मोरे आदींनी यशवस्वीतेसाठी परिश्रम घेतले. सरपंच राजेंद्र पवार यांनी भाविक रक्तदात्यांचे आभार मानले.

# 'नवसाचा' देवीभक्त!

कुत्री भुंकायाला लागली तसं मी खिडकीतून बाहेर पहिले. कोणीतरी आले होते. ती व्यक्ती आमच्या इमारतीचे गेटमधून आत आली आणि पार्किंगच्या आवारातून रस्ता काढीत ती थेट पहिल्या मजल्यावर आली. त्याने माझ्या फ्लॅटची बेल दाबली. मी दरवाजा उघडला तसे शब्द कानी पडले. "आई उदो उदो अंबाबाईचा! उदो उदो तुळजा भवानीचा! साहेब राम राम ! आत येऊ का? असा प्रश्न त्या व्यक्तीने मला केला. मी त्याला परवानगी दिली. तसा तो आत येऊन सोप्यावर बसला आणि म्हणाला, साहेब बरं चाललय ना? तुम्ही काळजी करू नका बगा! तुळजा भवानीचा तुम्हाला आशीर्वाद हाय बगा. तुमचा मुलगा मोठा साहेब हुहिल बगा! त्याने नेहमीच्या शैलीने भविष्यवाणी उच्चारली! मी म्हटले, माझा मुलगा मोठा साहेब आहेच. तो म्हणाला,असू द्या ! मला माहीत हाय, तो आणखी मोठा साहिब हुनार! त्याने चपळाईने भविष्याची री ओढली! तो त्याच भविष्य सोडायला तयार नव्हता. मग जरा थांबून म्हणाला, दादा कुठं हाय आता ? एकदा दादाकडे जायचं मला." मी म्हटलं तो मुंबई शहरात आहे.तो म्हणाला, मी जाईन! आई तुळजा भवानी कल्याण करल, अंबाबाई ... अंबे माते, आई तुळजा भवानी अस तो पुटपटत राहिला. एखाद्या नातेवाईकाप्रमाणे त्याने घरातील साऱ्यांची खाली खुशाली घेतली. मग हक्कानी सांगावे तसा म्हणाला, साहेब सकाळीची येळ हाय, चहा द्या की? मी चहा टाकायचा सांगितला. त्याचे नाव संतराम शिंदे! तो तुळजापूर येथील महादी वस्तीवर राहतो. देवीचे प्रामुख्याने गोंधळी, आराधी हे उपासक समजले जातात. लग्नात, देवीच्या नवरात्रात देवीचे गोंधळ घालणे, पूजा करणे आदी कामे ही लोक करतात. संतराम मात्र स्वतः फुलमाळी असल्याचे सांगतो. संतरामच्या गळ्यात मोठी झोळी. गळ्यात कवड्याची माळ आणि तुळजाभवानीचा फोटो अडकवलेला! अनेक ठिकाणी महिलांनी कुंकू लावल्यामुळे तो फोटो लाल झालेला. मी म्हटलं दरवर्षी तुम्ही भिक्षा मागतात, त्यावर भागते का? तसा तो म्हणाला, साहेब कशाचं भागतय? चाललय आपलं! मी म्हणालो, मुले काही करीत नाही का? तो म्हणाला, तीन मुले हायीत.. थोडीफार शिकली.! मी म्हटलं, जास्त का नाही शिकविले. आरक्षण आहे, तुम्हाला फायदा झाला असता. तसा तो म्हणाला, कशाचं आरक्षण



अन् कशाचं काय, सरकार काही नाही करीत! मूल करतात कामधंदा! कोणी दूध डेरीवर, कोणी मोलमजुरी करतय! अस संतराम म्हणाला. सध्या आरक्षणावरून सर्वत्र वाद चालू असताना ज्यांना आरक्षण आहे, त्यांना ते मिळतंय की नाही असा प्रश्न आहे. आरक्षित जातीमधील अल्पसंख्याक जातीपर्यंत आरक्षणाचे फायदे पोहचत नाहीत, असेच संतरामच्या बोलण्यातून जाणवले. तुम्ही देवीचे भगत कधी झालात? मी विचारले. तो म्हणाला, साहेब मला आईवडिलांनी देवीला सोडलेल! मी नवसाचा म्हणून मला देवीला सोडलं. पुढे मोठा झाल्यावर मी देवीची भक्ती करीत तुळजापुरात स्वतंत्र राहू लागलो. तेंव्हापासून देवीच्या नावाने भिक्षा मागत फिरतो. समाज अजूनही अंधश्रदेच्या विळख्यात असल्याचे जाणवले. संतराम शिंदे दरवर्षी येतोच. आता शहर वाढली आहेत. ठिकठिकाणी बांधकामे होतायेत. शहराचे स्वरूप सारखे बदलत असते. संतरामचेही वय झाले आहे. मात्र तो न चुकता बरोबर घर शोधतो. साऱ्याच ठिकाणी तो भिक्षा मागत नाही. भिक्षेत प्रामुख्याने रोख रक्कम किंवा धान्य तो घेतो! काही ठराविक ठिकाणीच तो जातो. आमच्या नंतर तो श्रीराम चौकात आव्हारवाडीचे कोणी आव्हाड म्हणून साहेब पोलिस खात्यात आहेत, त्यांच्याकडे जाणार होता. दरवर्षी संतराम भिक्षेसाठी तुळजापूर येथून बाहेर पडतो. जवळ थोडेफार पैसे असतात. मात्र कधी एसटीने, कधी कोणाच्या गाडीवर, टेम्पोत असा विविध मार्गे प्रवास करून संतराम पैसे वाचवून इच्छित स्थळी पोहचण्याचा प्रयत्न करतो. बहुतेक वेळेला त्याचा मुक्काम हा मंदिरात असतो. आणखी काही दिवसांनी तो नाशिक येथे जाणार असून तेथे जनार्दन स्वामींच्या मठात राहणार असल्याचे तो म्हणाला. नगर, नाशिक जिल्ह्यातून त्याची भ्रमंती संपल्यावर तो पुन्हा तुळजापूर येथे येईल. त्याला म्हणलं, तुझा लेख लिहतो पेपरला. तो म्हणाला, लिवा! म्हटलं तुझा मोबाईल नंबर दे, त्यावर छापून आलेले टाकतो. तो एकदम हसू लागला. म्हटलं का रे! तो म्हणाला, साहेब तुमचं खरंय, पण मला मोबाईलचं नाही...मग म्हटलं तुला कसं कळणार रे? तो म्हणाला, माझी मुलं वाचतील की...असं म्हणून तो रामराम करून निघाला. त्याच्या भाबड्या पाठमोऱ्या आकृतीकडे मी पहातच राहिलो...

**- कैलास ढोले, जेष्ठ पत्रकार, अहिल्यानगर, मो. ९४२३४६२८३१**



## ग्रुप ग्रामपंचायत दातली, ता. सिन्नर, जि. नाशिक.

### जाहीर निविदा सूचना

सरपंच ग्रुप ग्रामपंचायत दातली, ता. सिन्नर, जि. नाशिक हे १५ वा वित्त आयोग निधीतून खालीलप्रमाणे बी-१ निविदा जिल्हा परिषदेच्या नोंदणीकृत सु.बे. मक्तेदाराकडून मागिवत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत | बयाणा रक्कम | निविदा फी |
|---|---|---|---|---|
| ०१ | दातली येथे कचरा विलगीकरण शेड बांधणे. | २,३५,,७७/- | २,३५७ | ३०० |
| ०२ | दातली येथे राखीव भिंत / कुंपणाचे काम करणे. | ३,०९,३०३/- | ३,०९३ | ३०० |
| ०३ | दातली येथे सामुदाईक स्वच्छता संकुल बांधकाम करणे. | ३,००,०००/- | ३००० | ३०० |

**अटी व शर्ती**- १) सदर निविदा दि. १३/०८/२०२५ ते २०/०८/२०२५ रोजी सुट्टीचे दिवस वगळून दुपारी ५ वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. २) मोहरबंद निविदा दि. २२/०८/२०२५ रोजी सकाळी १०:०० वा. उघडण्यात येईल. ३) जीएसटी प्रमाणपत्र, पॅन कार्ड, नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक. ४) बांधकाम प्रलंबित नसल्याचा दाखला जोडणे आवश्यक. ५) कोणतेही कारण न देता निविदा स्वीकारण्याचा /नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतने राखून ठेवला आहे.

**सही/- ग्रामसेवक अधिकारी** **सही/- सरपंच**

**ग्रुप ग्रामपंचायत, दातली, ता. सिन्नर, जि. नाशिक.**

## महत्त्वाचे

### व्हिजन हॉस्पिटलतर्फे आरोग्य शिबिराचे आयोजन

**नाशिक ।** गेल्या ३८ वर्षांपासून नाशिककरांच्या सेवेत असलेल्या विजन हॉस्पीटलतर्फे स्वातंत्र्य दिनानिमित्त दि.१६ व १७ आगस्ट २०२५ दोन दिवसीय शिबिराचे आयोजन सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत व्हिजन हॉस्पीटल, कॉलेजरोड, नाशिक येथे करण्यात आल्याची माहिती व्हिजन हॉस्पीटलचे संचालक नामवंत हृदयविकार तज्ञ डॉ. विनोद व्हिजन, डॉ. विक्रांत व्हिजन तसेच नेत्रविकार तज्ञ डॉ. सृष्टी व्हिजन यांनी दिली. डॉ. विक्रांत विजन यांनी सांगितले की, दि.१६ व १७ आगस्ट 2025 दोन दिवसीय शिबिरामध्ये ४ डी इको, रक्तदाब तपासणी, ईसीजी, मधुमेह तपासणी, कोलेस्ट्रॉल, हाडांची ठिसुळता, डोळे तपासणी, हृदय तपासणी तसेच सांधेरोग तपासणी करण्यात येणार आहे. यासाठी नाममात्र ४९९/- रूपये रजिस्ट्रेशन फी ठेवण्यात आली आहे. या शिबिरामध्ये हृदयविकार तज्ञ डॉ. विनोद व्हिजन, डॉ. विक्रांत व्हिजन, नेत्रविकार तज्ञ डॉ. सृष्टी विजन, फिजिशियन डॉ. गुलशन तोलानी, अस्थिविकार तज्ञ डॉ. अर्पित बावसकर, दंतविकार तज्ज्ञ डॉ. कविता स्वानी रूग्णांची तपासणी करणार आहेत. या शिबिराचा लाभ जास्तीत जास्त नागरीकांनी घेण्याचे आवाहन व्हिजन हॉस्पीटलच्या वतीने करण्यात आले आहे.

### सोशल मीडियात कांदा पट्ट्यातील लोकप्रतिनिधींवर 'व्यंगचित्र थीम'

**आराई ।** कांदा उत्पादक पट्ट्यातील




ढासळत चाललेली अर्थव्यवस्था कांद्याचे पडलेले भाव या सर्व वस्तुस्थितीवर बागलाण मोरे नगर येथील व्यंगचित्रकार किरण मोरे यांनी व्यंगचित्राच्या माध्यमातून कांदा पट्ट्यातील उत्तर व पश्चिम महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधींचे आमदार व खासदार यांचे व्यंगचित्र रेखाटले असून त्यात कांदा लोकप्रतिनिधींना उद्देशून म्हणताना दाखवण्यात आले आहे, की "बोला साहेब कांद्याला कधी भाव मिळणार "त्यांनी ही व्यंगचित्राची थीम बागलाण चे आमदार दिलीप बोरसे यांचे पहिले व्यंगचित्र काढून सुरुवात केली.त्यांनी आत्तापर्यंत नंदुरबारचे खासदार गोवाल पाडवी,धुळे लोकसभा मतदार संघाच्या खासदार शोभा बच्छाव, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे ,राज्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री नरहरी झिरवाळ, कळवणचे आमदार नितीन पवार ,चांदवड देवळा मतदार संघाचे आमदार डॉ.राहुल आहेर आदींचे व्यंगचित्र तयार करत सोशल मीडियावर प्रसिद्ध केले आहे.

### विंचूर येथे पाताळेश्वर महादेव मंदिरात महाआरती

**विंचूर ।** येथील पाताळेश्वर महादेव



मंदिरात तिसऱ्या श्रावणी सोमवारी, (दि.११) भव्य महाआरती व भंडारा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या धार्मिक सोहळ्याचे आयोजन श्री पाताळेश्वर भक्त मंडळ व ग्रामस्थ, विंचूर यांच्या वतीने करण्यात आले आहे. संध्याकाळी ५.०० ते ६.०० या वेळेत पाताळेश्वर महिला भजन मंडळ यांच्या सुमधुर भजन कार्यक्रमाने वातावरण भक्तिमय झाले. त्यानंतर सायंकाळी ६.०० वाजता महाआरती करण्यात आली व महाआरतीनंतर आलेल्या भाविकांनी तात्काळ महाप्रसादाचा लाभ घेतला. गुरुभक्ती, शिवभक्ती आणि सामूहिक सहभाग या भावनेतून दरवर्षीप्रमाणे यंदाही हा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. परिसरातील नागरिक, भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घेतला.

### महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मिळाला ९२१ कोटींचा लाभ!

**देवळा ।** पंतप्रधान पीक विमा योजनेअंतर्गत देशातील ३० लाखांहून अधिक शेतकऱ्यांच्या खात्यात डीबीटीद्वारे ३,९०० कोटी रुपयांचा विमा दावा थेट जमा करण्यात आला. केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या उपस्थितीत राजस्थानातील झुंझुनू येथे सोमवारी हा विमा दाव्याचा वाटप सोहळा पार पडला. राज्यनिहाय पाहता, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना ९२१ कोटी रुपयांची नुकसानभरपाई मिळाली आहे. तसेच राजस्थानातील ७ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना १,१०० कोटी रुपयांचा लाभ झाला. मध्य प्रदेशातील शेतकऱ्यांना १,१५६ कोटी रुपये, छत्तीसगडमधील शेतकऱ्यांना १५० कोटी रुपये आणि इतर राज्यांतील शेतकऱ्यांना ७७३ कोटी रुपयांची रक्कम वितरित करण्यात आली. चौहान यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१६ मध्ये सुरू केलेल्या या योजनेअंतर्गत आतापर्यंत ७८ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना एकूण १.८३ लाख कोटी रुपयांची नुकसानभरपाई वितरित झाली आहे, तर शेतकऱ्यांनी प्रीमियम म्हणून केवळ ३५,८६४ कोटी रुपये भरले आहेत. "सरासरी दाव्याच्या रकमेपेक्षा ५ पट जास्त लाभ देणे, हे सरकारच्या शेतकरी-अनुकूल धोरणाचे प्रतीक आहे," असे ते म्हणाले.कार्यक्रमात चौहान यांनी गेल्या वर्षीच्या खरीप आणि रब्बी हंगामातील रखडलेल्या दाव्यांचे थेट बँक खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरू झाल्याचेही स्पष्ट केले.

# 'हर घर तिरंगा' अभियान

## तिरंगा मानवी साखळी ठरली लक्षवेधी





**नाशिक ।** भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आणि 'हर घर तिरंगा" अभियानांतर्गत नाशिक महापालिकेच्यावतीने रविवारी (दि. ११) विविध देशभक्तीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्याअंतर्गत राजीव गांधी भवन येथे भव्य तिरंगा मानवी साखळी आणि विशाल राष्ट्रध्वज झळकवण्याचा कार्यक्रम पार पडला.

या मानवी साखळीत नाशिक शहरातील विविध खासगी शाळा तसेच शिक्षण मंडळांतर्गत शाळांचे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षण संस्थांचे पदाधिकारी आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमस्थळी "वंदे मातरम", "घर घर तिरंगा", "भारत माता की जय" या घोषणांनी देशभक्तीचा माहोल रंगला. कार्यक्रमाला कुंभमेळा आयुक्त तथा अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर, अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, अतिरिक्त आयुक्त स्मिता झगडे यांच्यासह मनपाचे अनेक अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. यावेळी कुंभमेळा आयुक्त करिष्मा नायर यांनी आवाहन केले की, "प्रत्येक नागरिकाने १५ ऑगस्टपर्यंत आपल्या घरावर राष्ट्रध्वज सन्मानाने फडकवावा, राष्ट्रप्रेमाची जाणीव समाजात रुजवावी." अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी यांनी राष्ट्रध्वजाच्या ऐतिहासिक क्षणाची आठवण करून देत म्हटले की, "१५ ऑगस्ट १९४७ रोजी फडकविलेल्या राष्ट्रध्वजाचा गौरव आजच्या उत्साहातून पुनः अनुभवता येतो." अतिरिक्त आयुक्त स्मिता झगडे यांनी राष्ट्रीय एकात्मता आणि एकजुटीचा संदेश देत प्रत्येकाने देशाविषयी आदर जोपासण्याचे आवाहन केले.

या अभियानात उपआयुक्त अजित निकत, नितीन नेर, नितीन पवार, अधीक्षक अभियंता रवींद्र धारनकर, कार्यकारी अभियंता नितीन पाटील, रवी बागुल, राजेंद्र शिंदे, डॉ. विजयकुमार देवकर, डॉ. अजिता साळुंखे, डॉ. जितेंद्र धनेश्वर, सहाय्यक आयुक्त रमेश बहिरम, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद आदी सहभागी झाले. तिरंगा मानवी साखळी शंकरराव पोरजे, मनीषा पाटेकर, योगेश आडभाई, मोहन बुवा, संतोष चंद्रात्रे, सचिन बोरसे, संतोष कान्हे, मंगेश नवले, पवन वझरे, सुनील कदम, मनोज गायधनी, प्रल्हाद हंकारे यांनी यांनी यशस्वीत्यासाठी परिश्रम घेतले.

# अभिनेत्री माधुरी दीक्षीतच्या हस्ते पु. ना. गाडगीळ दालनाचे उद्घाटन



**नाशिक ।** नाशिक मध्ये येऊन मला आपल्या घरी आल्यासारखे वाटते. नाशिककरांनी जी आपुलकी व प्रेम मला दिले त्याचप्रमाणे पु.ना. गाडगीळ या दालनास दिल्याने आज शहरातील दुसऱ्या दालनाचे उद्घाटन होत आहे. जनतेने या दालनासही भरभरून प्रतिसाद द्यावा असे आवाहन प्रसिद्ध अभिनेत्री माधुरी दिक्षीत यांनी केले. मनमोहक आणि उत्तमोत्तम दागिने ग्राहकांना देण्याऱ्या 'पीएनजी ज्वेलर्स'चा वारसा सुरू झाला १८३२ मध्ये ! या वारशाचा विस्तार आता आपल्या नाशिक येथे सुरू होत आहे.शॉप नं. जी-१, सुयोजित संकुल, राजीव गांधी भवनजवळ (एनएमसी), शरणपूर रोड. येथे 'पीएनजी ज्वेलर्स'च्या भव्य शोरूम चे उद्घाटन प्रसिद्ध अभिनेत्री माधुरी दीक्षित यांच्या हस्ते झाले.

माधुरी दिक्षीत पुढे म्हणाल्या, नाशकात सर्वच जण आपले वाटतात. आपुलकी वाटते याच आपुलकीने तुम्ही पु.ना. गाडगीळ दालनात खरेदी करावी अशी ईच्छा व्यक्त केली.या उद्घाटन सोहळ्यास डॉ. सौरभ गाडगीळ, पराग गाडगीळ,श्रीमती. कांचनबेन नवीनचंद्र शहा, दुर्गेश शहा, सुकेश शहा, मुकेश शहा, संयम शहा, जितेश शहा, जिग्नेश शहा, स्मित शहा आदींनी केले आहे.

**हम तुम्हारे है सनम**

नाशिकच्या प्रेमाने भारावून गेले आहे. या प्रेमाची विण घट्ट असल्याने आपण मला कोणीच म्हणू शकणार नाही की 'हम आपके है कौन' कारण हम तुम्हारे है सनम, असे म्हणत माधुरी दीक्षित यांनी नाशिकरांची मने जिंकली.

# मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांचा माहिती अधिकार कार्यकर्त्यांकडून सत्कार



**नाशिक ।** नाशिक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी. ओमकार पवार यांची सदिच्छा भेट घेऊन माहिती अधिकार कार्यकर्त्यांकडून त्यांचे स्वागत करण्यात आले. या प्रसंगी राजेंद्र नानकर, विठोबा ध्यानदान, ॲड सुरेंद्र सोनवणे, संदीप देवरे, भालेराव यांच्यासह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमात सर्वांनी पवार यांना शुभेच्छा देत त्यांच्या कार्यकाळासाठी यशस्वीतेच्या शुभेच्छा व्यक्त दिल्या.

# पांडवलेणी यात्रा उत्साहात संपन्न





**नाशिक ।** अनेक वर्षांची परंपरा असलेल्या पांडवलेणीच्या पायथ्याशी तिसऱ्या श्रावण सोमवारनिमित्त पाथर्डी पंचक्रोशीच्यावतीने यात्रोसव आयोजित करण्यात आला होता. या यात्रेनिमित्त कुस्त्यांच्या दंगलीत लहान-मोठ्या पैलवानांनी भाग घेऊन कुस्तीचे फड रंगविले.

पाथर्डी, पिंपळद, मुंडगाव, सांजेगाव, दाढेगाव, गौळाणे, सातपूर, नाशिक, भगुर , अंबड, वाडीव-हे, विल्होळी आदी ठिकाणाहून आलेल्या पहिलवानांनी व नागरिकांनी येथे गर्दी केली होती. पोलीस सहआयुक्त शेखर देशमुख, भाजपाचे ज्येष्ठ नेते महेश हिरे, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख माजी नगरसेवक सुदाम डेमसे, माजी नगरसेवक भगवान दोंदे यांच्या हस्ते श्रीफळ फोडून कुस्त्यांच्या दंगलीस सुरुवात करण्यात आली.

यावेळी सुनील कोथमिरे, खंडू धोंगडे, सोसायटीचे चेअरमन तानाजी गवळी, त्र्यंबक कोंबडे, विठोबा ढेमसे, बाकेराव ढेमसे, पांडुरंग शिरसाठ,मदन ढेमसे उपस्थित होते. या यात्रेमध्ये पाथर्डी पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यात्रेत विविध प्रकारचे खाद्यपदार्थ विविध वस्तूंचे स्टॉल, पाळणे मोठ्या प्रमाणात लावण्यात आलेले होते. बुद्ध स्मारकामध्येही मोठ्या प्रमाणात गर्दी होती. यावेळी पंच म्हणून अशोक कोंबडे, संजय जाचक, गंगाधर गवळी, रामदास गवळी, कारभारी जाचक, झुंबर ढेमसे विजय गवळी यांनी काम पाहिले. २५ रुपये पासून ते ५००१ रुपये पर्यंतच्या रोख रकमेचे पैलवानांना बक्षीस देण्यात आले.

विश्वनाथ मोंढे, विष्णू गवळी, विष्णू डेमसे, संदीप दोंदे ,गौतम दोंदे, आप्पा जाचक, फरीद शेख, रामदास जाचक, विश्वनाथ मोंढे आणि पाथर्डी पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा यात्रा उत्सवकरिता इंदिरानगर पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांनी चोक बंदोबस्त ठेवला होता.

# जगदगुरु शांतिगिरीजी महाराजांनी तिसऱ्या श्रावणी सोमवारी केला पिनाकेश्वर महादेवाचा अभिषेक





**नाशिक ।** निष्काम कर्मयोगी जगद्गुरु जनार्दन स्वामी महाराजांनी जीर्णोद्धार केलेल्या नांदगाव तालुक्यातील जातेगाव डोंगर येथील जागृत देवस्थान श्री पिनाकेश्वर महादेवाचे तिसऱ्या श्रावणी सोमवार निमित्त अनंत विभूषित जगद्गुरु स्वामी शांतिगिरीजी महाराजांनी महाअभिषेक पूजन केले. या प्रसंगी आश्रमीय संत व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जातेगाव (ता.नांदगाव) येथील जागृत देवस्थान श्री पिनाकेश्वर महादेव मंदिराचे महत्त्व जगद्गुरु जनार्दन स्वामी महाराजांच्या तपोमय जीवनाशी घट्ट जोडलेले आहे. कठोर तपस्वी, निष्काम कर्मयोगी व शिवयोगी जगद्गुरु जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज यांनी सन १९५४ ते १९६५ दरम्यान अंदरसूल येथील नागेश्वर मंदिरात रोज १८ तास सिद्धासनात कठोर तपश्चर्या केली. फलस्वरूप भगवान शंकरांनी त्यांना साक्षात दर्शन देऊन पिनाकेश्वर महादेव (मोठा महादेव) मंदिराचा जीर्णोद्धार करण्याची प्रेरणा दिली. या प्रेरणेनेच जगद्गुरु जनार्दन स्वामी महाराजांनी आपल्या जीवनकार्याची सुरुवात जातेगावच्या पिनाकेश्वर महादेव मंदिराच्या जीर्णोद्धाराने केली. याच ठिकाणाहून 'जय बाबाजी भक्त परिवार' या सेवाभावी कार्याचा शुभारंभ झाला. त्यामुळेच दरवर्षी तिसऱ्या श्रावणी सोमवारी, उत्तराधिकारी अनंत विभूषित जगद्गुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या हस्ते भगवान पिनाकेश्वर महादेवाचा महाअभिषेक पूजन सोहळा पार पडतो.याही वर्षी ब्रह्मवृंदांच्या मंत्रघोषात जगद्गुरु स्वामी शांतिगिरीजी महाराजांनी भक्तिभावाने महाअभिषेक पूजन केले.

यावेळी विवेकानंद महाराज, महादेवगिरीजी महाराज, आश्रमीय संत आणि 'जय बाबाजी भक्त परिवारातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संत व भगवंत यांच्या दर्शनाचा दुग्ध शर्करायोग साधला.

# भाजपा नाशिक महानगर जिल्हा कार्यकारिणी जाहीर

**नाशिक ।** भारतीय जनता पक्षाच्या नाशिक महानगर जिल्ह्याची सन २०२५ ते २०२८ या कार्यकाळासाठी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. सदर कार्यकारिणीत सामाजिक समतोल राखत सर्वसमावेशक पदे दिल्याचे भाजप नाशिक महानगर जिल्हा अध्यक्ष सुनील केदार यांनी सांगितले. यामुळे शहरातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कार्यकारिणी निश्चित करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष आ.रवींद्र चव्हाण, आ.चंद्रशेखर बावनकुळे, ना.गिरीश महाजन, भाजपा प्रदेश महामंत्री विजय चौधरी, संघटन मंत्री रवी अनासपुरे, आ.ॲड.राहुल ढिकले, आ.देवयानी फरांदे, आ.सीमा हिरे, लक्ष्मण सावजी, प्रदीप पेशकार, बाळासाहेब सानप, विजय साने, सतीश कुलकर्णी आदी मान्यवर नेत्यांचा सल्ला व मार्गदर्शन घेण्यात आले.

या कार्यकारिणीच्या अंतिम घोषणेची माहिती भाजपा नाशिक महानगर जिल्हा अध्यक्ष सुनील केदार यांनी प्रसारमाध्यमांना दिलेल्या पत्रकाद्वारे जाहीर केली. त्यांनी सांगितले की, "ही कार्यकारिणी प्रदेश भाजपा नेतृत्वाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार तयार करण्यात आली आहे. सर्व घटकांचा समावेश करून पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी ही कार्यकारिणी महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल."

**नूतन कार्यकारिणी खालील प्रमाणे**- भाजपा नाशिक महानगर जिल्हा अध्यक्ष- सुनील केदार, उपाध्यक्ष- सुनील फरांदे, ॲड.अजिंक्य साने, दिगंबर धुमाळ, रवी पाटील, धनंजय माने, सोनाली कुलकर्णी, रोहिणी दळवी, दिपक सानप, चित्रेश वस्पटे, संदीप लेनकर, सरचिटणीस- सुनील देसाई, अमित घुगे, ॲड.श्याम बडोदे, रश्मी हिरे-बेंडाळे, चिटणीस- राजेश आढाव, संतोष भोर, निलेश बोरा, रवींद्र जोशी, ज्योती कवर, महेंद्र पाटील, सोनाली दाबक, राम कदम, महेंद्र शिंदे, रुपाली मर्चंडे, कोषाध्यक्ष- आशिष नहार, युवा मोर्चा- प्रवीण भाटे, महिला मोर्चा- स्वाती भामरे, अनुसुचित जाती मोर्चा- राकेश दोंदे, आदिवासी मोर्चा- गोरक्षनाथ चौधरी, किसान मोर्चा- बापू पिंगळे, अल्पसंख्यांक मोर्चा- शेख रफिउद्दीन गुलाम मुस्तफा, ओबीसी मोर्चा- प्रकाश चकोर, कामगार आघाडी- हेमंत नेहेते, उत्तर भारतीय आघाडी- शिवेंद्र सिंह, उद्योग आघाडी- सतिष कोठारी, व्यापारी आघाडी- सुरज राठी, भटके-विमुक्त आघाडी- सिद्धेश्वर (बापू) शिंदे, अध्यात्मिक समन्वय प्रकोष्ठ- माणिकराव देशमुख, जैन प्रकोष्ठ- मुकेश जैन, पदवीधर प्रकोष्ठ- विनोद खरोटे, राजस्थान प्रकोष्ठ- नितीन कोचर, चित्रपट प्रकोष्ठ- रवि जन्नावार, वैद्यकीय सेल- डॉ.चंद्रशेखर नामपूरकर, कायदा सेल- ॲड. निलेश पाटील, सहकार सेल- ॲड. महेंद्र सूर्यवंशी, माजी सैनिक सेल- दिनकर पवार, ज्येष्ठ कार्यकर्ता सेल- माणिकराव गायकर, दिव्यांग सेल- विनायक कस्तुरे, ट्रान्सपोर्ट सेल- रोशन देवरे, दक्षिण भारतीय सेल- सुनील पनीकर, शिक्षक सेल- उदय सोनवणे, क्रीडा प्रकोष्ठ- दत्ता शिंदे, बुद्धिजीवी सेल- श्रीधर व्यवहारे, सांस्कृतिक सेल- अविनाश बल्लाळ, आयुष्यमान भारत सेल- रवींद्र गायकवाड, बेटी बचाओ-बेटी पढाओ सेल- सुरेखा पेखळे, आय.टी. सेल- कैलास आढाव, सोशल मीडिया सेल- राज चव्हाण, पंचायत राज व ग्रामविकास- ज्ञानेश्वर पिंगळे, प्रसिद्धी प्रमुख- पियुष अमृतकर, गुजराथी सेल- महेंद्र मजेठिया, पर्यटन विकास मंच- सागर धर्माधिकारी, पर्यावरण मंच- नंदकुमार देसाई, तिर्थक्षेत्र आघाडी- नितीन कानडे, अंत्योदय सेल- समाधान देवरे, योग प्रकोष्ठ- योगेश कुलकर्णी, अभियंता सेल- अमरेंद्र तल्लम. कार्यकारणी सदस्य- काशिनाथ शिलेदार, हिमगौरी आडके –आहेर, पवन भगुरकर, जगन पाटील, ॲड.मिनल भोसले, संध्या कुलकर्णी, प्रा. कुणाल वाघ, निलेश बोरा, देवदत्त जोशी, सुनिल खोडे, निखील पवार, धनंजय माने, प्रशांत कोतकर, डॉ. विनय मोगल, अनिल मटाले, राहुल पवार, धनंजय पुजारी, अनिता भामरे, ॲड. परमानंद पाटील, सुजाता जोशी, सुरेखा निकम, प्रा.शरद मोरे, सोमनाथ बोडके, प्रथमेश कोशिरे, संजय राऊत, हेमंत शुक्ल, सुनिल फरताळे, शामराव पिंपरकर, शरद फडोळ, यशवंत पवार, बबन ढगे, मंगेश पगार, संजय चव्हाण, सुहास शुक्ल, रविंद्र डावखर, नंदकुमार गोखले, खंडेराव पाटील, संजय संघवी, विजय घोडके, युनूस सय्यद, अजित ताडगे, शिवाजी शहाणे, रामदास पिंगळे, ज्ञानेश्वर (अण्णा) आढाव, राम वाघ, निवृत्ती भोर, विलास मुळाणे, गुलाब सय्यद, सीए. मनोज तांबे, श्रीकांत खांदवे, बबलुसिंह परदेशी, शंकरसिंह गेहलोत, धनंजय बेलगांवकर, राजेंद्र बाफणा, नंदकुमार उदावंत, वामनराव दातीर, गणेश दशरथ ठाकूर, संजय दादा जाधव, कमलाकर गरड, निलेश जोशी, संदीप बनकर, मोहन गायधनी, संतोष फड, मोहन मिश्रा, निलेश वरदे, अनिल जाधव, अनिल कासार, चारूहास घोडके, वासुदेव रोहनकर, राजु मोरे, सुरेखा केदारी, ॲड. मिनल वाघ भोसले, कविता तेजाळे, दिपाली भूमकर, सुजाता करजगीकर, श्रीमती पुष्पा शर्मा, भारती बागुल, रोहिणी वानखेडे-नायडू, शुभांगी जोशी, वर्षा थोरात, ज्ञानेश्वर काकड, विजया म्हैसपुरकर, शोभा माने, स्नेहा खांदवे, शोभा जाधव, करुणा गायकवाड, वासंती जावळे, प्रियंका कानडे, प्रेरणा धनंजय बेळे, सुचेता कुकडे, स्मिता शिंदे, राजश्री शौचे, कांता सुरेश वराडे, प्रभा पारगावकर, रुपाली निकुळे, ललिता भावसार, सुनिता मुकणे, मिलींद घमेंडी, विशेष निमंत्रित- ना.देवेंद्र फडणवीस, आ.रवींद्र चव्हाण, आ.चंद्रशेखर बावनकुळे, ना.गिरीश महाजन, डॉ. भारती पवार, विजय चौधरी, रवींद्र आनासपुरे, आ.प्रा. देवयानी फरांदे, आ. सीमा हिरे, आ.ॲड. राहुल ढिकले, बाळासाहेब सानप, लक्ष्मण सावजी, सतीश नाना कुलकर्णी, विजय साने, बबनराव घोलप, सुनील बागुल, प्रदीप पेशकार, प्रशांत जाधव, गिरीश पालवे, महेश हिरे, निशिगंधा मोगल, मंगला जोशी.



### सर्वांना विश्वासात घेऊन समन्यायी पदाधिकाऱ्यांची निवड : सुनील केदार

भाजप शहराध्यक्ष सुनील केदार यांनी सांगितले की, पदाधिकाऱ्यांची निवड सर्वांना विचारून व विश्वासात घेऊन समन्यायी पद्धतीने करण्यात आली आहे. ज्यांना पदे मिळाली नाहीत, त्यांचा विचार प्रदेश व केंद्रीय संघटनात्मक पदे तसेच शासकीय समित्यांमध्ये प्राधान्याने केला जाईल. केदार यांनी स्पष्ट केले की, भाजप पक्षाच्या घटनेनुसार पदांवर मर्यादा असल्यामुळे निर्णय घेताना विचारपूर्वक पावले उचलावी लागली. "पदे मिळालेल्यांपेक्षा न मिळालेल्यांनाही पक्ष संघटनेत मान-सन्मान दिला जाईल," असे ते म्हणाले. विशेष म्हणजे, संघटन कौशल्य उत्तम असतानाही माजी महापौर सतीश कुलकर्णी यांच्या कन्या संध्या कुलकर्णी यांना महत्वाचे पद न देता, इतर कार्यकर्त्यांना ते पद देण्यात आले. "कोणीही नाराज न होता गुजरात पॅटर्नप्रमाणे पक्ष संघटनेचे काम बूथ स्तरावर करावे व सहकार्य करावे," अशी विनंती व अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.शेवटी, केदार यांनी सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून, संघटनात्मक कामकाजासाठी शुभेच्छा दिल्या.

# देवभूमी विकासाकडून विनाशाकडे

उत्तरकाशीत धराली येथे मोठी धगफुटी झाली. हाहा:कार उडाला. किती मृत्युमुखी पडले, किती अतिवृष्टी व पुरात वाहून गेले, किती ढिगाऱ्याखाली गाडले गेले याचा आकडा चार दिवसानंतरही समजला नाही. ढगफुटीनंतर संपूर्ण डोंगरच खाली कोसळला नि अख्खे गावच धरणीच्या उदरात गडप झाले. ढगफुटीनंतर निसगार्चा कोप होऊन डोंगरच कोसळून गावाला घेऊन गेल्याची ही काही पहिलीच घटना नव्हे. आता गावच शिल्लक नाही तर तिथे शोधणार तरी काय? सापडणार तरी काय? घरेदारे, इमारती, वस्त्या सारेच ढगफुटीत वाहून गेले.

---------------



उत्तराखंड ही देशात देवभूमी म्हणून ओळखली जाते. गेल्या काही वर्षात निसगार्चा वारंवार कोप झेलणारी संकट भूमी बनली आहे. अतिवृष्टी, जमीन खचणे, जमीन दुभंगणे, ढगफुटी, महापूर, नदीचा मार्ग बदलणे अशा संकटांनी देवभूमीला घेरले आहे.

दरवर्षी पावसाळ्यात देवभुमितील एक तरी गाव उजाड होत आहे. निसर्गाच्या कोपापुढे सरकार हतबल झाल्यासारखे दिसत आहे. जनता मात्र असहाय्य व अस्वस्थ आहे.

सन २०१३ मधे उत्तराखंडवर असेच नैसर्गिक संकट कोसळले होते. पण त्यापासून सरकारने काहीच बोध घेतला नाही असे म्हणावे लागेल. उत्तर प्रदेशचे विभाजन करून ९ नोव्हेंबर २००० रोजी उत्तराखंड राज्याची निर्मिती करण्यात आली. राज्यात तेरा जिल्हे असून २०११ च्या जनगणनेनुसार १ कोटी ११ लाख लोकसंख्या आहे.

भागिरथी, अलकनंदा, गंगा, यमुना असा मोठ्या व पवित्र नद्यांचे उगमस्थान असलेली देवभूमी हे देशातील कोट्यवधी भाविकांचे श्रध्दास्थान आहे. उत्तरखंड स्वतंत्र राज्य निर्माण होण्याअगोदर या प्रदेशात झाडे तोडायला मनाई होती.

नद्यांच्या काठावर हॉटेल्स किंवा निवासी बांधकामाला मनाई होती. मात्र स्वंतत्र राज्य झाल्यापासून नद्यांच्या किनाऱ्यांवर हॉटेल्सच्या रांगा उभ्या राहिल्या आहेत. .निवासी इमारतींची सर्वत्र गर्दीच गर्दी आहे. आजही पाच हजार गावात पोचायला रस्ते नाहीत पण पर्यटन व धार्मिक स्थळांच्या परिसरात इमारती, रस्ते, हॉटेल्स, दुकाने, सर्व सेवा सुविधांची गर्दीच गर्दी आहे.

ज्याला विकास म्हटले जाते, अशा अनेक योजना उत्तराखंडमधे राबवल्या जात आहेत. बांधकामे जोरात आहेत. उंच इमारती उभारल्या जात आहेत. सर्वत्र झाडांची बेसुमार कत्तल चालू आहे. इमारती व रस्ते उभारण्यासाठी सुरूंग लावून डोंगर खोदले जात आहेत.

डोंगर फोडून मोठ मोठे बोगदे खणले जात आहेत. हे सर्व पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी व पर्यटन व्यवसायाला भरभराट यावी या हेतूने बांधकामे चालू आहेत. हिमालयाच्या कुशीत असलेल्या देवभूमीवर सिमेंट कॉक्रीट व सुरूंगाचा अत्याचार चालू आहे. चौफेर इमारतींचे भार लादले जात आहेत.

देवभूमीत रोज हजारो मोटारी, बसेस आणि हजारोच्या संख्येने पर्यटक येत असतात. त्यांच्या सोयी सुविधांसाठी रस्ते, इमारती, हॉटेल्स, मोटेल्सची सर्वत्र बांधकामे चालू आहेत. ही मालिका गेली दोन दशकांहून अधिक काळ चालूच आहे. कितीही इमारती , रस्ते, हॉटेल्स उभारली तरी कुणाचेच समाधान होत नाही.

देवभूमीला जसे पर्वतांनी घेरले आहे तसेच पर्यटकांच्या गदीर्मुळे प्लॅस्टिकचे ढिग जिकडे तिकडे बघायला मिळत आहेत. वाहनांची गर्दी, मोटारींच्या रांगांनी देवभूमिच्या पर्यावरणावर घाला घातला आहे. सर्वत्र वाहतुकीची कोंडी आहे. उन्हाळ्यातही उत्तराखंडमधील जनतेला कधी घरात, कार्यालयात वा दुकानात पंखा लावण्याची गरज भासत नव्हती. आता सर्वत्र दिवसरात्र एअर कंडिशन्ड चालू असतात. एअर कंडिशन्ड शिवाय एक दिवसच काय पण एक तासही राहू शकत नाही, अशा पर्यटकांनी देवभूमीत गर्दी केली आहे.

देवभूमीत बाहेरच्या धनाढ्य लोकांनी जमिनी खरेदी करण्याचा सपाटा लावला आहे. जमिनीच्या खरेदीविक्रीवर कोणतेही ठोस निर्बंध नाहीत. जमिनी खरेदी करायच्या व बंगले किंवा घरे बांधायची ही तर फॅशनच बनली आहे. गेल्या काही वर्षात देशातील अन्य शहरांप्रमाणे येथेही हौसिंग कॉलनीज उभ्या राहू लागल्या आहेत. अन्य राज्यातील लोक देवभूमीत फ्लॅट खरेदी करीत आहेत. हे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

**इंडिया कॉलिंग**
**डॉ. सुकृत खांडेकर**
sukritforyou@gmail.com

परप्रांतीयांच्या अतिक्रमाणामुळे स्थानिक संस्कृती आणि भाषा यावर गंडातर आल्याची चर्चा सुरू झाली आहे. एकेकाळी उत्तराखंड हा प्रदेश साधू संतांची भूमी म्हणून ओळखला जात होता आणि उत्तराखंडला रिअल इस्टेट माफियांनी वेढले आहे. येथील सामान्य जनतेच्या मालकीच्या जमिनी कवडी मोल भावाने खरेदी केल्या जात आहेत. गरीब जनतेची लुट केली जात असतानाही सरकार मौनीबाबाच्या भूमिकेत आहे, याचेच मोठे आश्चर्य वाटते.

दिल्ली ते उत्तराखंड एक्स्प्रेस वे उभारण्यात येणार आहे. याचा दुसरा अर्थ उत्तराखंडचे प्रवेशव्दार केवळ भाविकांनाच किंवा पर्यटकांना नव्हे तर धनाढ्य लोकांना खुले केले जाणार आहे. एक्स्प्रेस वे म्हणजे विकासाचा मार्ग अशा वल्गना केल्या जात आहेत, पण देवभूमीला तो विनाशाकडे नेणारा ठरेल असे पर्यावरण रक्षकांना वाटते. आजच रोज हजारो मोटारी देवभूमीत येऊन थडकत आहेत.

दिल्ली- उत्तराखंड एक्सप्रेस वे झाल्यानंतर दर शनिवार- रविवारी आणि सुट्टीच्या दिवशी लाखो मोटारी देवभूमीच्या पर्वतांवर धावत येतील. त्यातून पर्यावरण ध्वस्त होईल आणि देवभूमीचे व्यापारीकरण झालेले बघायला मिळेल. यात स्थानिक माणूस, स्थानिक भाषा, स्थानिक परंपरा, शांतता, सुव्यवस्था, पर्यावरण, निसर्ग सौंदर्य सर्वकाही विनाशाकडे जाईल.

उत्तराखंड या पर्वतीय राज्याची क्षमता किती आहे, लोकांची गर्दी आणि वाहनांची संख्या किती असावी यावर कुठे नियंत्रण नको का? देवभूमीतील काँक्रीटची बांधकामे थांबवावीत अशा मागणने जोर धरला आहे. विकास योजनांचा भार देवभूमी किती सहन करू शकणार, याचीही मर्यादा ओळखून त्याचे उल्लंघन होणार नाही यासाठी कठोर लक्ष्मण रेषा आखणे जरूरीचे आहे.

जमिनीनीच्या खरेदी विक्रीवर कडक निर्बंध लादणे आवश्यक आहे. स्थानिक लोकांच्या भागीदारीशिवाय कोणताही निर्णय घेता येणार नाही हे तत्व पाळले तर परप्रांतीयांचे अतिक्रमण व स्थानिकांची गळचेपी थोपवता येईल अशी देवभूमी बचाव म्हणणाऱ्यांची भावना आहे.

जलावायु संकट आणि पर्यावरण जागृकता याचे शिक्षण शाळेपासूनच मुलांना देण्याची वेळ आली आहे. झाडे केवळ प्राणवायु देत नाहीत तर पर्वतांचा भक्कम आधार असतात आणि नदी केवळ पाणी देत नाही तर त्या जीवन देतात अशी शिकवणूक बालपणापासून देणे गरजेचे आहे. पर्वतांच्या रांगा म्हणजे दगडांचे डोंगर नसतात तर ती इतिहास, भूगोल आणि संस्कृतिची प्रतिके असतात ही शिकवणूक मुलांच्या मनावर बिंबवली पाहिजे.

ढगफुटीमधे धराली गाव जमिनदोस्त झाले तेव्हा गावाबाहेर असलेले व वाचलेले लोक आपल्या कुटुंबियांना चिखलातून, दलदलीतून आणि दगड धोंड्यांच्या ढिगातून शोधण्यासाठी जीवाचे रान करीत होते. धरालीवर आलेले संकट ही काही शेवटची घटना नव्हे, विकासाच्या नावाखाली देवभूमीवर यापुढेही अतिक्रमण व अत्याचार रहाणार असतील तर हल्द्वानी, देहराडून किंवा मसुरी, कोणतेच गाव किंवा शहर सुरक्षित राहणार नाही.

# इंडिया आघाडीची ममतांना गरज का आहे?

नुकत्याच पार पडलेल्या इंडिया आघाडीच्या बैठकीत काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेस या पक्षांमध्ये वेगळीच केमेस्ट्री पहायला मिळाली.राहुल गांधी आणि तृणमूल काँग्रेसचे सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांच्यातील जवळीक वाढल्याचे त्यांच्यामध्ये झालेल्या संवादातून दिसून आले.

लोकसभेतील संख्या बळानुसार तृणमूल काँग्रेस हा इंडिया आघाडीतील तिसऱ्या क्रमांकाचा पक्ष आहे त्यामुळे राहुल गांधी हे तृणमूल काँग्रेसचे महत्व जाणून आहेत. मात्र तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांचा आक्रमक स्वभाव लक्षात घेता, तृणमूल काँग्रेस आणि काँग्रेस यांच्यातील संबंध नेहमीच चढउताराचे राहिले आहेत. याला कारण अर्थातच पश्चिम बंगालमधील त्यांचे राजकारण हेच आहे.


अभय गोखले

पश्चिम बंगालमध्ये २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत, इंडिया आघाडीतील या घटक पक्षांमध्ये निवडणूक समझोता होऊ शकला नव्हता. ममता बॅनर्जी यांनी पश्चिम बंगालमधील लोकसभेच्या एकूण ४२ जागापैकी केवळ २ जागा काँग्रेसला सोडण्याची तयारी दर्शवली होती.

काँग्रेसला अर्थातच ते मान्य झाले नाही आणि त्यांच्यातील जागा वाटपाची बोलणी फिसकटली. नंतर काँग्रेसने मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालील डाव्या आघाडीशी निवडणुक समझोता केला आणि लोकसभेची एक जागा जिंकली.

काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेस यांच्यातील जागा वाटपाची बोलणी अयशस्वी ठरली त्याला ममतांची ताठर भूमिका कारणीभूत होतीच शिवाय पश्चिम बंगालमधील काँग्रेसचे तत्कालीन प्रदेशाध्यक्ष अधिररंजन चौधरी हेही तितकेच त्यासाठी कारणीभूत ठरले.

ममता बॅनर्जी आणि अधिररंजन चौधरी यांच्यातील मतभेद कधीच लपून राहिलेले नाहीत. ममता बॅनर्जी यांच्यावर टीका करण्यात ते नेहमीच आघाडीवर राहिले आहेत. काँग्रेसचे नेतृत्व ममतांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करत असताना, अधिररंजन चौधरी हे ममतांवर टिका करून, काँग्रेसचे काम अवघड करत होते. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत अधिररंजन चौधरी यांचा बेहरामपूर मतदार संघातून पराभव झाला आणि त्यांचे महत्त्व पुर्वीसारखे राहिले नाही.

काँग्रेस नेतृत्वाने लोकसभा निवडणुकीनंतर अधिररंजन चौधरी यांची प्रदेशाध्यक्ष पदावरुन उचलबांगडी केली आणि त्यांच्या जागी शुभंकर सरकार यांची नियुक्ती केली. शुभंकर सरकार हे सौम्य स्वभावाचे असून, त्यांनी ममता बॅनर्जी यांच्यावर वैयक्तिक टिका करण्याचे टाळले आहे.

ममता बॅनर्जी यांचे भाचे अभिषेक बॅनर्जी हे ममतांचे राजकीय वारसदार समजले जातात.ते पक्षाचे सरचिटणीस तर आहेतच शिवाय त्यांच्याकडे नुकतीच आणखी एक महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. लोकसभेतील तृणमूल काँग्रेसचे गटनेतेपद अभिषेक बॅनर्जी यांच्याकडे सोपविण्यात आले आहे.

पश्चिम बंगालमध्ये सध्या भाषावाद राजकारणाच्या केंद्रस्थानी आला आहे.पश्चिम बंगाल मधील जे लोक भारतातील इतर राज्यांत नोकरी धंद्यानिमित्त वास्तव्य करत आहेत, त्यांना तेथे वाईट वागणूक मिळत असल्याचा आरोप ममता बॅनर्जी यांच्याकडून करण्यात आला आहे. त्यांना बांगलादेशी नागरिक ठरवून त्यांचा छळ होत असल्याचा आरोप तृणमूल काँग्रेसकडून करण्यात आला आहे.

पुढील वर्षी पश्चिम बंगाल मध्ये विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. त्यानिमित्ताने ममतांच्या हातात चांगलेच कोलीत मिळाले आहे.त्यांनी बंगाली अस्मितेचा मुद्दा हाती घेतला असून भाषा आंदोलन सुरू केले आहे.

बिहारमध्ये एसआयआरची (विशेष सखोल फेरतपासणी) मोहीम निवडणुक आयोगाने हाती घेतली आहे.तशीच मोहीम आता पश्चिम बंगाल मध्ये राबविण्यात येणार आहे. त्याला ममतांचा सक्त विरोध आहे. या मोहीमेमुळे आपल्या व्होट बँकेला धक्का बसेल अशी भीती ममतांना वाटत आहे, त्यामुळे त्या सैरभैर झाल्या आहेत.

अशा परिस्थितीत इंडिया आघाडीतील इतर घटक पक्षांची त्यांना मदत लागणार आहे. तेंव्हा सध्यातरी त्या इंडिया आघाडीशी जुळवून घेण्याच्या मनःस्थितीत दिसत आहेत. इंडिया आघाडीला ममतांची जेवढी गरज आहे, त्यापेक्षा जास्त गरज ममतांना, इंडिया आघाडीची आहे.राहुल गांधी आणि अभिषेक बॅनर्जी यांच्यातील वाढत्या जवळीकीचे तेच मर्म आहे.

■ ■ ■

# मतदार यादीतील गोंधळ लोकशाहीसमोरील गंभीर आव्हान

लोकशाहीची ताकद तिच्या मतदारांमध्ये असते, पण जेव्हा मतदार यादीच प्रश्नचिन्हाखाली येते, तेव्हा निवडणुकीची पारदर्शकता आणि विश्वासार्हता दोन्हीवर गंभीर परिणाम होतो.

सध्या देशभरात मतदार यादीतील गोंधळावरून मोठे राजकीय वादंग सुरू आहे. सत्ताधारी पक्ष वगळता जवळपास सर्वच राजकीय पक्ष निवडणूक आयोगावर सत्ताधाऱ्यांच्या बाजूने काम करण्याचा आरोप करत आहेत. या सगळ्यात देशातील इतर महत्त्वाचे मुद्दे जणू विसरले गेले आहेत आणि फक्त मतदार यादीवर लक्ष केंद्रित झाले आहे.

निवडणूक आयोगाचे म्हणणे आहे की ते मतदार यादीतील डुप्लीकेट आणि बनावट नावे काढून टाकण्याची मोहीम राबवत आहेत, जेणेकरून निवडणुका निष्पक्ष होतील. मात्र, विरोधकांना शंका आहे की ज्या नावांची वगळणी होत आहे, त्यात बहुतेक त्यांचेच समर्थक आहेत. त्यामुळे आयोगाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

**आरोप आणि उत्तर**

निवडणूक आयोग वारंवार सांगत आहे की कुणाला आरोप करायचे असतील तर पुराव्यासह हलफनामा द्यावा, मात्र विरोधक त्यासाठी तयार नाहीत. राजकीय मंचांवरून सतत ही मागणी होत आहे की मतदार यादीची स्वच्छता पारदर्शकपणे केली जात नाही, तर ती स्वार्थी राजकारणाचा भाग आहे. त्यांनी मागणी केली आहे की मतदार यादीची तपासणी पारदर्शकपणे व्हावी आणि कोणत्याही पक्षाचे नुकसान होऊ नये.


डॉ. प्रवीण डबली
ज्येष्ठ पत्रकार
९४२२१२५६५६

**गोंधळाची मुळे**

१. लोकसंख्येची गतिशीलता झ देशात लाखो लोक दररोज रोजगार, शिक्षण किंवा इतर कारणांमुळे एका ठिकाणाहून दुस?या ठिकाणी जातात, पण जुन्या ठिकाणाहून आपले नाव काढत नाहीत.

२. बनावट कागदपत्रांची सोपी उपलब्धता झ बनावट आधार कार्ड, रेशन कार्ड आणि मतदार ओळखपत्र तयार करणे आता अवघड राहिलेले नाही.

३. व्यवस्थेतला भ्रष्टाचार झ काही ठिकाणी राजकीय दबाव, स्थानिक नेटवर्क आणि लाचखोरीमुळे खोटी नावे जोडणे किंवा खरी नावे काढून टाकणे घडते.

**सध्याच्या व्यवस्थेची कमजोर कडी**

मतदार ओळखपत्र हा सर्वात सुरक्षित ओळखपत्र मानला जाऊ शकत नाही, कारण त्यातील मोठा भाग अजूनही मॅन्युअल पद्धतीने भरला जातो.

आधार काडार्शी लिंक असूनही, मृत किंवा डुप्लीकेट मतदारांची नावे काढण्याची प्रक्रिया संथ आणि अपारदर्शक आहे.

**सुधारणा करण्याचे ठोस उपाय**

१. मतदार ओळखपत्र PAN कार्डशी लिंक करणे : PAN कार्ड तुलनेने सुरक्षित असून कर प्रणालीशी जोडलेले असल्यामुळे त्यातील डुप्लिकेशन कमी आहे.

२. १८ वर्षे पूर्ण होताच रिटर्न फाईल अनिवार्य करणे : त्यामुळे सर्व नवीन प्रौढ नागरिक सरकारी डेटाबेसमध्ये नोंदवले जातील आणि मतदार यादी आपोआप अपडेट होईल.

३. ऑनलाईन आणि रिमोट व्होटिंग : एखादा व्यक्ती आपल्या मतदारसंघाबाहेर असला तरी तो तेथूनच मतदान करू शकेल. यामुळे स्थलांतरित कामगार आणि विद्यार्थी देखील मतदान करू शकतील.

४. वार्षिक मतदार यादी ऑडिट : दरवर्षी स्वतंत्र यंत्रणेमार्फत मतदार यादीची पडताळणी.

५. डिजिटल बायोमेट्रिक व्हेरिफिकेशन : मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर बोटांचे ठसे किंवा चेहऱ्याची ओळख यांद्वारे मतदान, जेणेकरून डुप्लिकेट मतदान संपुष्टात येईल.

६. दंडात्मक तरतूद झ बनावट कागदपत्रे तयार करणारे, दुसऱ्याच्या नावाने मतदान करणारे किंवा मतदार यादीत चुकीची माहिती देणाऱ्यांवर कडक कारवाई.

**मतदानाचे प्रमाण वाढवण्याचे उपाय**

मतदानाच्या दिवशी सुट्टी आणि प्रवासाची सुविधा देणे.

ऑनलाईन मतदान किंवा पूर्वनियोजित मतदानाची सोय.

युवकांमध्ये जनजागृती मोहीम आणि सोशल मीडियावर मतदान चॅलेंज.

लोकशाही मजबूत करण्यासाठी केवळ आरोप-प्रत्यारोप पुरेसे नाहीत. मतदार यादी अचूक, सुरक्षित आणि पारदर्शक बनवणे ही देशाची प्राथमिकता असली पाहिजे. निवडणूक आयोगालाही हे समजून घ्यावे लागेल की त्याच्यावरचा विश्वास तेव्हाच टिकेल जेव्हा तो आपले सर्व निर्णय खुलेपणाने जनतेसमोर मांडेल.

जर ९९ टक्के नागरिक कोणत्याही अडथळ्याशिवाय मतदान करतील आणि प्रत्येक मत खरे असेल, तरच हे म्हणता येईल की भारताची लोकशाही केवळ जगातील सर्वात मोठी नाही, तर सर्वात मजबूत आहे.

## वाचक लिहितात

**आद्यकवी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज**

मानवतेचे मूल्य समाजाला देणारे, ज्ञानीयांचा राजा ,वेदांचा ज्ञाता, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज हे तेराव्या शतकातील प्रसिद्ध आद्य कवी आणि संत होते. त्यांचा जन्म २२ ऑगस्ट १२७५ साली श्रावण कृष्ण अष्टमीला आपेगाव, पैठण येथे झाला. निवृत्तीनाथ हे संत ज्ञानेश्वर यांचे गुरु.

निवृत्तीनाथांना नवनाथांपैकी श्री गहिनीनाथ यांनी दीक्षा दिली होती. त्यामुळे ज्ञानेश्वर हे नाथ संप्रदायाच्या शिष्य परंपरेतील होते . तसेच त्यांनी वारकरी वैष्णव संप्रदायाची मुहूर्त मेढ रोवली. 'ज्ञाना रचिला पाया तुका केलासे कळस' हे सार्थ झाले .

ज्या वारकरी संप्रदायाचे आज आपण विराट स्वरुप बघतो आहोत. त्याचा पाया ज्ञानेश्वरांनी रचला आणि बाकी संतश्रेष्ठींसह तुकाराम महाराजांनी त्याला अत्युच्च शिखरावर नेले. त्यावेळेच्या सामाजिक व्यवस्थेचे कडे तोडत ज्ञानदेवांनी सर्वसामान्यांना साधा, सरळ भक्तिमार्ग दाखवला. त्याच भक्तीची पताका आजतागायत फडकत आहे. स्वतःच्या आचरणातून त्यांनी समाजाला कृतीप्रवण केले. संत ज्ञानेश्वर महाराजांना महाराष्ट्रात भक्ती भावाने माऊली म्हटल्या जाते.

ते सतत विठ्ठल भक्तीत लीन असायचे . त्यांनी संस्कृत भाषेतील भगवद्गीता प्राकृत मराठीत लिहून ज्ञानाचे दरवाजे सर्वसामान्यांसाठी खुले केले. तीच भावार्थदीपिका म्हणजे ज्ञानेश्वरी लिहिली. अमृतानुभव, चांगदेवपासष्टी, हरिपाठ, अभंग इत्यादी काव्य स्वरूपात लिहिले. त्यांनी ज्ञानेश्वरीत ९००० ओव्या लिहिल्या. स्वतःला प्रस्थापित करताना त्यांना अनेक दिव्यातून जावे लागले. परंतु त्याही परिस्थितीत स्थितप्रज्ञ राहून त्यांनी समाज उद्धाराचे कार्य केले. त्यांनी पसायदान लिहिले ते संपूर्ण जगाच्या कल्याणाकरताच.

जो जे वांछिल! तो ते लाहो! प्राणीजात!

हेच त्यांचे ध्येय होते. केवळ मनुष्यच नव्हे, तर प्राणी, पक्षी, झाडे सर्व सुखी आणि आनंदी असावे असेच त्यांचे ईश्वराकडे मागणे होते. असे हे संतश्रेष्ठ कवी आपल्या महाराष्ट्रात जन्माला आले यासारखे दुसरे भाग्य ते काय !त्यांनी स्वतः चा नाही तर कायम विश्वाचाच विचार केला.

साहित्य आणि काव्यरूपाने भक्तीचे भांडार त्यांनी समाजाला दिले. एवढा अमूल्य ठेवा समाजाला देऊन ते विरक्तच राहिले. हरिपाठ ज्यांनी म्हटला नसेल, किंवा ऐकला नसेल त्यांनी जरूर एकदा ऐकावा. इतके चैतन्य त्यात ओतप्रोत भरले आहे .

देवाचिये द्वारी उभा क्षणभरी! हरी मुखे म्हणा!
हरी मुखे म्हणा !पुण्याची गणना कोण करी!

हरी मुखे म्हणा याचा अर्थ अखंड नामस्मरण करण्याचा प्रयत्न करा, असे माऊलींनी सांगितले आहे. तीच कलियुगातील सर्वश्रेष्ठ साधना आहे. ज्ञानेश्वर माऊली आपल्या चरणी कोटी कोटी कृतज्ञता.

■ **सौ. माधवी पत्की, नागपूर**

**लक्ष विचलीत करण्यासाठीची नाटकं**

राजकारणाचा स्तर कितीतरी खाली घसरला आहे, हे नव्याने सांगण्याची गरज नाही. विरोधक आणि सत्ताधारी नेत्यांनी एकमेकांवर टीका करताना बरीच खालची पातळी गाठली आहे . काही दिवसांपूर्वीच भाजपाच्या एका आमदाराने (माजी राज्यमंत्री) मी शिवसेनेचा बाप असल्याचे वक्तव्य केले. त्यावरून गदारोळ झाल्यानंतर त्यांनी माफी मागितली. महायुतीमध्ये सहभागी पक्ष तसेच विरोधी पक्षातीलही अनेक नेते बेताल वक्तव्य करीत सुटले आहे. मोठे नेते नंतर सांगतत, की आम्ही कान उपटले. परंतु, प्रत्यक्षात तसे नसावे. या मोठ्या नेत्यांकडून त्यांच्या चेल्या चपाट्यांना असे वक्तव्य करण्यास रान मोकळे करून दिले जात असले पाहिजे. राज्यात एक ना अनेक समस्या आहेत, त्या सोडविणे सरकारला शक्य नाही. या राज्यातील बेरोजगार आणि एकूणच समस्यांनी त्रस्त लोकांच्या संतापाचा उद्रेक होवू नये, लक्ष विचलीत व्हावे, म्हणून ही नाटकं चालली असावीत.

■ **राधेश्याम खंडाईत, नागपूर.**

# पाचव्या महिन्यात बाळाचा जन्म



**आगळंवेगळं**

अमेरिकेतील आयोवा राज्यात अवघ्या ५ महिन्यांच्या गर्भावस्थेत एका बाळाचा जन्म झाला. हे बाळ सध्या १ वर्षाचे आहे, पण आता त्याला जगातील सर्वात अकाली जन्मलेले बाळ म्हणून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सकडून प्रमाणपत्र मिळाले आहे.

डॉक्टरांनी सांगितले की जन्मावेळी बाळाचे वजन फक्त २८५ ग्रॅम होते, जे एका सफरचंदापेक्षा कमी आहे. जन्मानंतर लगेचच, बाळाला एनआयसीयू (नवजात शिशु अतिदक्षता विभाग) मध्ये नेण्यात आले, जिथे तीन डॉक्टरांच्या पथकाने त्याचे २४ तास निरीक्षण केले.

# त्वचेवरची ५ लक्षणे दर्शवतात... कोलेस्ट्रॉल वाढलं आहे



आजकाल, धावपळीच्या जीवनशैलीमुळे आणि अस्वस्थ खाण्याच्या सवयींमुळे अनेकांना आरोग्याच्या समस्या जाणवतात. एवढंच नाही तर अनेक आजारांची लक्षणेही दिसू लागतात. त्यातील एक आजार जो झपाट्याने वाढतोय आणि तो म्हणजे कोलेस्ट्रॉल. १० पैकी ६ ते ७ जणांमध्ये तरी कोलेस्ट्रॉलची समस्या दिसून येते.

कोलेस्ट्रॉल जेव्हा वाढतं तेव्हा शरीर आपल्याला काही संकेत देतं. जे ओळखणेही गरजेच असतात. शरीरात कोलेस्ट्रॉल वाढलं तर त्याचा परिणाम तुमच्या त्वचेवर देखील दिसून येतो. जर ही लक्षणे वेळेत ओळखली गेली नाहीत तर त्यामुळे गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात.

**डोळ्यांजवळ पिवळे डाग** : जर डोळ्यांभोवती किंवा पापण्यांवर लहान पिवळे डाग दिसले तर ते एक गंभीर लक्षण असू शकते. याला झेंथेलास्मा म्हणतात, जे तुमच्या रक्तातील कोलेस्टेरॉलची पातळी वाढल्याचे दर्शवते. हे डाग वेदनारहित असतात, परंतु कालांतराने वाढू शकतात आणि तुमच्या हृदयाच्या आरोग्याला धोका निर्माण करू शकतात

**हात आणि पायांवर मेणासारखे गाठी** : जर तुमच्या त्वचेवर लहान पिवळे किंवा मेणासारखे गाठी दिसू लागल्या तर ते उच्च कोलेस्ट्रॉलचे लक्षण असू शकते. याला झॅन्थोमा म्हणतात, जे शरीरात अतिरिक्त चरबी जमा झाल्यामुळे तयार होतात. या गाठी बहुतेकदा कोपर, गुडघे, हात आणि पायांवर दिसतात.

**त्वचेची जळजळ आणि खाज सुटणे** : जर तुम्हाला कोणत्याही विशिष्ट कारणाशिवाय त्वचेवर जळजळ, खाज सुटणे किंवा लालसरपणा जाणवत असेल, तर ते तुमच्या शरीरात वाढलेल्या वाईट कोलेस्ट्रॉलचे लक्षण असू शकते. उच्च कोलेस्ट्रॉलमुळे रक्तप्रवाहात अडथळा निर्माण होतो, ज्यामुळे त्वचेच्या पेशींपर्यंत पुरेसा ऑक्सिजन पोहोचत नाही आणि त्वचेला जळजळ होऊ लागते.

**थंड पाय आणि जखमा हळूहळू बरे होणे** : तुमचे पाय नेहमीच थंड वाटत असतील किंवा लहान जखमा बऱ्या होण्यास बराच वेळ लागत असेल तर हे उच्च कोलेस्ट्रॉल रक्ताभिसरणावर परिणाम करत असल्याचे लक्षण असू शकते.

**नखे व त्वचेचा रंग खराब होणे** : जर नखांचा रंग फिकट पिवळा किंवा निळा होऊ लागला असेल, तर हे देखील उच्च कोलेस्ट्रॉलचे लक्षण असू शकते. रक्ताभिसरण खराब झाल्यामुळे, नखे आणि त्वचेला पुरेसे पोषण मिळत नाही, ज्यामुळे ते कमकुवत आणि फिकट गुलाबी होऊ लागतात.

**यापासून स्वतःचे रक्षण कसे करावे?**

**निरोगी आहार** : तळलेले आणि तेलकट पदार्थ टाळा आणि फळे, भाज्या, काजू आणि फायबरयुक्त पदार्थ खा.

**नियमित व्यायाम** : शरीरातील कोलेस्टेरॉल नियंत्रणात ठेवण्यासाठी दररोज किमान 30 मिनिटे व्यायाम करा.

**धूम्रपान आणि मद्यपान टाळा** : या दोन्ही गोष्टी कोलेस्ट्रॉल वाढवतात आणि हृदयरोगांना आमंत्रण देतात.

**नियमित रक्त तपासणी करा** : तुमच्या कोलेस्टेरॉलची पातळी तपासत राहा, जेणेकरून वेळीच खबरदारी घेता येईल.

■ ■ ■

**अशोकायन**
प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## राष्ट्रभक्तीचा महापूर

वारं पाहून उफणण्यात
आम्ही आहोत वाकबदार
बघा स्वातंत्र दिनीआमच्या
राष्ट्र भक्तिला कशी येते धार..

वर्षातून दोन वेळा
येते भौ भरती
बाकी मग वर्षभर
आहोटीच ओहोटी ..!

तिसरी शक्ति बनण्याचे
होण्या स्वप्न साकार
करावे लागेल राष्ट्रनिष्ठाने
भ्रष्टाचार मुक्त व्यवहार..!

# अंबरनाथ एमआयडीसीतील १४०० कंपन्या परराज्यात जाणार?

## गुंडगिरी, दलालांमुळे उद्योजक हवालदिल

**अंबरनाथ, दि. १२ : प्रतिनिधी**

आनंद नगर एमआयडीसी मधील कारखानदारांना आवश्यक सुविधा मिळवण्यासाठी झगडावे लागते. इतकेच नाही तर स्थानिक दलालांमुळे जागेचे भाव वाढून, बांधकामासाठी लागणारे साहित्य देखील माथी मारण्यासाठी दादागिरी व दहशत पसरवली जात असल्याने येथील कारखानदार हवालदिल झाले आहेत. त्यामुळे येथील बहुतांश कंपन्या गुजरात व तेलंगणा येथे स्थलांतरित होण्याच्या मानसिकतेत असल्याचा इशारा अंबरनाथ डिशनल मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन अर्थात आमा संघटनेने दिला आहे.



सोमवारी आमा संघटनेने घेतलेल्या पत्रकार परिषदेत आपली व्यथा मांडली. अंबरनाथ आनंद नगर एमआयडीसीत साधारण १४०० हून जास्त कंपन्या आहेत. या कंपन्यांच्या माध्यमातून ५० ते ६० हजार कोटी रुपयांची उलाढाल वर्षाकाठी होत असतानाही येथील कंपन्यांना आवश्यक सुविधा पुरवण्यात राज्य शासन उदासीन असल्याने कारखानदार हवालदिल झाले आहेत.या अवस्थेची कामगार मंत्री व राज्य सरकार यामध्ये कोणतीही दखल घेत नसल्याने कारखानदार नाराजी व्यक्त करत आहेत.

सुविधांचा अभाव व दलालांचा प्रचंड त्रास यामुळे याआधी काही मोठ्या कंपन्या गुजरात व तेलंगणा येथे स्थलांतरित झाल्या आहेत. त्यामुळे ८ ते १० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक परराज्यात गेली असल्याचे आमा संघटनेचे अध्यक्ष उमेश तायडे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

# तीन महामंडळाच्या कर्ज योजनेतील जामिनदारांच्या अटी शिथिल, शासन हमीस पाच वर्षे मुदतवाढ

## कर्ज प्रक्रिया सुटसुटीत होणार, प्रलंबित प्रकरणे निकाली निघण्यास चालना मिळणार

**मुंबई, दि. १२ : प्रतिनिधी**

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ यांच्या विविध योजनांतर्गत कर्ज प्रकरणातील जामिनदाराबाबतच्या अटी आणि शर्तीमध्ये सुधारणा करण्यास तसेच महामंडळाना देण्यात येणाऱ्या शासन हमीस पाच वर्षांची मुदतवाढ देण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निर्णयामुळे लघुउद्योजकांना कर्ज घेण्याची प्रक्रिया आधिक सुटसुटीत होणार तसेच प्रलंबित प्रकरणे निकाली निघण्यास चालना मिळणार आहे.

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाकडून स्वतःच्या आणि राष्ट्रीय महामंडळाच्या विविध योजना राबविण्यात येतात. यामध्ये मुदत कर्ज योजना, ऋण योजना आणि बीज भांडवल योजना यांचा समावेश आहे.

महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्ज योजनेसाठी लाभार्थ्यांच्या मालमत्तेवर किंवा एका जामिनदाराच्या स्थावर मालमत्तेवर बोजा चढविण्यास मान्यता देण्यात आली. दोन ते पाच लाखापर्यंतच्या कर्जासाठी पूर्वी दोन जामिनदारांची अट होती. आता त्याऐवजी एका जामिनदारांची तरतूद करण्यात आली आहे. हा जामिनदार स्थावर मालमत्ता किंवा नावावर जमीन असलेला किंवा खासगी क्षेत्रातील नोकरदार किंवा शासकीय, निमशासकीय, शासकीय अनुदानित संस्थेतील नोकरदार असावा, अशी तरतूद करण्यात आली आहे. याचबरोबर लाभार्थी आणि जामिनदारांच्या स्थावर मालमत्तेवर बोजा चढविला जाणार आहे.

राष्ट्रीय अनुसूचित जाती मागासवर्ग वित्तीय विकास महामंडळ (NSCFDC), राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्तीय विकास महामंडळ (NSKFDC) यांच्या योजना राज्यातील महामंडळामार्फत राबविण्यात येतात. यासाठी राष्ट्रीय महामंडळाकडून राज्य महामंडळास कर्ज स्वरूपात निधी उपलब्ध करून दिला जातो. या कर्जनिधीमधून मुदती कर्ज योजना, बीज भांडवल योजना लघुऋण वित्त योजना, तसेच शैक्षणिक कर्ज योजना राबविल्या जातात.

या योजना राबविण्यासाठी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळास ६०० कोटी, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळास १०० कोटी, आणि संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळास ५० कोटी रुपयांच्या शासन हमीस पाच वर्षांची मुदतवाढ देण्यात आली. यामुळे प्रलंबित कर्ज प्रकरणे निकाली निघतील त्याचबरोबर नवीन लाभार्थ्यांनाही कर्ज मिळेल.

# मुंबईत 'पारंपरिक खेळांचा महाकुंभ'

## लेझिम, फुगडी, पावनखिंड दौड आणि मल्लखांबाचा जल्लोष

**मुंबई, दि. १२ : प्रतिनिधी**

मुंबईत शिवकालीन परंपरेचा साक्षात्कार घडवणारा ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव पारंपरिक क्रीडा महाकुंभ १३ ऑगस्टपासून दणाणून उभा राहणार आहे. कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली कुर्ल्यातील जामसाहेब मुकादम शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे मैदान या भव्य सोहळयाचे केंद्रबिंदू ठरणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतिदिनानिमित्त या मैदानाचे नामकरण पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर देशी खेळांचे मैदान असे होणार आहे.

राज्याचे क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन होणार असून, मुख्यमंत्री फडणवीस यांचा व्हिडिओ संदेश खेळाडूंचा जोश वाढवणार आहे. ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांचे सुपुत्र रणजित जाधव यांच्या विशेष उपस्थितीने कार्यक्रम अधिकच ऐतिहासिक होणार आहे. या महाकुंभात लेझिम, फुगडी, लगोरी, विटी-दांडू, पावनखिंड दौड, पंजा लढवणे, रस्सीखेच, कुस्ती आणि मल्लखांब अशा अस्सल देशी खेळांचा थरार रंगणार आहे. काळाच्या ओघात हरवणाऱ्या या खेळांना पुनरुज्जीवित करण्याचा निर्धार मंत्री लोढा यांनी व्यक्त केला असून, "आपली संस्कृती व परंपरा हीच खरी ताकद आहे. पुढच्या पिढीला शिवकालीन मर्दानी खेळांची ओळख करून देण्याची हीच वेळ आहे," असे ते म्हणाले.

क्रीडा भारतीच्या माध्यमातून आतापर्यंत तब्बल १५ हजारांहून अधिक स्पर्धकांनी नोंदणी केली आहे. शाळा, महाविद्यालये, आयटीआय आदी संस्थांनी मोठ्या उत्साहाने सहभागाची तयारी दर्शवली आहे. इच्छुक संस्थांनी ९८६७०६६५०६ किंवा ९७६८३२७७४५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

यापूर्वीही लोढा यांच्या पुढाकाराने झालेल्या पारंपरिक क्रीडा स्पर्धांना मिळालेला प्रचंड प्रतिसाद पाहता, यंदाचा महाकुंभ केवळ स्पर्धा नाही तर सांस्कृतिक जागरणाचा विराट सोहळा ठरणार आहे.

# राज्यातील रास्त भाव दुकानदारांच्या मार्जिनमध्ये वाढ

## क्विंटल मागे 150 ऐवजी 170 रुपये मिळणार

**मुंबई, दि. १२ : प्रतिनिधी**

राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकारकांना अन्नधान्य व साखरेचे वाटप करणाऱ्या रास्त भाव दुकानदारांच्या मार्जिनमध्ये क्विंटल मागे २० रुपयांची वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. त्यामुळे आता दुकानदारांना क्विंटलमागे वीस रुपयांची वाढ मिळाल्याने यापूर्वीच्या १५० रुपयांऐवजी १७० रुपये मार्जिन मिळणार आहे.

अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजना शिधापत्रिकाधारकांना ५३ हजार ९१० रास्तभाव दुकानदारांमार्फत ई-पॉस मशिनद्वारे बायोमेट्रीक पडताळणी करून अन्नधान्य, साखर व इतर वस्तुंचे वितरण करण्यात येते.

या दुकानदारांना केंद्र शासनाकडून ४५ रुपये आणि राज्य शासनाकडून १०५ रुपये असे एकूण क्विंटलमागे १५० रुपये मार्जिन म्हणून दिले जात होते. या मार्जिन रकमेत वाढ करण्याची विनंती या दुकानदारांच्या संघटनांकडून करण्यात येत होती. त्यानुसार या मार्जिनमध्ये क्विंटलमागे २० रुपयांची वाढ करण्यास मंजुरी देण्यात आली. त्यानुसार क्विंटलमागे रास्त भाव दुकानदारांना १७० रुपये (१७०० रुपये प्रति मेट्रीक टन) असे मार्जिन देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे दरवर्षी सुमारे ९२ कोटी ७१ लाख रुपयांची अतिरिक्त तरतूद केली जाणार आहे.

# पतीमध्ये शुक्राणूंची संख्या कमी, म्हणून गर्भधारणेसाठी सासऱ्यानेच केला सुनेवर बलात्कार

**वडोदरा, दि. १२ : प्रतिनिधी**

पतीमध्ये शुक्राणूंची संख्या कमी असल्याने मूल होऊ शकत नाही, म्हणून चक्क सासऱ्याने आणि नणंदेच्या पतीनेच सुनेवर वारंवार बलात्कार केल्याची धक्कादायक आणि माणुसकीला काळिमा फासणारी घटना गुजरातच्या वडोदरा शहरात उघडकीस आली आहे. या अत्याचारातून पीडित महिला गर्भवती राहिली, मात्र दुर्दैवाने तिचा गर्भपात झाला. यानंतर पीडितेने हिंमत दाखवून पोलिसांत धाव घेतली. पोलिसांनी सासरा आणि नातेवाईकाविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे. पीडित महिला ४० वर्षाची आहे. तिने नवापुरा पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, फेब्रुवारी २०२४ मध्ये तिचा विवाह झाला होता. लग्नानंतर काही आठवड्यांनंतर सासरच्यांनी तिला सांगितले की ती तिच्या वयामुळे गर्भवती राहू शकत नाही आणि तिला उपचार घेण्याचा सल्ला दिला. वैद्यकीय तपासणीत पीडितेच्या पतीच्या शुक्राणूंची संख्या (sperm count) खूपच कमी असल्याने ते वडील होऊ शकत नसल्याचे स्पष्ट झाले.

वैद्यकीय सल्ल्यानुसार तिने इन व्हिट्रो फर्टिलायझेशन (IVF) केले, परंतु ते यशस्वी झाले नाही. त्यानंतर तिने पुढील उपचार घेण्यास नकार दिला आणि मूल दत्तक घेण्याचा सल्ला दिला, परंतु तिच्या सासरच्यांनी याला ठाम नकार दिला.

जुलै २०२४ मध्ये पीडिता तिच्या खोलीत झोपली असताना, सासऱ्याने तिच्या खोलीत प्रवेश करून तिच्यावर अत्याचार केला. तिने मदतीसाठी आरडाओरड केली असता, सासऱ्याने तिला मारहाण केली. हा धक्कादायक प्रकार तिने पतीला सांगितला असता, त्याने तिलाच गप्प राहण्यास सांगितले. "मला मूल हवं आहे, त्यामुळे जे घडलं त्याबद्दल कोणालाही काही सांगायचं नाही," इतकेच नाही, तर "जर तू याबद्दल कोणाला सांगितले, तर तुझे खासगी फोटो आणि व्हिडिओ व्हायरल करेन," अशी धमकी देत पतीने तिला ब्लॅकमेल केले. यानंतरही सासऱ्याने तिच्यावर अनेकवेळा बलात्कार केला, पण ती गर्भवती राहिली नाही. डिसेंबर २०२४ मध्ये तिच्या नणंदेच्या पतीनेही तिच्यावर बलात्कार केला आणि त्यानंतर त्यानेही अनेकदा हे अमानुष कृत्य केले.

या अत्याचाराच्या मालिकेनंतर अखेर जून महिन्यात पीडित महिला गर्भवती राहिली. मात्र, जुलै महिन्यात तिचा गर्भपात झाला. या घटनेने खचलेल्या पीडितेने पोलिसांत धाव घेतली. पोलिसांनी या प्रकरणाची प्राथमिक चौकशी करून रविवारी गुन्हा दाखल केला.

# स्थानिक निवडणुकीत 'एकला चलो रे'

## काँग्रेसचा स्वबळाचा नारा, वडेट्टीवारांनी दिला मविआला इशारा

**पुणे, दि. १२ : प्रतिनिधी**

देशात 'इंडिया' आणि राज्यात 'महाविकास आघाडी'ची मोट बांधली जात असतानाच, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मात्र काँग्रेसने 'एकला चलो रे' चा नारा दिला आहे. 'आमचा वाईट काळ संपला आहे, आता आम्हाला स्वबळावर लढू द्या,' अशा थेट शब्दांत काँग्रेसचे विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाकडे मागणी केली आहे. त्यांच्या या विधानामुळे आगामी स्थानिक निवडणुकांमध्ये महाविकास आघाडीत सर्वकाही आलबेल नसल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

पुण्यात आयोजित काँग्रेसच्या नवनियुक्त प्रदेश पदाधिकाऱ्यांच्या कार्यशाळेच्या समारोप सत्रात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर पक्षाचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला उपस्थित होते, ज्यांच्यासमोर वडेट्टीवार यांनी ही आग्रही भूमिका मांडली.

### स्वबळाचा आग्रह का?

महाविकास आघाडी म्हणून निवडणुका लढवण्याऐवजी स्वबळावर निवणुकीला सामोरे जाण्याची काँग्रेसची इच्छा का आहे, हे वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले, ''देशासाठी 'इंडिया आघाडी' आणि राज्यासाठी 'महाविकास आघाडी' गरजेची आहे, हे मान्य. पण स्थानिक पातळीवरील राजकीय समीकरणे वेगळी असतात. त्यामुळे परिस्थितीनुसार निर्णय घ्यायला हवा.''



आपल्या मागणीला बळकटी देण्यासाठी त्यांनी मुंबई महानगरपालिका निवडणुकीचे उदाहरण दिले. ते म्हणाले, ''मागच्या निवडणुकीत आम्ही मुंबईत स्वबळावर लढून ३७ जागा जिंकल्या होत्या. हा आकडा विसरता येणार नाही. राजकारणात वाईट काळ येतो आणि जातो. आता आमची ताकद वाढली आहे आणि आम्हाला स्वबळावर लढण्याची संधी द्यावी, ही आमची भावना आहे.''

### ठाकरे बंधूंवर सूचक भाष्य

सध्या राजकीय वर्तुळात उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या संभाव्य युतीची चर्चा सुरू आहे. यावर विचारले असता वडेट्टीवार यांनी सावध पवित्रा घेतला. ते म्हणाले, ''उद्धव ठाकरे हे महाविकास आघाडीचा अविभाज्य भाग आहेत. पण दोन भावांच्या एकत्र येण्याची चर्चा सुरू आहे, तर त्यांना आधी एकत्र येऊ द्या. त्यानंतर पुढचं पुढे बघू.'' त्यांच्या या विधानाने राजकीय निरीक्षकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

यावेळी बोलताना वडेट्टीवार यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांचे महत्त्व अधोरेखित केले. ''पक्षाला कोणताही मोठा नेता तारू शकत नाही, तर तळागाळात काम करणारा कार्यकर्ताच तारू शकतो,'' असे सांगत त्यांनी पक्षाच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्या कामाचे कौतुक केले.

एकंदरीत, वडेट्टीवार यांच्या या स्पष्ट मागणीमुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महाविकास आघाडीतील जागावाटपाचा तिढा अधिकच गुंतागुंतीचा होण्याची शक्यता आहे. काँग्रेसचा हा स्वबळाचा आग्रह मित्रपक्ष कसा स्वीकारतात, यावरच आघाडीचे स्थानिक पातळीवरील भवितव्य अवलंबून असेल.

## आज का अंदाज

**बुधवार १३ ऑगस्ट २०२५**

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ७ | ८ | २ | ५ | ६ | ७ |
| १५५ | १६७ | २६९ | ५६७ | २०० | १७७ | १२३ | २५० |
| ३८० | ३५६ | ४५८ | ११६ | ४८० | ३६६ | २६८ | ३६८ |
| २९० | २२० | ३६८ | २२४ | ५७० | ४४७ | ७९० | १३३ |
| १० | ४० | ७३ | ८३ | २९ | ५९ | ६० | ७० |
| १२ | ४२ | ७५ | ८५ | २३ | ५३ | ६८ | ७८ |
| १६ | ४६ | ७९ | ८९ | २१ | ५१ | ६४ | ७४ |

**१३ ऑगस्ट : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ३१ | ६० | ९० |
| २५ | ३५ | ६८ | ९८ |
| २७ | ३७ | ६४ | ९४ |
| ४९९ | २२९ | १५० | १२६ |
| ६६० | ६८९ | २६८ | २८९ |
| ५८९ | ३५५ | ३४९ | ४७० |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## ही सूनबाई अभिनय आणि नृत्य करु शकतेच आणि गाणेही गाऊ शकते!

**मुंबई, १२ऑगस्ट:** झीटीव्ही आपला आगळा-वेगळा रिॲलिटी शो छोरियाँ चली गाँवमधून प्रेक्षकांना भारतीय ग्रामीण जीवनाशी जोडत आहे. नेहमीप्रमाणे करिष्माई रणविजय सिंघाच्या सूत्रसंचालनाखाली हा शो ११ उत्साही महिला सेलिब्रिटींना एकत्र आणतो अनिता हसानंदानी, ऐश्वर्या खरे, अंजुम फकीह, कृष्णा श्रॉफ, डॉली जावेद, एरिका पॅकार्ड, रमीत संधू, रेहा सुखेजा, सुमुखी सुरेश आणि लोकप्रिय जुळ्या बहिणी समृद्धी व सुरभी मेहरा (चिंकी-मिंकी). या सर्वजणी आपले गतिमान शहरी जीवन मागे सोडून, गावाच्या साधेपणात आणि आव्हानात पाऊल टाकतात. कोणतेही गॅजेट्स किंवा शहरी सोयी नसताना, गायीचे दूध काढणे, चुलीवर स्वयंपाक करणे, आणि रोजच्या घरकामाची जबाबदारी सांभाळणे अशा अनिश्चित आणि कधीकधी कठीण ग्रामीण वास्तवाच्या पार्श्वभूमीवर त्या स्वतःला आपल्या मर्यादांच्या पलीकडे



ढकलतात.

गावातील घरे सोडून नव्या बसेऱ्याकडे जाताना स्पर्धक मुलींसमोरचा दैनंदिन टास्क होता मिस बामुलियाचा किताब जिंकण्यासाठी गावकऱ्यांचे मनोरंजन करणे. त्यांनी संगीत आणि हास्याने भरलेली एक हृदयस्पर्शी संध्याकाळ साकारली. या वेळी स्पर्धक ऐश्वर्या खरेने तू मेरा हमदर्द है हे गाणे मनापासून गाऊन सगळ्यांना मंत्रमुग्ध केले आणि ते आपल्या सहस्पर्धक एरिका पॅकार्डला अर्पण केले ज्यामुळे एरिकाच्या डोळ्यांत अश्रू आले. ऐश्वर्याने सांगितले की गाणे तिच्या रक्तात आहे तिच्या वडिलांकडून मिळालेली एक हृदयस्पर्शी देणगी. एरिकानेही मनमोकळेपणाने व्यक्त केले की तिच्या अपेक्षेपेक्षाही खोल नाते ऐश्वर्याशी जुळले आहे. जो फक्त एक टास्क म्हणून सुरू झाला, तो अखेरीस एकत्रितपणाचा आणि आत्मीयतेचा सुंदर उत्सव ठरला.

## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस थोडा चढ-उतार असणारा असू शकतो. व्यवसायात काही आर्थिक अडचणींचा सामना करावा लागेल. पण धीर धरा. या परिस्थितीत सुधारणा होईल. कामाच्या ठिकाणी संवाद ठेवणे महत्त्वाचे आहे.

**वृषभ :** कामाच्या निमित्ताने तुम्हाला प्रवासाची संधी मिळू शकते. आरोग्याच्या बाबतीत बाहेरचे खाणे टाळा. तुमच्या जोडीदारासोबत वेळ घालवण्यासाठी चांगला दिवस आहे. आरोग्याची काळजी घ्या.

**मिथुन :** आज कामाच्या ठिकाणी काही विशेष जबाबदारी मिळू शकते, ज्यामुळे तुमच्या प्रगतीचा मार्ग मोकळा होईल. अविवाहित लोकांना आनंदाची बातमी मिळण्याची शक्यता आहे.

**कर्क :** आजचा दिवस खूप महत्त्वाचा असेल. आज तुम्ही तुमच्या कलागुणांना वाव द्याल. आर्थिक बाबतीत तुम्हाला नशिबाची साथ मिळू शकते. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला आहे.

**सिंह :** आजचा दिवस खूप चांगला आहे. करिअरच्या क्षेत्रात नवीन संधी मिळतील. आज प्रमोशन होण्याची शक्यता आहे. आर्थिकदृष्ट्या दिवस शुभ आहे. पण तुमच्या आरोग्यावर लक्ष ठेवणे महत्त्वाचे आहे.

**कन्या :** आजचा दिवस नेहमीसारखा असेल. पण व्यवहारात काळजी घेणे आवश्यक आहे. कोणताही मोठा निर्णय घेण्यापूर्वी घरातील वडीलधाजया व्यक्तींचा किंवा तज्ज्ञांचा सल्ला घ्या.

**तुळ :** अभ्यासावर लक्ष केंद्रित करा. यश मिळेल. तणाव कमी करण्यासाठी योगा आणि ध्यान करा. करिअरच्या दृष्टीने आजचा दिवस चांगला आहे. तुमच्या प्रयत्नांना यश मिळेल. कामात खंड पडू देवू नका.

**वृश्चिक :** आजचा दिवस उत्तम असणार आहे. तुमच्या करिअरवर लक्ष केंद्रित करा. बचत करण्यावर भर दिल्यास आर्थिक स्थिती सुधारेल. तुमच्या जोडीदारासोबत वेळ घालवा.


**धनु :** नोकरीमध्ये तुमची काम करण्याची शैली प्रशंसनीय असेल. शरीराला तंदुरुस्त ठेवण्यासाठी नियमित व्यायाम करा. प्रकृतीकडे लक्ष पुरवावे लागेल. नियमित तपासणी करणे फायदेशीर ठरेल.

**मकर :** आज तुम्ही नवीन व्यवसाय किंवा व्यापार सुरू करू शकता. व्यावसायिक कामे पुढे ढकलणे टाळा. अन्यथा, यामुळे तुमच्या कुटुंबात तणाव निर्माण होऊ शकतो. वाहन चालविताना काळजी घ्या.

**कुंभ :** आरोग्याची काळजी घ्या. योग्य विश्रांती घ्या. जीवनात काही महत्त्वाचे बदल घडू शकतात. राजकारणासारख्या विषयांपासून दूर राहणे तुमच्यासाठी चांगले राहील. धनलाभ संभवतो.

**मीन :** आरोग्याच्या लहान-मोठ्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. तुमच्या जीवनात आनंद आणि उत्साह टिकून राहील. मानसिक शांतता राखण्यासाठी योग करा. अचानक संपतती मिळण्याचे योग दिसतात.

## शब्दकोडे क्रमांक २१९०



**आडवे शब्द :-**

१) दुसऱ्याच्या द्रव्याचा अपहार करणे (वा.प्र.)
४) राखरांगोळी होणे
८) चामखीळ
१०) च्या साठी
११) खंदक
१२) पडलेला (वाडा)
१३) फुलातून काढलेले सुगंधी द्रव
१४) पत्र(इं.)
१६) पुष्कळ
१७) वस्तुनिर्मितीची जागा
१९) कुत्रा
२०) स्वच्छ
२१) सुकुमार
२३) संगीतातील एक राग
२५) दरवाजा
२७) एक चर्मवाद्य
२८) बारीक केस
२९) घोडा
३०) नाकावरील एक छोटा दागिना
३२) मालक
३४) समशेर
३७) खरकट्याचा प्रचंड ढीग
३९) वेळप्रसंग ओळखणारा
४१) मलई
४३) खिडकीला असलेला पारदर्शक घटक
४५) खरगोश
४६) मनुष्यजात
४७) भ्रमर
४९) धपाटा, तडाखा
५०) पवित्र
५१) ढीग
५२) सावली
५३) तृप्त न होणारी भूक
५५) खसखस लावलेला गोड पदार्थ
५७) संगीतातील एक राग
५९) धष्टपुष्ट
६१) स्त्री आणि पुरुष
६३) अगदी क्षुल्लक किमतीचे
६५) अजगर
६६) नवऱ्याची दुसरी पत्नी
६७) च्या सह, चूकच्या उलट
६९) अंग, कपडे स्वच्छ करण्याचे गुळगुळीत साधन
७०) क्वचित
७२) हात
७३) मर्यादा, सीमा
७५) मला
७६) फांदी तुटतानाचा आवाज
७७) ऐट, दिमाख
७८) एक पालेभाजी

**उभे शब्द :-**

१) खजिना, द्रव्यनिधी
२) शिक्षक
३) आवाज, ध्वनी
४) उत्कर्ष, चलती
५) सर्प
६) तात्काळ
७) नकारच्या विरुद्ध
८) माजलेला
९) मंत्रीमंडळ
११) ओरखडा
१३) समजण्यास कठीण, दुर्बोध
१५) डोक्याचा केशविरहित भाग
१६) अवधान, चित्त
१८) विशेष
१९) नाकावाटे शरीरात हवा घेण्याची क्रिया
२२) संधी, मुभा
२३) च्या तर्फे
२४) केसांचा भांग पाडण्याचे एक साधन
२५) आग अग्नी(इं.)
२६) केर
३१) जुगाराचा एक प्रकार, माठ
३२) हिंमत
३३) साखरेची फुगीर वडी
३५) किंचित छोटासा
३६) पृथ्वी
३८) समोरच्याच्या मनातील विचार ओळखणारा
४०) वेशीचा रक्षक, पाटलाचा हरकाम्या नोकर
४२) यमाकडून पापी लोकांना दिल्या जाणाऱ्या वेदना
४४) नशा आणणारा एक पदार्थ
४६) हाणामारी
४८) आवड, द्रवपदार्थ
५०) गवताचे पान
५४) वरपांगी
५५) बहुमोल
५६) सामान्य
५८) माजघर, भोजनशाळा
६०) निर्धन
६२) रममाण, निमग्न
६३) मकबरा
६४) एक पांढरे सुगंधी फूल
६५) पत, नाव, अब्रू
६६) विनाहेतू, सोपे, अकारण
६८) नगद, रोख रक्कम
६९) सरकविणारे मलशुद्धी करणारे
७०) सारखा
७१) गरज
७३) पारद
७४) बोलणे, जिव्हा

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# राजकारणाच्या आखाड्यातही बाजी मारणारे पैलवान आ. राहुल ढिकले

राजकारणात क्वचितच लोक स्वतःच्या पायावर उभे राहुन पुढे जाताना दिसतात. तर काहींना घरातूनच राजकारणाचे धडे मिळत असतात. त्यातील एक ॲड. राहुल ढिकले हेही आहेत. वकिलीचे शिक्षण घेत वडिलांच्या पाऊलावर पाऊल ठेवत राजकारणात उतरलेले राहूल ढिकले यांनी स्वर्गीय ढिकले यांच्या मुत्सद्दी राजकारणानंतर महानगरपालिकेत प्रवेश करून नगरसेवक, स्थायी समिती सभापती ते विधानसभा आमदार अशी यशस्वी वाटचाल सुरू केली. आज लोकांची कामे करणारा आमदार म्हणून जनता त्यांच्याकडे विश्वासाने बघत आहे. आ. ॲड. राहूल ढिकले यांनीही जनतेच्या विश्वासाला तडा न जाऊ देता जनसेवेचा वसा सुरूच ठेवला आहे. राजकारणात यशस्वी रणनीती कशी आखायची हे सहकारमहर्षी स्व. उत्तमराव ढिकले यांच्याकडून शिकले पाहिजे आणि तीच रणनीती ॲड. राहुल ढिकले आखताना दिसत आहेत. त्यामुळेच नगरसेवक, स्थायी समिती सभापती, नंतर सलग दुसऱ्यांदा मोठ्या मताधिक्याने आमदारकी मिळवून पुन्हा विधानसभेत पोहचले. स्व. उत्तमराव ढिकले यांची राजकीय कारकीर्द बघितली तर त्याच पद्धतीने राजकारण करून खऱ्या अर्थाने ॲड. राहुल हेच राजकीय यशस्वी वारसदार ठरले आहेत! स्व. उत्तमराव ढिकले यांच्या पाऊलावर पाऊल ठेवत ॲड. आ. राहुल ढिकले यांना क्रीडा क्षेत्राची





आवड लागली होती. वयाच्या १६ व्या वर्षी कुस्ती स्पर्धेत नाशिक महापौर केसरीमध्ये तर १९९७ ते २००० सलग ३ वर्षे महाराष्ट्र केसरी नाशिक शहराचे प्रतिनिधित्व केले. त्यानंतर १९९८ ते २००१ दरम्यानच्या काळात कुस्ती स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले. स्वर्गीय दादांचा वारसा पुढे चालवत त्यांनी राजकारण आणि समाजकार्यात स्वतःला झोकून दिले. रक्तदान शिबिर, दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना व रुग्णांना शासकीय स्तरावरील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न असो व इतर काम असो, त्यांनी ती पूर्ण केली. शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील गुणवंतांचा गौरव तसेच स्व. उत्तमराव ढिकले सार्वजनिक वाचनालयाच्या माध्यमातून शिक्षक गौरव समारंभ विद्यार्थी गुणगौरव समारंभ त्यांनी सुरू ठेवले आहेत. राजकारणाची सुरुवात त्यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या माध्यमातून केली. त्यांनी प्रथम महानगरपालिकेत नगरसेवक आणि स्थायी समिती सभापती म्हणून काम केले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या प्रदेश उपाध्यक्षपदाची जबाबदारी पार पाडत असताना त्यांना आमदारकीचे वेध लागले होते. त्यांनी पूर्व विधानसभा मतदारसंघ पिंजून काढण्यास सुरुवात केली होती.





मंथन

राजेंद्र सूर्यवंशी

९०११११९१७८०

मतदारसंघ फिरत असताना मात्र कोणत्या पक्षाकडून निवडणूक लढवणार हे न सांगता केवळ मतदारांशी संपर्क देण्यावर त्यांनी भर दिला. मतदारांच्या संपर्कात राहण्यासाठी त्यांनी मोबाइल नंबर जमा करून घरात किती सदस्य आहेत. त्यांची जन्मतारीख काय याची नोंद घेतली. त्यानंतर ज्यांचे वाढदिवस आहेत अशांना शुभेच्छा, जे लहान आणि विद्यार्थी आहेत अशांना घरोघरी लहानशा भेटवस्तू पाठवून त्यांचा आनंद द्विगुणित केला. २०१९ ची विधानसभा निवडणूक प्रक्रिया जाहीर झाल्यावर त्यांनी विविध पक्षांकडे चाचपणी सुरू ठेवली होती. तर भाजपाकडे उमेदवारीसाठी मोठी स्पर्धा सुरू होती. त्यामुळे त्यांनी वाऱ्याची दिशा अचूक ओळखून भाजपाची उमेदवारी गळ्यात पाडून घेत प्रतिस्पर्धी उमेदवारांचा पराभव करत विधानसभा गाठली.

२०२४ च्या निवडणुकीतही भाजपकडे अनेक इच्छुकांनी उमेदवारी मिळविण्यासाठी प्रयत्न केले. परंतु पक्षाने त्यांच्यावर विश्वास ठेवून त्यांना पहिल्याच यादीत पुन्हा उमेदवारी जाहीर केली. विधानसभा निवडणुकीचे वेध काही महिन्यांपूर्वीच सुरू झाले होते. त्यामुळे त्यांनी पुन्हा 'आमदार आपल्या दारी' ही संकल्पना राबवून मतदारांच्या घरी भेटी घेतल्या. गेले तीन ते चार महिने त्यांनी पूर्व मतदारसंघात मोठ्या प्रमाणात मंदिर, सामाजिक सभागृह, रस्ते आदींना प्राधान्य देत कामांचे उद्घाटन केले. केवळ उद्घाटन न करता ते काम पूर्णत्वास नेण्यासाठी प्रयत्न केले. त्यातच पंचवटीतील तपोवनात श्रीरामांची सुमारे ७१ फूट उंचीची मूर्ती तयार करून तिचा लोकार्पण सोहळा केला. मतदारसंघात म्हसरूळ परिसरात १०० विद्यार्थी व ६०० खाटांचे सुसज्ज असे वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर रस्त्यावरील वाहतूक कोंडी व अपघात रोखण्यासाठी उडाणपूल आदी महत्त्वाची कामे मार्गी लावली. त्यामुळेच खऱ्या नाशिक पूर्व मतदारसंघातील आखाड्यात बाजी मारत ते पैलवान ठरले.

### स्व. ॲड. उत्तमराव ढिकले यांची राजकीय कारकीर्द

अगदी विद्यार्थी दशेपासून नेतृत्वगुण असलेल्या स्वर्गीय ॲड. उत्तमराव ढिकले यांनी महाविद्यालयीन काळातच जीएसपदापासून सुरुवात केली. त्यांनी राजकारण आणि सहकार क्षेत्रात आपल्या कामाचा ठसा वेगळ्या पद्धतीने उमटवला. १९६७ साली नगरपालिकेवर निवडून येत वयाच्या २७ व्या वर्षी नाशिक नगरीचे नगराध्यक्षपद भूषविले. त्यानंतर १९८० पर्यंत ते सलग नगरपालिकेवर निवडून आले होते. नाशिक महानगरपालिकेची निवडणूक १९९२ साली झाल्यावर पहिली निवडणूक लढवून अपक्ष नगरसेवक म्हणून निवडून आले. त्यानंतर १९९५ साली महापौर झाल्यावर त्यांची घोडदौड अशीच सुरू राहिली. लोकसभा आणि विधानसभेच्या कार्यकाळात त्यांनी उत्कृष्ट संसदपटू आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आवाज उठवणारे नेते अशी ओळख त्यांनी निर्माण केली होती. नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत सलग ४२ वर्षे संचालक राहिले.

## महत्त्वाचे

### नासाकाच्या माजी विद्यार्थ्यांनी जपला दातृत्वाचा अनोखा वसा!

**नाशिकरोड ।** ज्या शाळेत आपले शिक्षण झाले, ज्या शाळेतील संस्कारांची शिकवण घेऊन आपण स्वतःच्या पायावर भक्कमपणे उभे आहोत. त्या शाळेतील गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू




नये; म्हणून माजी विद्यार्थ्यांनी गणवेशासह शैक्षणिक साहित्याची मदत केली आणि दातृत्वाचा अनोखा वसा जपला. गेल्या तीन वर्षांपासून पळसे येथील नासाका कार्यस्थळावरील माध्यमिक विद्यालयात 'दातृत्वाचा ज्ञानयज्ञ' हा उपक्रम नासाकाचे अवसायक प्रदीप आव्हाड, नाशिक सर्व सेवाभावी ट्रस्टचे मानद व्यवस्थापक सुधाकर गोडसे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. यंदाही या उपक्रमाला समाजाच्या विविध क्षेत्रातील दानशूरांचा भरघोस प्रतिसाद लाभला. विद्यालयाचे माजी विद्यार्थी आणि वनस्पती विद्या मिशनचे संस्थापक सागर अहिरे, युवा उद्योजक आनंदा कांगणे यांनी गणवेश, ॲड.जयवंत गायधनी, वनिता चकणे (सानप) यांनी वह्या, भारतीय सैन्य दलातील चंद्रभान बोराडे यांनी कंपासपेटी, पेन, शरद आडके, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष संतोष गायधनी, प्रवीण गायधनी आदी माजी विद्यार्थ्यांनी आर्थिक मदत केल्याने गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य प्रदान करता आले. मुख्याध्यापक अरुण पगार, शिक्षक, कर्मचारी वर्ग यांच्यासह विद्यार्थ्यांनी माजी विद्यार्थ्यांच्या या शैक्षणिक योगदानाबद्दल समाधान व्यक्त केले.

### मनमाडला प्रतिबंधात्मक कार्यवाही कॅम्पचे आयोजन

**मनमाड ।** मनमाड पोलिस उपविभागातील सहा पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या दखलपात्र आणि अदखलपात्र गुन्ह्यांतील आरोपी आणि सामनेवाले इसम यांच्यावर प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यासाठी सोमवारी मनमाडला



उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात प्रतिबंधात्मक कार्यवाही कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरासाठी विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा मालेगांवचे अप्पर पोलिस अधिक्षक तेजबिरसिंग संधू आणि मनमाड विभागाचे पोलिस उपअधिक्षक बाजीराव महाजन, शहर पोलिस निरीक्षक विजय करे, पोलिस अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. अप्पर पोलिस अधिक्षक तेजबहादूर संधू यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली मनमाड पोलिस उपविभागातील येवला शहर, येवला तालुका, मनमाड, नांदगाव, चांदवड आणि वडनेरभैरव या पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या दखलपात्र आणि अदखलपात्र गुन्ह्यांतील आरोपी/सामनेवाले इसम यांच्यावर प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी आणि आगामी काळात सार्वजनिक शांतता अबाधित ठेवण्यासाठी या शिबीरात संबंधितांकडून भविष्यात कोणताही सार्वजनिक शांतता भंग होणार नाही याबाबत समज देवून त्यांच्याकडून त्यांच्याविरुध्द दाखल केसमध्ये त्यांचे वैयक्तीक बंदपत्र घेण्यात आले. व त्यांना अटी आणि शर्तीची समज देण्यात आली. या शिबीरामध्ये मनमाड पोलिस ठाण्यातील १५ केसेस, येवला शहर पोलिस ठाणे २३, येवला तालुका पोलिस स्टेशन ३३, नांदगाव पोलिस स्टेशन २८, चांदवड पोलिस स्टेशन ४९, आणि वडनेरभैरव पोलिस स्टेशन ३७ अशा १८५ सामनेवाले इसम यांच्यावर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली.

### धनाई-पुनाई मातेचा पौर्णिमा महोत्सव भक्तीमय वातावरणात

**सिडको ।** खानदेशातील असंख्य भाविकांच्या कुलदैवत मानल्या जाणाऱ्या धनाई-पुनाई मातेचा चौथा पौर्णिमा महोत्सव नाशिकच्या माहेरघर मंगल कार्यालयात अत्यंत भक्तिभावाने व उत्साहात पार पडला. धनाई-पुनाई माता भक्त परिवाराच्यावतीने आयोजित या महोत्सवात भावपूर्ण भजन, कीर्तन,



नामजप, जोगवा आणि भक्तीगीतांचा अखंड स्वर निनादला. गेल्या चार महिन्यांपूर्वी दीपक वाणी यांच्या संकल्पनेतून चार महिन्यांपूर्वी नाशिकमध्ये या पौर्णिमा महोत्सवाची सुरुवात झाली. त्यानंतर प्रत्येक पौर्णिमेला मातेचा हा उत्सव भक्तिमय वातावरणात साजरा होत असून, यावेळीही परिसरात भक्तांच्या ओवाळणीच्या गजरात, टाळ-मृदंगाच्या निनादात आणि 'धनाई-पुनाई माता की जय' या घोषणांनी वातावरण भारावून गेले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सुनील मुसळे, कुणाला मुसळे, धनंजय मुसळे, जयवंत मुसळे, सागर मुसळे, गोपाळ माकडे, प्रमोद माकडे, गोकुळ मुसळे आदींनी परिश्रम घेतले. महोत्सवात विविध गावांतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहून माता दर्शनाचा लाभ घेतला. यापुढे प्रत्येक पौर्णिमेला हा महोत्सव साजरा केला जाणार असल्याची माहिती दीपक वाणी यांनी दिली आहे.

# वंजारी समाजाने मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देण्याची गरज : कोंडाजीमामा आव्हाड



**नाशिक ।** सबंध महाराष्ट्रामध्ये वंजारी समाजाची नाशिक ही एकच संस्था असून या संस्थेचा विस्तार होणे आवश्यक आहे. मोठमोठ्या शहरांमध्ये व जिल्ह्यांमध्ये संस्थेचे कार्यक्षेत्र निर्माण झाले पाहिजे. मुलांच्या शिक्षणासाठी त्यांना आवश्यक त्या सर्व सोयी सुविधा या पुरवल्या तर वंजारी समाजातील विद्यार्थी उच्च शिक्षणाकडे वळून यशस्वी होतील. यासाठी समाजातील व्यक्तीने पुढाकार घेऊन शिक्षणासाठी समाजात क्रांती घडवावी. आजच्या या आधुनिक काळात टिकायचे असेल तर शिक्षण हे एकमेव माध्यम असल्याचे मत क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कोंडाजीमामा आव्हाड यांनी व्यक्त केले.

व्यासपीठावर भाजपा शहराध्यक्ष सुनिल केदार, नाना शिलेदार, मोहन घुगे, बबन खाडे, जगन कुटे, बुधजी पानसरे, सोपान महाराज शास्त्री, माधुरी पालवे, डॉ. मंजुषा दराडे, विमल आव्हाड, यमुनाताई घुगे, संकेत सानप, रंगनाथ दरगुडे, रोहिदास आव्हाड, डॉ. उल्हास कुटे तसेच समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्राच्या अनेक भागांमध्ये वंजारी समाज विखुरलेला आहे. समाज्याने संघटित होऊन समाजहितासाठी कार्य करत वंजारी समाजाची ओळख केवळ महाराष्ट्रा पुरतीच मर्यादित न राहता सबंध भारतात समाजाचे नाव निघाले पाहिजे असे मत भाजपा दिव्यांग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब घुगे यांनी व्यक्त केले. वंजारी समाजातील व्यक्ती सरकारी व शासकीय क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहे, तर काही व्यवसाय, उद्योजक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात कार्य करणारे तसेच आध्यात्मिक, कीर्तनकार, शास्त्री आहेत यांची समाजातील सर्व स्तरातील लोकांपर्यंत माहिती पोहोचली पाहिजे यासाठी समाज्याने संघटित होऊन कार्य केले करावे असे असे आवाहनही त्यांनी केले. याप्रसंगी गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय, शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन दिव्यांग आघाडीचे उत्तर महाराष्ट्र प्रभारी बाळासाहेब घुगे यांनी केले होते. सूत्रसंचालन नंदू सानप यांनी केले तर आभार प्रदर्शन बी. के. नागरे यांनी मानले.

# देवचंद महाले सहयाद्री पुरस्काराने सन्मानित

## हरसूलच्या क्रांती बहुउद्देशीय संस्थेचा अभिनव उपक्रम



**हरसूल ।** पर्यावरण क्षेत्रात भरीव काम करणारे देवचंद महाले यांना बहुउद्देशीय आदिवासी संस्था हरसूल, तसेच जिव्हाळा व जलपरिषद, आणि संकल्प आदिवासी जनजागृती संघटना,(महाराष्ट्र) यांच्या संयुक्त विद्यमाने सह्याद्री पुत्र हा सन्मान बहाल करण्यात आला.

सहयाद्रीच्या पर्वत रांगा असोत वा येथील जैवविविधता! इथे मोठ्या प्रमाणात होणारे उत्खनन, सतत लागणारे वणवे, वृक्षतोड यामुळे येथील जैवविविधता आणि वृक्षवल्ली ही दुर्मिळ होत आहे. त्याचे विपरीत परिणाम निसर्गावर होत आहे. याला कडवा विरोध ,आणि सतत पर्यावरण क्षेत्रात काम करणारे देवचंद महाले यांना बहुउद्देशीय आदिवासी संस्था सह्याद्री पुत्र हा सन्मान बहाल करण्यात आला. महाले हे गेली वीस वर्ष वने आणि पर्यावरण क्षेत्रात काम करीत आहेत. विशेष म्हणजे अंजनेरीसारख्या ठिकाणी होणाऱ्या रोपवे व गडावरील रस्ता याला विरोध, तसेच येथील जैवविविधता आणि गिधाड, संरक्षण यासाठी त्यांनी लढा दिला. ब्रम्हगिरी उत्खननच्या विरोधातही त्यांनी काम केले. नदी प्रदूषण, सतत लागणारे वणवे यासह अनेक बाबतीत त्यांनी लढा दिला. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# बागलाणात इलेक्ट्रिक मोटर चोरांचा पर्दाफाश; सटाणा पोलिसांची कारवाई



**बागलाण ।** तालुक्यातील शेतकऱ्यांच्या इलेक्ट्रिक मोटर पंप चोरी करणाऱ्या टोळीचा सटाणा पोलिसांनी पर्दाफाश करत १ लाख १३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

लखमापूर, धांद्री, अजमेर सौंदाणे व ब्राम्हणगाव परिसरात वाढत्या चोरीच्या घटनांनंतर लखमापूर येथील शेतकरी अनिल भामरे यांनी दाखल केलेल्या तक्रारीवरून हा तपास सुरू झाला.

पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या आदेशानुसार व अप्पर पोलीस अधीक्षक तेघबीर सिह संधू, उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक योगेश पाटील यांनी पथक स्थापन केले. तपासादरम्यान सचिन दिलीप चव्हाण (रा. धांद्री), चंद्रकांत नारायण आहिरे, हसीम जमाल सैयद (दोघे रा. ब्राम्हणगाव) यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. पुढील तपासात देविदास नानाजी वाघ व चंद्रकांत विलास आहिरे (दोघे रा. ब्राम्हणगाव) यांची नावेही समोर आली. आरोपींकडून ७३ हजार रुपये किंमतीच्या ११ इलेक्ट्रिक पंप व जलपरी तसेच ४० हजार रुपये किंमतीच्या दोन मोटरसायकली असा एकूण १ लाख १३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तपास पोलीस हवालदार रुपेश ठोके यांच्या नेतृत्वाखाली, पथकात पीएसआय अतुल बोरसे, दत्तात्रेय राऊत, पोलीस हवालदार रविंद्र खांडेकर, नितीन जगताप, भूषण सूर्यवंशी, सिकंदर कोळी, कदम दादा, आहेर दादा व दवंडे दादा यांचा समावेश होता.

# थकबाकीदार शेतकऱ्यांना सामोपचार योजना अमान्य

## थकबाकीदार शेतकऱ्यांच्या बैठकीत एकमताने निर्णय



**नाशिक ।** नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेची २०२५-२६ सामोपचार योजना आम्हा शेतकऱ्यांना मान्य नाही. त्या ऐवजी मुद्दलाचे दहा हप्ते करून द्यावेत व व्याज संपूर्ण शासनाने भरावे, असे वनी तालुका दिंडोरी खोरी फाटा येथे झालेल्या थकबाकीदार शेतकऱ्यांच्या बैठकीत एकमुखी निर्णय घेण्यात आला.

येत्या १४ तारखेला नाशिक येथे आंदोलन स्थळावरपुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यात येईल, असे या बैठकीत ठरविण्यात आले. बैठकीच्या अध्यक्षस्थानी आनंदराव चौधरी होते तर प्रमुख उपस्थिती दिंडोरी मार्केट कमिटीचे चेअरमन प्रशांत कड , शेतकरी समन्वय समितीचे अध्यक्ष भगवान बोराडे, आदिवासी सेवक धोंडीराम थैल, दिंडोरी मार्केट कमिटी संचालक दत्तू राऊत, विश्वास कामाले, 968 आदिवासी संस्थेचे राज्य अध्यक्ष कैलास बोरसे, दिलीप पाटील, रमेश बोरस्ते, बाळासाहेब बोरस्ते, मोती नाना पाटील, रामदास राऊत, जयवंत राऊत, थकबाकीदार शेतकरी संजय तुंगार, लक्ष्मण राऊत, संदीप पवार, रंगनाथ गवळी, लहानू गवळी, उत्तम साबळे, दौलत भरसट, चिंधू पाटील पगार, जयराम बहिरम, अशोक देशमुख, पुंडलिक राऊत, राजूभाऊ पाटील, गंगाधर चौधरी, जयराम राऊत, सोमनाथ दळवी, मुरलीधर दळवी, आनंदा चौधरी, माधव धिवंडी, जामरू पवार, गुलाब पाटील, अण्णाभाऊ पाटील, हरिभाऊ गावीत, दिनकर जोपळे यांच्यासह मोठ्या प्रमाणात थकबाकीदार शेतकरी उपस्थित होते.

नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेने शक्तीचे कर्ज वसुली बंद करून शेतकऱ्यांना संपूर्ण कर्ज माफ करावे, या मागणीवर आजही शेतकरी ठाम आहेत. युती शासनाने निवडणुकीच्या जाहीरनाम्यामध्ये संपूर्ण कर्जमाफीची घोषणा केलेली आहे वारंवार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कर्जमाफी होणार पण ती कधी होणार मी सांगणार नाही असे सांगत आहेत. जी काही कर्जमाफी करायची असेल ती लवकर करा व शेतकऱ्यांना कर्जातून मुक्त करा तोपर्यंत जे शेतकरी कर्ज भरतील त्या शेतकऱ्यांसाठी संपूर्ण व्याज माफ करून शेतकऱ्यांना मुद्दलाचे १० हप्ते करून द्यावेत ठरविण्यात आले.

नाशिक जिल्ह्यातील १५ तालुक्यांमध्ये येणाऱ्या काही दिवसात जनजागृती करून सक्तीची कर्ज वसुली थांबून व सामोपचार योजनेस सक्त विरोध करण्यासाठी प्रत्येक तालुक्यात बैठका घेण्यात येतील व थकबाकीदार सभासदांचे किती तोटा होणार आहे याबाबत शेतकऱ्यांना त्या बैठकीत सांगण्यात येईल. या पुढील कार्यक्रम थेट थकबाकीदार शेतकऱ्यांची संपर्क करून त्या शेतकऱ्यांना आंदोलनामध्ये सहभागी करून घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे शेतकरी समन्वय समितीचे अध्यक्ष भगवान बोराडे यांनी सांगितले. राज्यकर्त्यांना जाग येण्यासाठी लवकरच गावोगावी फिरून शेतकऱ्यांना जागृत करून करण्यात येईल, असे दिंडोरी मार्केट कमिटीचे चेअरमन प्रशांत कड यांनी सांगितले. या बैठकीत चिंतामण पाऊजी राऊत यांनी वनी आदिवासी सोसायटीकडून सात लाखाचा ट्रॅक्टर घेतला. दहा लाख कर्ज भरणा केला होता सचिवाने दोन-तीन दिवसात तुमचा निल दाखला घेऊन जा उताऱ्यावरचा बोजा कमी करून घ्या मात्र मागील वर्षी माझ्याकडे35 लाख रुपये कर्ज काढण्यात आलेली आहे आता या सचिवास अटक झाली आहे असे आम्हास कळले आहे

दुसरे शेतकरी काशिनाथ रतन बहिरम धारडे दिगर यांनी सात लाखाचा ट्रॅक्टर घेऊन पाच एकर ऊस लावला होता त्या ऊसातील परस्पर बिल वसंतदादा सहकारी साखर कारखान्या मार्फत पिंपळे खुर्द आदिवासी सोसायटीमध्ये जमा झाले होते, मात्र कर्ज ट्रॅक्टरचे कर्ज फिटले नाही. आता २८ लाख रुपये कर्ज काढले आहे आम्ही कुठून भरणार) अशा एक ना अनेक सुरेश कथा या बैठकीमध्ये मांडण्यात आल्या. या प्रकरणांचा बँकेकडे व जिल्हा उपनिबंधक यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येईल, असे भगवान बोराडे यांनी सांगितले.







अवयवदानाला चालना मिळावी याकरीता राज्यस्तरावर कार्यक्रम हाती घेऊन जनजागृतीसाठी कार्य केले जाते. सध्या राज्यभरात ३ ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत अवयवदान पंधरवड्याचे आयोजन प्रभावी व उद्दिष्टपूर्ण रितीने करण्यात येत आहे. तसेच दरवर्षी १३ ऑगस्ट रोजी जागतिक अवयवदान दिन साजरा केला जातो. मृत्यूनंतर कुणाचे तरी जीवन फुलवूया! असा जर विचार मनात आणला तर समाजातील हजारो नागरिक या अवयवदान अभियानात स्वतःहून सहभागी होतील, अवयवदानाचा अर्ज भरतील. याचाच एक भाग म्हणून अवयवदानाचे महत्व स्पष्ट करण्याचा प्रयत्न या लेखातून करण्यात येत आहे.

--------------

# अवयवदान : एक सामाजिक कार्य

अनिल आलुरकर
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय, अमरावती.

अवयवदान प्रत्यारोपणाबाबत नागरिकांमध्ये मोठी उत्सुकता आहे. एखाद्या चांगल्या व्यक्तीने जवळच्या नातेवाईकांस किडनी, यकृत दिले तर त्याच्या शरीरावर काही परिणाम होईल का? अवयव पुन्हा निर्माण होऊ शकतो का? असे काही प्रश्न आहेत.

खरे तर वैद्यकीय शास्त्राने मोठी प्रगती केली असून प्रत्यारोपण प्रक्रिया अतिशय काळजीपूर्वक केली जाते. किडनी, हृदय, फुफ्फुस, यकृत, डोळे आदी अवयवांचे यशस्वीपणे प्रत्यारोपण झाल्याचे आपण माध्यमातून वाचतो. त्यामुळे नागरिकांनी कोणतीही भीती बाळगण्याचे कारण नाही.

रुग्ण दवाखान्यात भरती झाला म्हणजे त्याचे अवयव काढून घेणे, अनाथ मुले, व्यक्ती, भिकारी यांना पकडून अवयव काढून घेणे, पैशाचे आमिष दाखवून अवयव काढणे अशा प्रकारच्या घटनांमध्ये काही डॉक्टर्स व अवयवांची तस्करी करणारी माणसे सहभागी होती. त्यामुळे माणसे अपंग व्हायची, मृत्यूमुखी पडायची.

अशा अवयव प्रत्यारोपणामध्ये गरजूंना फायदा व्हावा, त्या प्रक्रियेतील धोका कमी होऊन सुरक्षित प्रत्यारोपण होण्यासाठी मानवी उपचाराकरिता व अवयवांची व्यावसायिक विक्री थांबावी म्हणून केंद्र सरकारने मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा - १९९४ लागू केला. मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा १९९४ मध्ये अंमलात आल्यानंतर प्रत्यारोपणाच्या संख्येत वरचेवर वाढ होत गेली.

रिपोर्टनूसार २०२४ या एका वर्षामध्ये १३४७६ किडनी, ४९०१ लिव्हर, २५३ हृदय, २२८ फुफ्फुसांचे आणि ४४ स्वादुपिंडांचे प्रत्यारोपण करून रुग्णांना नवे जीवन देण्यात आले आहे. आताच्या स्थितीत संपूर्ण देशामध्ये लाखो मुत्रपिंड, यकृत व हृदय विकारांनी ग्रस्त रुग्ण असून ते अवयव दात्याच्या प्रतिक्षेत आहेत. प्रत्यक्षात ही आकडेवारी अधिक असून त्यात रोज वाढच होत आहे.

या प्रत्यारोपण कायद्यानुसार कोणत्याही नोंदणीकृत संबंधित डॉक्टरला कुठल्याही व्यक्तीचे अवयव काढणे, प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्यापूर्वी त्याचे परिणाम, धोके याची माहिती रुग्णास व त्याच्या नातेवाईकास दिली पाहिजे.

या कायद्यांतर्गत नोंदणी केलेल्या रुग्णालयातच शस्त्रक्रिया केल्या जाऊ शकतात. त्याचबरोबर पीडित रुग्णासाठी अवयव देणारी व घेणारी व्यक्ती जवळचे नातेवाईक असणे गरजेचे असते.

जर असे नातेवाईक नसतील तर प्रत्यारोपण समितीची परवानगी घेणे आवश्यक असते. या समितीतील सदस्यांकडून सखोल तपासणी केल्यानंतरच प्रत्यारोपणाचा मार्ग मोकळा होतो. त्याचबरोबर ज्या रुग्णावर प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करायची व तो जेथे दाखल आहे त्या रुग्णालयाच्या डॉक्टरांनी प्रत्यारोपण प्राधिकरण समितीला संपूर्ण माहिती देणे बंधनकारक आहे.

तसेच संपूर्ण राज्यातील अवयवदान समन्वय करण्यासाठी मुंबई येथे झोनल ट्रान्सप्लांट कॉ- ऑर्डिनेशन सेंटर उभे करण्यात आले आहे. या सेंटरच्या छत्रपती संभाजीनगर, पुणे, नागपूर येथे शाखा सुरू करण्यात आल्या असून अवयवदान प्रक्रियेत सुसूत्रता आणण्याचे काम केले जाते.

मोठ्या शहरातील कोणत्या रुग्णालयात किती गरजू रुग्णांना अवयवाची गरज आहे. दाते कोण आहेत, याची संपूर्ण माहिती या शाखांमध्ये उपलब्ध आहे. प्रत्येक अवयवाच्या प्रत्यारोपणासाठी काही नियम केलेले आहेत. उदा. किडनी अवयवदाना बाबत नियम आहे की, किडनी दात्याला महिनाभर डायलिसिसवर ठेवावे लागते. पती-पत्नी किंवा रक्ताचे नातेवाईक एकमेकांना किडनी देऊ शकतात. तसेच किडनी दात्याला हा अवयव किती महत्त्वाचा आहे व तो काढल्याने शरीरावर काय काय परिणाम होतात याची संपूर्ण लेखी माहिती द्यावी लागते.

प्रत्यारोपण करण्यापूर्वी रुग्ण व अवयवदाता यांचे ओळखपत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड, शिधावाटप पत्रिका आदी कागदपत्रे तपासली जातात. तसेच रक्ताचे नाते ओळखण्यासाठी जन्माचा दाखला, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, रेशनकार्ड आदी पुराव्याची शहानिशा करावी लागते.

ज्या रुग्णालयात शस्त्रक्रिया होणार आहे तेथील समन्वयक ही सर्व कागदपत्रे तपासतो. त्यानंतर प्रत्यारोपण प्राधिकरण समितीपुढे सादर करतो व त्यानंतरच प्रत्यारोपणाची परवानगी मिळते. अवयवदान प्रत्यारोपण प्रक्रिया अतिशय पारदर्शी ठेवावी असा नियम आहे. उदा. प्रत्यारोपण प्राधिकरण समितीकडे विविध रुग्णांची यादी असते. किती रुग्णांना कोणत्या अवयवांची गरज आहे हे नमूद असते. त्यासाठी प्रतिक्षा यादीतीलच रुग्णांना अवयवदान केले जाते.

या प्रत्यारोपण कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या डॉक्टर्स आणि त्या रुग्णालयाला लाखो रुपयांचा दंड आकारल्या जाऊ शकतो. तसेच गुन्हा सिद्ध झाल्यास डॉक्टरांनाही तुरुंगाची हवा खावी लागते.

सध्या मुंबई शहरात जवळपास ३५ रुग्णालयांनी अवयवदान प्रत्यारोपणासाठी नोंदणी केली आहे. त्यात महानगरपालिका, सरकारी रुग्णालये, तसेच काही खाजगी रुग्णालयांचा समावेश आहे.

जगामध्ये स्पेन हा देश अवयवदानात पहिल्या क्रमांकावर असून इंग्लंड, अमेरिका, हॉंगकॉंग, जपान आदी देशात एक लाख मृत्यूच्या मागे ५० जण अवयवदान करतात. त्या प्रमाणात भारतात हे प्रमाण खूपच कमी आहे. नॅशनल हेल्थ पोर्टलच्या मते स्पेनमध्ये ३५ टक्के तर अमेरिकेत २६ टक्के आणि त्याच्या तुलनेत आपल्या देशात प्रती दशलक्ष लोकसंख्येमागे केवळ ०.६५ टक्के अवयवदान केले जाते.

अलिकडच्या काळात वैद्यकीय क्षेत्रात झपाट्याने बदल होत असून रुग्णांना चांगल्या सोयी सुविधा मिळत आहेत. समाजामध्ये देखील नवनवीन अत्याधुनिक शस्त्रक्रिया, नवे उपचार याबाबत उत्सुकता असते. कुठल्याही आजारावर मात करण्याची किमया वैद्यकीय क्षेत्राने केली आहे.

आजार कितीही गंभीर असो, नवे संशोधन, नव्या उपचार पद्धतीमुळे तो बरा होण्याची शक्यता ९५ टक्क्यापर्यंत गेली आहे. वैद्यकीय शास्त्राचे हे मोठे यश म्हणावे लागेल. पूर्वी रक्तदान, नेत्रदान करण्यास सहजासहजी कुणी व्यक्ती पुढे येत नव्हती. आता एवढी जनजागृती झाली की अनेक ठिकाणी रक्तदान शिबीरे होताना दिसतात. नेत्रदानासाठीही लोकांचा सहभाग वाढलेला आहे.

तशाच प्रकारे जगभर अवयव दानाचे महत्त्व वाढताना दिसत आहे. काहीजण देहदान करून समाजासमोर एक चांगला आदर्श ठेवताना पाहतो. अवयवदान म्हणजे जेव्हा एखादी व्यक्ती मृत्यू पावते, किंवा ज्या व्यक्तींचा मेंदू डेड होतो. तेव्हा त्या व्यक्तीच्या शरीरातील किडनी, हृदय, यकृत, डोळे, फुफुसे, स्वादुपिंड व त्वचा हे अवयव देणे होय.

एखादी आजारी व्यक्ती आपल्या नातेवाईकांना सांगून ठेवते की, माज्या मृत्यूनंतर माझे शरीर दवाखान्यात द्या, देहदान करा किंवा शरीरातील किडनी, यकृत, डोळे, त्वचा गरजू रुग्णांना द्या. तेव्हा गरजू रुग्णांवर डॉक्टर्स या अवयवाचे यशस्वीपणे प्रत्यारोपण करतात. त्यामुळे कुणाला किडनी मिळते तर कुणाला डोळे! किडनी, लिव्हरमुळे जीवनदान मिळते. मरणाच्या अवस्थेत असलेली माणसे पुन्हा चांगले आयुष्य जगू शकतात. हे मोठे सामाजिक कार्य म्हणावे लागेल.

धडधाकट माणसे अपघातात मृत्यू पावतात. कुणाला हृदयविकाराचा झटका येऊन मृत्यू होतो. कुणाला स्मृतीभ्रंश होतो, अशावेळी त्यांच्या शरीरातील अवयव गरजूंना देणे याच्याशिवाय मोठे कार्य नाही. माणसे मरतात तेव्हा आपण एकतर त्यांना जमिनीत पुरतो नाहीतर जाळतो. तेव्हा शरीरातील चांगले अवयव नष्ट होतात. त्यापेक्षा त्यांच्या अवयवदानामुळे गरजू रुग्ण जर मरणाच्या दारातून परत येणार असेल व तो पुढे चांगले आयुष्य जगणार असेल तर अवयवदानासारखे महान कार्य नाही.

सध्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मानवी अवयव प्रत्यारोपणाद्वारे विविध गंभीर आजारावर उपचार होतात. अवयवदानाद्वारे (लाईव्ह ऑर्गन डोनेशनद्वारे) किडनी, लिव्हर, प्रत्यारोपण करण्यात येते. नॅशनल हेल्थ पोर्टल नूसार भारतात दरवर्षी ५ लाख लोक अवयवांची उपलब्धता न झाल्यामुळे मृत्यूमुखी पडतात. त्यापैकी २ लाख लोकांचा मृत्यू लिव्हर न मिळाल्याने होतो.

एक व्यक्ती आपले अवयवदान करून एकाच वेळी ८ लोकांना जीवनदान देवू शकते. सध्या राज्यभरात हजारो नोंदणीकृत रूग्ण अवयव मिळण्याच्या प्रतिक्षेत असून ही संख्या वाढतच आहे. शरीरातील अवयवांना कुठलाही धर्म, जात नसते. एका धर्माची व्यक्ती दुसऱ्या जाती धर्माच्या व्यक्तीला अवयवदान करू शकते. अशी अनेक उदाहरणे समाजासमोर आहेत.

कुणाला किडनीची गरज होती, कुणाला यकृताची तर कुणाला डोळ्यांची! एकमेकांना अवयवदान करताना त्यांनी फक्त माणुसकी पाहिली! अशी हजारो उदाहरणे आहेत. अवयव प्रत्यारोपण करून ते आपले पुढील आयुष्य सुखा-समाधानाने जगत आहेत.

अवयवदान एक चळवळ म्हणून उभी राहत आहे. लोकांना या दानाचे महत्त्व कळू लागले आहे. आपले बदलते जीवन चक्र पाहता, त्याचबरोबर निसर्ग पर्यावरणातील बदल, आहारातील चटपटीत, तेलकट, खाद्य पदाथार्चा समावेश, व्यायामाचा अभाव, जंक फूडचे आकर्षण यामुळे शरीरामध्ये अनेक व्याधी निर्माण होत आहेत.

तरूण वयात अनेक अवयव निकामी होत आहेत. मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार, किडनी आजार, यकृतात बिघाड अशा तक्रारी मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. काही आजार असे आहेत की, त्याचे उशीरा निदान होते. जेथे लवकर उपचार करायला हवे तेथे खूप उशीर झालेला असतो.

बऱ्याचदा उपचाराची माहिती नसणे, डॉक्टरांची सोय नसणे, आर्थिक अडचण यामुळे रुग्ण दगावण्याची शक्यता असते. म्हणूनच वेळीच निदान झाले तर अवयव प्रत्यारोपण करून आपले आयुष्य आपण सुखाने, आनंदाने अधिक काळ जगू शकतो!

अवयवदान कुणीही करू शकते. आपल्याकडे अनेक उदाहरणे आहेत. मुलाने वडिलांना किडनी दिली. बहिणीने भावाला दिली. मुलाने वडिलांना यकृत दिले. तर फ्रॉन्सिसच्या हृदयामुळे हरिप्रसादला जीवनदान मिळाल्याचे ऐकतो. कुठे ऋषिकेशच्या किडनीमुळे इब्राहिमचे आयुष्य फुलले अशा बातम्या वाचतो. अवयवदानाला ना जात आडवी येते ना धर्म! म्हणूनच अवयवदान हे जात-धर्मापेक्षा सर्वश्रेष्ठ आहे.

अवयवदानाची प्रक्रिया सोपी आहे. अवयवदानाचा फॉर्म भरला असेल तर, एखादी व्यक्ती मृत्यू पावल्यास, किंवा एखादा ब्रेनडेड झाल्यास नातेवाईकांच्या इच्छेनुसार सहा तासाच्या आत अवयवदान करता येते. किमान तीन वर्षे ते अधिक वयाच्या व्यक्तीचे अवयवदान केले जाऊ शकते. म्हणूनच आपल्या मृत्यूनंतर दुसऱ्यांसाठी अवयवदान करुन त्यांचे जीवन समृद्ध करूया. अवयवदानाचा फॉर्म भरुया!

ही अवयवदानाची प्रक्रिया आता कायद्यामुळे अधिक सुरक्षित झाली आहे. मानवी उपचाराकरिता तसेच मानवी अवयवांची व्यावसायिक विक्री होऊ नये म्हणून मानवी अवयव काढणे, जतन करणे, प्रत्यारोपण करणे यासाठी केंद्र सरकारने मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा १९९४ लागू केला आहे.

तुम्ही दिलेला अवयव एका व्यक्तीचे नाही तर अनेक व्यक्तींचे जीवन बदलू शकतो. त्यांच्या जीवनात आनंद आणू शकतो. १३ ऑगस्ट रोजीच्या जागतिक अवयवदान दिनानिमिताने आपण सर्व जण मिळून सर्व लोकांमध्ये अवयवदानाबाबत जनजागृती कशी करता येईल, यासाठी प्रयत्न करूया आणि अनेकांना नवीन जीवन मिळवून देऊया.

मृत्यूनंतर कुणाचे तरी जीवन फुलवूया! असा जर विचार मनात आणला तर समाजातील हजारो नागरिक या अवयवदान अभियानात स्वतःहून सहभागी होतील. अवयवदानाचा अर्ज भरतील यात शंका वाटत नाही.

# देशात नेमकं चाललयं तरी काय?

आपण नेहमी पहातो की बदलत्या हवामानामुळे उत्तराखंड सारख्या अनेक भागांत दरवर्षी महाप्रलयाची स्थिती निर्माण होत असते. ज्या ठिकाणी पर्यटक आपली हजेरी लावुन सरकारची तिजोरी भरत असते. बिहार सारखे अनेक राज्य असे आहेत की तेही पावसाळ्यात जलमग्न होतात व अनेकांचा बळी जातो.

देशात २८ राज्ये व ८ केंद्र शासित प्रदेश आहेत. या प्रत्येक राज्यात लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी आणि सरकारी यंत्रणा आहे.परंतु आजही प्रत्येक राज्यात काही जिल्हे असेही आहेत की त्या ठिकाणी मुलभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणात अभाव दिसून येतो. आजही अनेक गावांमध्ये पुलांची व्यवस्था नाही अशा परिस्थितीत ग्रामस्थ व विद्यार्थी आपला जीव धोक्यात टाकून तारेवरची कसरत करतात व आपले काम पुर्ण करतात.



रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार, नागपूर.
९९२१६९०७७९

अशा अनेक मुलभूत गोष्टींकडे सरकार, पक्ष-विपक्ष जातीने लक्ष न देता व अशा महत्वपूर्ण मुद्द्यांवर चर्चा न करता राजकीय डावपेचांच्या चर्चा करून संसदेचा वेळ वाया घालवितात हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल. आज महागाई विकोपाला जाऊन पोहोचली, अनेक राज्यांमध्ये आजही कुपोषणाची परिस्थिती आहे यावर कोणीच चर्चा करण्यास तयार नाही, शिक्षण अत्यंत महागडे झाले आहे यावरही चर्चा करण्यास कोणी तयार नाही, टेरिफ युद्धामुळे सर्वसामान्य व गरीब यांच्यावर भार पडत आहेत, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां अजून पर्यंत थांबलेल्या नाहीत, बेरोजगारी वाढतच आहे.

नवीन धोरणानुसार कंत्राटी पद्धतीने भरतीला सुरूवात केली आहे, निवृत्त कर्मचाऱ्यांना पुन्हा पाच वर्षांपर्यंत काम करण्याची संधी सरकार देत आहे आणि राजकीय पुढारी दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे. या संपूर्ण गोष्टींमुळे मुलभूत सुविधां, शेतकऱ्यांच्या समस्या, बेरोजगारी व महागाई यावर अजून पर्यंत अंकुश लागू शकला नाही. कारण संसदेत पक्ष-विपक्ष जास्तीत जास्त फक्त राजकारणावरच चर्चा करतांना दिसतात . सरकारने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. देशातील मुलभूत सुविधांकडे लक्ष दिले पाहिजे.

आज सर्वच क्षेत्रात अत्याधुनिक सुविधा मोठ्या प्रमाणात आहेत. रस्त्यांचे जाळे संपूर्ण भारतात विनल्या गेले आहे. परंतु या संपूर्ण सुविधांवर पावसाळ्यात पाणी फेरल्या जाते व अनेक भाग जलमग्न होतांना आपण पहातो व याचा परिणाम देशातील गरीब व सर्वसामान्यांना भोगावे लागतात.

आज आपण जगाच्या दृष्टीकोनातून विचार केला तर धार्मिक स्थळी चेंगराचेंगरी प्रमाण भारतात मोठ्या प्रमाणात वाढले आहे यावर आपण अजून पर्यंत नियंत्रण ठेवू शकलो नाही किंवा यावर संसदेत चर्चा होत नाही. अशा अनेक भयावह घटना डोळ्यासमोर होत आहे. परंतु पक्ष विपक्ष फक्त आपली राजकीय पोळी शेकण्यासाठी लिपापोती करतात व सर्वसामान्यांना वाऱ्यावर सोडून देतात.

केंद्र सरकार व राज्य सरकार यांना कल्पना असते की पावसाळ्यात अती दुर्गम भागात किंवा पहाडी भागात ढगफुटी, पहाड कोसळने किंवा नद्यांना महापुर येणे अशा अनेक भयावह घटना होतात अशा परिस्थितीत केंद्र व राज्य सरकारे समन्वय साधून वेळेच्या आधीच नागरिकांना हलविने किंवा धोकादायक स्थळावरील पर्यटकांवर पुर्णतः बंदी घालणे अशा कठोर उपाययोजना का केल्या जात नाहीत?

देशातील अनेक राज्यांमध्ये ढगफुटीच्या घटनेमुळे डोंगराच्या पायथ्याशी असलेली गावे जमीनदोस्त झालीत व मोठ्या प्रमाणात प्राणहानी सुध्दा झाली आणि आताही होत आहे याचे जिवंत उदाहरण ५ ऑगस्ट रोजी उत्तराखंडच्या पर्वतीय भागातील उत्तरकाशीमध्ये ढगफुटीचा मोठा तडाखा बसला असुन गंगोत्री मार्गावरील धराली गावांमध्ये पुराचे पाणी शिरल्याने हाहाकार माजला. या घटनेत ४ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण अजूनही ढिगाऱ्याखाली दबले आहेत व त्यांची घरे सुध्दा जमीनदोस्त झाली आहे.

अशा घटनांकडे राज्य सरकार व केंद्र सरकारने अलर्ट रहाने गरजेचे आहे. कारण बदलत्या हवामानामुळे सुनामी, ढगफुटी, ग्लेशियर वितळने,भुस्कखलन, भुकंप, अती पाऊस, अती उष्णता, समुद्राची पातळी वाढने अशा अनेक भयावह व अंगावर शहारे येणाऱ्या घटना दिवसेंदिवस वाढण्याची दाट शक्यता आहे. परंतु ज्या दुर्घटनांपासुन आपण मानवजातीला वाचवु शकतो व वाचवण्यासाठी पुर्वतयारी करू शकतो अशा घटनांवर सरकारचे नियंत्रण असने अत्यंत गरजेचे आहे.

नैसर्गिक आपदा कधीच सांगुन येत नाही त्यामुळे ती केंव्हा भयानक रूप धारण करेल याची आपण कल्पना सुद्धा करू शकत नाही.त्यामुळे संपुर्ण राज्य सरकारांनी पर्यटकांना व धोकादायक स्थळावरील लोकांना सतर्क करून त्यांना महाप्रलयच्या आधीच हलविले पाहिजे जेणेकरून जीवित हानी व वित्तीय हानी रोखण्यास मदत होईल.

••••

# ध्वजसंहितेचे पालन करून घरोघरी तिरंगा फडकवावा!

यावर्षी आपण ७९ वा भारतीय स्वातंत्र्य दिन साजरा करीत आहोत. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला इंग्रजांच्या गुलामीतून स्वातंत्र्य मिळाले त्या घटनेला आज ७८ वर्ष पूर्ण झाली आहेत.

अर्थात हे स्वातंत्र्य आपल्याला सहजासहजी मिळाले नाही हे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली कित्येकांना तुरुंगवास भोगावा लागला. हजारो, लाखो क्रांतिकरांकांच्या, स्वातंत्र्य सैनिकांच्या त्यागातून आपल्याला हे स्वातंत्र्य मिळाले आहे.

या हजारो, लाखो ज्ञात- अज्ञात क्रांतिकारकांच्या, स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्याची ओळख आजच्या पिढीला व्हावी व त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन आजच्या तरुण पिढीनेही देशकायार्साठी पुढे यावे या उद्देशाने देशभर स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उत्साहात साजरा करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रमांतर्गत अनेक उपक्रमांचे आयोजन सरकारने केले आहे त्याचाच एक भाग म्हणून आजपासून म्हणजे १३ ऑगस्ट पासून १५ ऑगस्ट पर्यंत घरोघरी तिरंगा हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

या उपक्रमाअंतर्गत भारताच्या ध्वज संहितेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून भारताच्या नागरिकांना आपल्या घरी ध्वज फडकविण्याची परवानगी देण्यात आली. या दिवशी देशातील नागरिकांनी आपल्या घरावर तिरंगा ध्वज अभिमानाने फडकवावा असे आव्हान सरकारतर्फे करण्यात आले आहे.

घरोघरी तिरंगा या उपक्रमाची जनजागृती व्हावी यासाठी देशभर विविध कार्यक्रम चालू आहेत. तिरंगा हा आपला राष्ट्रध्वज आहे. देशाचे मानचिन्ह म्हणजे तिरंगा. स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन या सारख्या राष्ट्रीय सणांच्या दिवशी तिरंगा अभिमानाने फडकावून तिरंग्याला मानवंदना देणे हे आपले कर्तव्यच आहे.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

१३, १४ आणि १५ या तीन दिवशी सर्व नागरिकांनी आपल्या घरावर तिरंगा अभिमानाने फडकवावा आणि तिरंग्याला मानवंदना द्यावी.

घरोघरी तिरंगा फडकवताना ध्वज संहितेचे काटेकोरपणे पालन करावे. ध्वज फडकवताना ध्वजाचा कुठल्याही प्रकारे अवमान होणार नाही याची काळजी नागरिकांनी घ्यावी. पूर्वी ध्वज तयार करण्यासाठी हाताने विणलेले किंवा कातलेले कापड वापरले जाई .

आता यंत्रावर तयार केलेले कापड देखील तयार करण्यास परवानगी देण्यात आली आहे मात्र हा कापडी तिरंगा ध्वज, चुरगळलेला, फाटलेला, किंवा खराब झालेला नसावा. ध्वज फडकवताना केशरी रंग वरच असावा कोणत्याही परिस्थितीत तो तळाशी राहणार नाही याची काळजी घ्यावी.

तिरंगा ध्वज फडकवताना तिरंग्यापेक्षा जास्त उंचीवर किंवा शेजारी दुसरा कोणताही ध्वज फडकवू नये. एकाच ध्वजारोहणाच्या खांबावरती तिरंग्या सोबत दुसरा कोणताही ध्वज फडकवू नये. तिरंगा उंचावरच फडकावा. तिरंगा फडकवल्यानंतर तो खाली पडणार नाही याची काळजी घ्यावी.

ध्वज उतरवताना देखील ध्वज संहितेचा मान राखावा. सन्मानपूर्वक ध्वज उतरावा. कुठल्याही परिस्थितीत तिरंग्याचा अवमान होणार नाही याची काळजी नागरिकांनी घ्यावी कारण तिरंगा हे आपले राष्ट्रीय प्रतीक आहे तिरंग्याला अपमान म्हणजे देशाचा अपमान.

१५ ऑगस्ट नंतर तिरंगा ध्वज व्यवस्थित घडी घालून सन्मानपूर्वक ठेवावा. ध्वज संहितेच्या नियमांचे पालन करून प्रत्येकाने आपल्या घरावर डौलाने तिरंगा फडकवावा व घरोघरी तिरंगा हा उपक्रम यशस्वी करावा. जयहिंद ! जयभारत!!

• • •

## शेतकरी व्यथा

**किंमत उरली नाही पाय माणसाले मातीची,**
**कवडीमोल गेली गा गोनी कांद्या टमाट्याची.**

**लेकरू रोज मागते घेऊन दप्तर शाळेसाठी,**
**उरलं नाही काहीच देऊन रोजी मजुरांची.**

**उसनवारी उरात, डोळा बायका पोरांचे हाल,**
**दिवसा भेव वाटते राजा नाही भीती रात्रीची.**

**शेतमालाले सोडून आहे सगळं महाग येथी,**
**परवडत नाही दोस्ता जिंदगी कास्तकाराची.**

**नावाचा बळीराजा खरा आहो मी भिखारी,**
**किराण्यापासून कृषी केंद्रात नोंद उधारीची.**

**ऊन वारा सोसून मी पेरलं बियाणं वावरांत,**
**यंदा पावसानं केली माती साऱ्या पिकाची.**

**सांग सोबत्या वाहून गेलं पुरात माझं सारं,**
**ह्या जन्मी तरी उघडल का झोप शासनाची.**

• सौ. आश्विनी डकरे
चांदुर बाजार, अमरावती.

# राष्ट्रध्वजाचा सन्मान राखूया!

स्वातंत्र्य दिन अगदी तोंडावर आल्याने सर्वत्र वातावरण तिरंगामय होऊ लागले आहे. कागदी आणि कापडी ध्वज बाजारात विक्रीसाठी आले आहेत. सरकारच्या वतीने 'हर घर तिरंगा मोहीम' राबवली जात असल्याने घरोघरी त्यादृष्टीने सिद्धता सुरु झाली आहे.

कपड्यांच्या दुकानांचे डिस्प्ले तिरंगी कापडांनी सजू लागले आहेत. अन्य दुकानेही आपले देशाप्रतीचे प्रेम दर्शवण्यासाठी आणि ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी राष्ट्रध्वजाच्या रंगांचा वापर करून दुकानाबाहेर सजावट करू लागले आहेत. सामाजिक माध्यमांवर देशप्रेमाचे स्टेटस आतापासूनच झळकू लागले आहेत.

अनेक कार्पोरेट कंपन्यांनी कार्यालयीन कर्मचाऱ्यांसाठी गुरुवारी तिरंगा रंगांची अथवा पारंपरिक पोषाखाची थीम ठेवली आहे. अनेक सामाजिक संस्था आणि मंडळांमध्ये, शाळा महाविद्यालयांमध्ये स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, त्याची सिद्धताही सध्या जोमाने सुरु आहे.

ऑनलाईन शॉपिंग संकेतस्थळांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त उत्पादनांवर विशेष सवलत ठेवली आहे. हिंदी मराठी चॅनल्सवरील डेली सोप आणि रिॲलिटी शोजमध्ये सुद्धा सध्या प्रजासत्ताक दिनाचाच फिवर आहे. मिठाईच्या आणि केक्सच्या दुकानांत तिरंग्याच्या रंगाच्या विविध मिठाया आणि केक्स विक्रीसाठी आले आहेत.

सारे वातावरण देशभक्तीने जणू न्हाऊन निघत आहे. दरवर्षी तरी प्रजासत्ताक दिन आणि स्वातंत्र्य दिन जवळ आला कि देशभरात देशप्रेमाचे वारे जोराने वाहू लागतात.

बाजारात मिळणारा ५-१० रुपयांत मिळणारा राष्ट्रध्वज खरेदी करणे सोपे आहे; मात्र त्याचा योग्य तो सन्मान राखण्याची भावना आपल्यात निर्माण झाली आहे का हे अभ्यासनेही आज गरजेचे बनले आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या एका पिढीने अपरिमित हालअपेष्टा सहन केल्या; मात्र त्यानंतरच्या पिढीने पुढच्या पिढीवर जे देशप्रेमाचे संस्कार करायला हवे होते ते न केल्याने स्वातंत्र्याचे मोल आजच्या पिढीला तितकेसे उरलेले नाही.

राष्ट्रीय सणांच्या निमित्ताने रस्त्यावर पडलेले ध्वज आणि ध्वजांचे अवशेष गोळा करून त्यांची ध्वजसंहितेनुसार योग्य ती विल्हेवाट लावण्याचे काम काही स्वयंसेवी संघटना दरवर्षी करत असतात. मात्र त्यांच्यावर ही वेळ येऊच न देण्याची जबाबदारी आपली नव्हे काय?

स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी आपले राष्ट्रप्रेम दाखवण्यासाठी राष्ट्रध्वजाचे बॅज आपण छातीवर लावून मिरवतो. गाड्यांवर, घरांवर, दुकानांवर ध्वज फडकावतो, कागदी ध्वज विकत घेऊन ते पाल्यांना देतो;

मात्र ते फाटतात, हरवतात तेव्हा ' जाऊ दे, १० रुपयांचा तर झेंडा होता' असे विचार आपल्या मनात येतात आणि आपण ते शोधायचा प्रयत्नही करत नाही. या दिवशी रस्त्यावरून जाताना एखादा ध्वज रस्त्यावर पडलेला दिसला तर तो उचलून खिशात ठेवण्याचा विचार तर येतो मात्र आजूबाजूचे लोक काय म्हणतील या विचाराने आपण तसे करण्याचे टाळतो.

खरेदी केलेले ध्वज पुढील राष्ट्रीय सणासाठी जपून ठेवतो का किंवा ते फाटले असतील तर ध्वजसंहितेनुसार त्या ध्वजांची विल्हेवाट लावतो का? आपल्या मनात आपल्या राष्ट्रध्वजाविषयी आस्था किती आहे हे जाणून घेण्यासाठी सदर उदाहरणे पुरेशी आहेत. राष्ट्रध्वजाचा सन्मान राखण्यासंदर्भात शासनाच्या वतीने प्रतिवर्षी ध्वजसंहिता प्रकाशित करण्यात येते मात्र ती वाचण्याची तसदी आपण कधी घेत नाही.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

राष्ट्रध्वज हे देशाच्या सन्मानाचे प्रतीक असते त्यामुळे त्याचा योग्य तो मान राखणे आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

राष्ट्रध्वजाच्या सन्मानासाठी शेकडो क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, घरादाराची राखरांगोळी केली, आयुष्यभर कारावास भोगला. त्यांच्याच बलिदानामुळे आज आपण स्वातंत्र्यात सुखाने जगत आहोत. लोकशाही व्यवस्थेच्या सुख सुविधा उपभोगत आहोत.

राष्ट्रध्वजाच्या सन्मानासाठी आजही आपले सैनिक सीमेवर ऊन, वारा, पाऊस कशाचीच तमा न बाळगता खंबीरपणे उभे असतात त्या राष्ट्रध्वजाचे उचित मूल्य आपल्या अंतर्मनात बिंबायला हवे. राष्ट्रीय सणांच्या दुसऱ्या दिवशी जेव्हा एकही राष्ट्रध्वज रस्त्यावर इतस्ततः पडलेला दिसणार नाही तेव्हाच आपल्यातील राष्ट्रध्वजा विषयीची अस्मिता जागृत झाली असे म्हणता येईल.



# सेन्सेक्स 368 अंकांनी कोसळला
## गुंतवणूकदारांचे 87 हजार कोटी बुडाले

**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

अस्थिर व्यापार सत्रानंतर १२ ऑगस्ट रोजी भारतीय शेअर बाजार घसरून बंद झाले. सेन्सेक्स आणि निफ्टी दोन्हीही सुरुवातीची वाढ गमावून कोसळले. भारत आणि अमेरिकेतील महागाईची आकडेवारी येण्यापूर्वी गुंतवणूकदार सावध दिसले. व्यवहाराच्या शेवटी सेन्सेक्स ३६८.४९ अंकांनी कोसळून ८०,२३५.५९ वर बंद झाला. निफ्टी ९७.६५ अंकांनी घसरून २४,४८७.४० वर स्थिरावला.

बीएसई मिडकॅप निर्देशांक ०.२५ टक्क्यांनी घसरून बंद झाला. स्मॉलकॅप निर्देशांकात ०.०४ टक्क्यांची किरकोळ वाढ दिसून आली. क्षेत्रीय निर्देशांकांमध्ये बँकिंग, रिअल्टी, भांडवली वस्तू आणि एफएमसीजी समभागांमध्ये सर्वात मोठी घसरण दिसून आली. दुसरीकडे आयटी, ऑटो आणि फार्मा शेअर्स तेजीत होते. इंडिया VIX निर्देशांकातही थोडीशी घसरण दिसून आली.



**सेन्सेक्स 80,235**

**निफ्टी 24,487**

आज बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल १२ ऑगस्ट रोजी ४४३.२६ लाख कोटी रुपयांवर आले, जे मागील दिवशी म्हणजेच सोमवार, ११ ऑगस्ट रोजी ४४४.१३ लाख कोटी रुपये होते. सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल आज ८७,००० कोटी रुपयांनी कमी झाले आहे. दुसऱ्या शब्दांत गुंतवणूकदारांच्या संपत्तीत सुमारे ८७,००० कोटी रुपयांची घट झाली आहे.

सेन्सेक्समधील ३० पैकी १२ शेअर्स वाढीसह बंद झाले. यामध्ये मारुती सुझुकीच्या शेअर्समध्ये सर्वाधिक २.०६ टक्के वाढ झाली. यानंतर टेक महिंद्रा, महिंद्रा अँड महिंद्रा (एम अँड एम), एनटीपीसी आणि सन फार्मा यांचे शेअर्स ०.९१ टक्के ते १.९० टक्के वाढीसह बंद झाले.

सेन्सेक्सचे उर्वरित १८ शेअर्स घसरून बंद झाले. यामध्ये बजाज फायनान्सचा शेअर सर्वाधिक २.८७ टक्क्यांनी घसरला. दुसरीकडे, ट्रेंट, हिंदुस्तान युनिलिव्हर (HUL), HDFC बँक आणि एटरनलचे शेअर्स १.१० टक्क्यांनी ते १.३६ टक्क्यांनी घसरले.

# न्यायमूर्ती यशवंत वर्मांच्या अडचणीत वाढ; लोकसभेत महाभियोग प्रस्ताव मंजूर, ३ सदस्यीय समिती स्थापन करण्याचा निर्णय

**नवी दिल्ली, दि. १२ वृत्तसंस्था**

न्यायमूर्ती यशवंत वर्मा हे मागील काही महिन्यांपासून चर्चेत आहेत. त्यांच्या दिल्लीतील निवासस्थानी आग लागल्याची घटना घडल्यानंतर मोठ्या प्रमाणात बेहिशेबी रोख रक्कम आढळून आली होती. त्यामुळे देशभरात मोठी खळबळ उडाली होती. त्यानंतर या संपूर्ण प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाने अंतर्गत चौकशीसाठी तीन सदस्यांची समिती स्थापन केली होती. या समितीने सर्वोच्च न्यायालयाला अहवालही सादर केला होता.



तसेच न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्याविरोधात महाभियोग प्रस्ताव दाखल करण्याची मागणी करण्यात आली होती. अखेर १२ ऑगस्ट रोजी लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी यशवंत वर्मा यांच्याविरोधात सादर करण्यात आलेल्या महाभियोग प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. या प्रस्तावावर एकूण १४६ खासदारांनी स्वाक्षऱ्या केल्याची माहिती सांगण्यात येत आहे. तसेच ओम बिर्ला यांनी यशवंत वर्मा यांच्याविरोधातील महाभियोग प्रस्तावाची चौकशी करण्यासाठी ३ सदस्यांची समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

या ३ सदस्यीय समितीमध्ये न्यायमूर्ती अरविंद कुमार, न्यायमूर्ती मनिंदर मोहन आणि वरिष्ठ वकील बी.व्ही. आचार्य यांचा समावेश करण्यात आला आहे. न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्याविरोधातील महाभियोगासाठी १४६ खासदारांनी स्वाक्षरी केलेला प्रस्ताव स्वीकारताना ओम बिर्ला यांनी स्पष्ट केलं की, "आता ३ सदस्यांची ही समिती लवकरात लवकर आपला अहवाल सादर करेल. त्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल.

न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानातील रोख रकमेच्या कथित वादाच्या संदर्भातील आरोपांची चौकशी करण्यासाठी लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी मंगळवारी तीन सदस्यीय पॅनेलची स्थापना करण्याचा निर्णय घेतला. या समितीत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती अरविंद कुमार, मद्रास उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती मनिंद्र मोहन श्रीवास्तव आणि कायदेतज्ज्ञ बी.व्ही. आचार्य यांचा समावेश आहे.

न्यायमूर्ती यशवंत वर्मा हे सध्या अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश आहेत. त्याआधी ते दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती होते. १४ मार्च रोजी न्यायमूर्ती वर्मा यांच्या दिल्लीतील सरकारी निवासस्थानी आग लागली होती. ही आग आटोक्यात आणताना अग्निशमन दलाच्या कर्मचारी आणि तिथे उपस्थित असलेल्या पोलिसांकडून त्यांना एका खोलीत मोठ्या प्रमाणात रोख रक्कम सापडल्याचा दावा करण्यात आला होता.

ही रक्कम जळत असताना तिथे त्याचे फोटो आणि व्हिडीओ सोशल काढण्यात आले. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानंतर न्यायमूर्ती वर्मा यांची दिल्ली उच्च न्यायालयातून अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली करण्यात आली आणि या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी 'इन-हाऊस' समितीची स्थापना करण्यात आली होती.

# ३५ वर्षांनी उघडली काश्मीर फाईल; काश्मीरी पंडित नर्सच्या हत्येचा तपास करण्यासाठी श्रीनगरमध्ये पोलिसांची मोठी कारवाई

**श्रीनगर, दि. १२ वृत्तसंस्था**

जम्मू काश्मीरमधील श्रीनगरमध्ये ३५ वर्षांपूर्वी एका काश्मीरी पंडित नर्सचे अपहरण करून नंतर तिची हत्या करण्यात आली होती. या प्रकरणाचा आता नव्याने तपास सुरू करण्यात आला आहे. जम्मू काश्मीर पोलिसांच्या विशेष तपास पथकाने सोमवारी रात्री श्रीनगरमध्ये आठ ठिकाणी छापा टाकला आहे. सरला भट असे हत्या करण्यात आलेल्या २७ वर्षीय काश्मीरी पंडित नर्सचे नाव आहे. तिने काश्मीर खोऱ्यात काश्मीरी पंडितांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात आवाज उठवला होता तसेच दहशतवाद्यांना खुले आव्हान दिले होते. त्यानंतर दहशतवाद्यांनी तिचे अपहरण करून निर्दयीपणे हत्या केली होती.

तीन दशकांपूर्वी झालेल्या या हत्या प्रकरणाशी संबंधित पुरावे गोळा करण्यासाठी सोमवारी रात्री जम्मू काश्मीर पोलिसांनी श्रीनगरमध्ये आठ ठिकाणी छापे टाकले. नर्स सरला भट या श्रीनगरमधील शेर-ए-काश्मीर इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स (SKIMS) येथील हब्बा खातून हॉस्टेल मध्ये वास्तव्यास होत्या. या हॉस्टेलमधून १८ एप्रिल १९९० रोजी दहशतवाद्यांनी सरला भट यांचे अपहरण केले होते. त्यांनतर त्यांच्यावर बेछुट गोळीबार करण्यात आला. सरला भट यांचा मृतदेह मल्लाबाग येथील उमर कॉलनी परिसरात आढळला होता. जम्मू काश्मीर पोलिसांच्या सूत्रांनी या हत्या प्रकरणाशी संबंधित ही माहिती दिली आहे.

जम्मू काश्मीर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, काश्मीरी पंडित सरला भट यांचे जम्मू काश्मीर लिबरेशन फ्रंटच्या दहशतवाद्यांनी अपहरण केले होते. त्यानंतर त्यांची निर्दयीपणे गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. सरला भट या पोलिसांना माहिती पुरवतात असा संशय दहशतवाद्यांना होता. दहशतवाद्यांनी सरला भट यांच्या मृतदेहावर 'पोलिसांची हस्तक' असल्याची चिठ्ठी टाकली होती. त्यावेळी निगिन पोलीस ठाण्यात या हत्या प्रकरणाची एफआयआर नोंद करण्यात आली होती. परंतु, त्यावेळी कोणताही तपास झाला नाही. सरला भट यांच्या हत्येत सहभागी असलेल्यांचा शोध देखील घेण्यात आला नव्हता.

# ... तर रिलायन्सच्या जामनगरच्या रिफायनरीवर हल्ला करू!- असीम मुनीर पुन्हा बरळले

**इस्लामाबाद, दि. १२ वृत्तसंस्था**

पाकिस्तानचे लष्कर प्रमुख यांची वादग्रस्तं विधानं काही थांबण्यास तयार नाहीत. अर्ध जग अणुबॉम्बने नष्ट करु या आशयाचं विधान त्यांनी केलं. त्यानंतर त्यांच्यावर टीका झाली. पेंटागॉनच्या माजी अधिकाऱ्याने तर असीम मुनील म्हणजे लष्करी गणवेशातला ओसामा बिन लादेन असंही विधान केलं. मात्र असीम मुनीर यांचं गरळ ओकणं थांबलेल नाही. आता मुनीर यांनी रिलायन्सच्या जामनगरच्या फॅक्टरीवर हल्ला करण्याची धमकी दिली आहे.



अमेरिकेतील टाम्पा शहरात पाकिस्तानी वंशाच्या लोकांच्या साठी डिनरचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी असीम मुनीर म्हणाले आता जर संघर्ष सुरु झाला तर भारताच्या पूर्व भागापासून सुरुवात करत आपण पश्चिमेच्या दिशेने जाऊ. मुकेश अंबानी यांची जामनगरमध्ये जी रिफायनरी आहे ती जगातली सर्वात मोठी रिफायनरी आहे. या रिफायनरीवर हल्ला करु. पाकिस्तानकडे अणुबॉम्ब आहे. पाकिस्तान हा न्यूक्लिअर शक्ती असलेला देश आहे. आपण अर्धे जग घेऊन तर बुडूच पण जर आम्हाला बुडवण्याचा प्रयत्न झाला तर पहिला हल्ला रिलायन्सच्या जामनगरमधील रिफायनरीवर करण्यात येईल अशी धमकीच असीम मुनीर यांनी दिली. भारताला आर्थिकदृष्ट्या कमकुवत करण्यासाठी हा उपाय आमच्याकडे उपलब्ध आहे असंही मुनीर बरळले.

व्यापारी आणि मानद वाणिज्यदूत अदनान असद यांनी टाम्पा येथे आयोजित केलेल्या ब्लॅक-टाय डिनरमध्ये असीम मुनीर उपस्थितांना म्हणाले की, "आपण एक अणुशक्ती-संपन्न राष्ट्र आहोत. जर आपल्याला वाटले की आपण बुडत आहोत, तर आपण अर्धे जग आपल्यासोबत घेऊन बुडू." असं विधान असीम मुनीर यांनी केलं होतं.

# मुनीरची भाषा लादेनसारखी
## पाकिस्तानला दहशतवादी देश घोषित करण्याची अमेरिकेतून मागणी

**वॉशिंग्टन, दि. १२ वृत्तसंस्था**

पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल आसिम मुनीर यांच्या अणुबॉम्ब हल्ल्याच्या धमकीवजा विधानावर अमेरिकेतून तीव्र प्रतिक्रिया उमटली आहे. अमेरिकेच्या भूमीवर पाकिस्तानकडून दिल्या जाणाऱ्या धमक्या पूर्णपणे अस्वीकार्य आहेत, असे अमेरिकेचे माजी पेंटागॉन अधिकारी मायकल रुबिन यांनी म्हटले आहे.

यामुळे अनेक लोकांच्या मनात प्रश्न निर्माण झाला आहे की, पाकिस्तान आता एक 'जबाबदार देश' म्हणून राहण्याच्या लायकीचा आहे का, की त्याचा अंत होण्याची वेळ आली आहे? त्यांनी मुनीर यांच्या विधानाची तुलना थेट दहशतवादी ओसामा बिन लादेनशी केली. मायकल रुबिन म्हणाले, "आसिम मुनीर यांची भाषा आम्हाला ओसामा बिन लादेनच्या भाषणांची आठवण करून देते. पाकिस्तानला दिलेला 'प्रमुख गैर-नाटो सहयोगी' देशाचा दर्जा तात्काळ काढून घ्यावा आणि त्याला 'दहशतवादाला पुरस्कृत करणाऱ्या देशांच्या यादीत टाकावे."

रुबिन यांच्या मते, पाकिस्तान हा पहिला गैर-नाटो सहयोगी देश ठरेल, ज्याला 'दहशतवादाला पुरस्कृत करणारा देश' म्हणून सूचीबद्ध केले जाईल. तसेच, पाकिस्तानने आता अमेरिकेच्या सेंट्रल कमांडचे सदस्य राहू नये.

# सायकलवरून जग जिंकणारी वेदांगी

जगात अशा अनेक व्यक्ती आहेत कि ज्यांना आपल्या कर्तृत्वाने जग जिंकावे असे वाटते. परंतु हेच जग चक्क सायकलस्वारी करून जिंकावे अशी आगळीवेगळी महत्वाकांक्षा मात्र पुण्यातील वेदांगी नावाच्या मुलीने मनात बाळगली आणि सायकलस्वारीचा छंद जोपासत तिने खरोखरच जगाची सफर सायकल चालवून पूर्ण केली आहे. चक्क सायकलवरून जगाची भ्रमंती करण्याचा विक्रम जगात केवळ पुण्यातील वेदांगी कुलकर्णीच्याच नावे आहे. वेदांगीने १५९ दिवसात तब्बल २९ हजार किलोमीटर अंतर सायकलवरून पार केले आहे. ऑस्ट्रेलियाच्या पर्थ शहरातून १७ जुलै रोजी जग भ्रमंतीला तिने सुरवात केली. आणि तब्बल १५९ दिवस १४ वेगवेगळ्या देशातून भ्रमन्ती सायकलवरून करत तिने हे यश संपादन केले आहे. अर्थात तिचा हा प्रवास तितका सोपा नक्कीच नव्हता.



**मुलखावेगळी माणसं**

जगाच्या या भ्रमंतीत अनेक प्रकारची स्थळ लागणार,अनेक प्रकारची माणस भेटणार,कुठे काय होईल याची शाश्वती नसताना देखील वेदांगीच्या आईवडिलांनी तिला जगाच्या भ्रमंती याकरिता परवानगी दिली. वेदांगी स्पेन मधून सायकल चालवत असताना तिला दोन चोर भेटले. तिच्याकडे पैसे मागण्यासाठी त्या चोरांनी झटापट देखील केली. मात्र त्या चोरांशी दोन हात करत,तिथल्या स्थानिक भाषेवर मात करत पोलिसांच्या मदतीने वेदांगीने आपली सुटका करून घेतली. वेदांगीने अशा प्रकारचे साहस करायला सुरवात केली तेंव्हा तिला अनेक गोष्टी माहित नव्हत्या. ती इंग्लडला शिकायला गेली तेंव्हा त्यांची भाषा,उच्चार येत नव्हते. त्यांचे वाहतुकीचे नियम देखील माहित नव्हते. ती राईडला जायची तेंव्हा रात्री अनोळखी लोकांचा दरवाजा ठोठावून त्यांच्याकडे राहायची. कधी चर्चयार्ड मध्ये किंवा अगदी पेट्रोल पंपावर देखील तिने या प्रवासात मुक्काम केला आहे. रस्त्यात जे मिळेल ते ती खायची. तिने हा प्रवास खूप कमी पैशामध्ये केला आहे. तिच्या या राईडला १० प्रयोजकांनी पैसे पुरविले आहेत . त्यामुळे कमीत कमी पैशामध्ये जास्तीत अंतर गाठणे हे तिचे ध्येय होते. जग जाणून घ्यायचे हेच तिचे मुख्य भांडवल होते .

पुण्यातील पिंपरी चिंचवड मध्ये १२ वी पर्यंतचे शिक्षण वेदांगीने घेतले. त्यानंतर युके मध्ये पुढील शिक्षण घेण्यासाठी वेदांगी गेली. तिथेच तिच्या मनात जग भ्रमंतीचा विचार आला ,आणि तिने आपल्या जिद्दीच्या,आत्मविश्वासाच्या जोरावर हा प्रयत्न पूर्ण करून जागतिक विक्रम पूर्ण केला. या प्रवासादरम्यान ती मोबाईल च्या मध्यमातून सातत्याने आपल्या आईवडिलांच्या संपर्कात होती. या प्रवासात वेदांगीनेऑस्ट्रेलिया,भारत,न्यूझीलंड,कॅनडा,पोर्तुगाल,स्पेन,जर्मनी,डेन्मार्क,स्वीडन,इंग्लंड अशा एकूण १४ देशांची भ्रमंती केली आहे. आशियातील पहिली जगभ्रमंती करणारी वेदांगी जगात चौथी ठरली आहे. हे यश वेदांगीने या प्रवासात तिला मदत करणाऱ्या तमाम लोकांना समर्पित केले आहे . हा प्रवास करताना प्रत्येक देशाचा व्हिसा मर्यादित असल्याने कमीत कमी वेळेत तिने जास्तीत जास्त अंतर कापण्याचा प्रयत्न केला. त्याच वेळी फिटनेस,योगासन,व्यायाम करून तिने हे अभूतपूर्व यश प्राप्त केले आहे. वेदांगीच्या या सायकलवरून जगभ्रमंती सारखया धाडसी वृत्तीची,चिकाटीची आणि मेहनतीची नोंद भारतीयच नव्हे तर जगभरच्या माध्यमांनी घेतली. सर्वात महत्वाचं म्हणजे वेदांगीची हि कामगिरी पाहून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपल्या मन कि बात या कार्यक्रमात तिचे मनभरून कौतुक केले. एकूणच, प्रचंड आत्मविश्वास,जिद्द आणि त्याला मेहनतीची जोड असली कि वेदांगी सारखी रणरागिणी आपलं कर्तृत्व जगभरात गाजवू शकते हेच सिद्ध होत.

**लोकमानस**

# जीपचे सुरत लाँचनंतर गुजरातमध्ये दुसरे स्टेलँटिस ब्रँड हाऊस

भारतात ग्राहकांची सुलभता आणि ब्रँड पोहोच वाढवण्याच्या आपल्या वचनावर पाऊल ठेवत, स्टेलँटिस इंडियाने गुजरातमध्ये दुसरे स्टेलँटिस ब्रँड हाऊस (SBH) लाँच करून पश्चिम भारतात आपली उपस्थिती आणखी वाढवली आहे, सुरतमध्ये या स्वरूपाच्या यशस्वी पदार्पणानंतर. अहमदाबाद येथील सुविधा जागतिक स्तरावर प्रशंसित जीप® आणि सिट्रोएन ब्रँड्सना एकाच छताखाली एकत्र आणते, ज्यामुळे ग्राहकांना एक अखंड भौतिक किरकोळ विक्रीचा अनुभव मिळतो.सरखेज-गांधीनगर महामार्गावर धोरणात्मकदृष्ट्या स्थित, नवीन शोरूम एक तल्लीन करणारे, भविष्यातील ब्रँड वातावरण प्रदान करते. अहमदाबादमधील स्टेलांटिस ब्रँड हाऊसमध्ये ग्रँड चेरोकी, रँग्लर, मेरिडियन आणि कंपाससह जीप® एसयूव्हीची संपूर्ण श्रेणी प्रदर्शित केली जाते, तसेच सिट्रोएनच्या बेसाल्ट, ई-सी३, सी३, सी५ एअरक्रॉस आणि सी३ एअरक्रॉस यासारख्या विशिष्ट ऑफरिंग्ज देखील आहेत. ग्राहक आता एकाच, एकत्रित जागेत दोन्ही ब्रँड एक्सप्लोर करू शकतात, कस्टमाइझ करू शकतात आणि अनुभवू शकतात जे विक्री आणि विक्रीनंतरच्या सेवांमध्ये सुसंगतता सुनिश्चित करते.स्टेलांटिस इंडियाचे ऑटोमोटिव्ह ब्रँड्सचे व्यवसाय प्रमुख आणि संचालक कुमार प्रियेश म्हणाले: "अहमदाबादचे ऑटोमोटिव्ह लँडस्केप उत्साही आणि वाढत्या प्रमाणात आहे, ज्यामुळे ते आमच्या पुढील स्टेलांटिस ब्रँड हाऊससाठी योग्य स्थान बनले आहे. ही ड्युअल-ब्रँड सुविधा आजच्या ग्राहकांच्या विकसित होत असलेल्या पसंतींना पूर्ण करण्यासाठी डिझाइन केली आहे, जी दोन प्रीमियम ब्रँडची सुविधा, एक अखंड भौतिक अनुभव आणि जागतिक दर्जाची सेवा देते - सर्व एकाच ठिकाणी. हे भारतात एक मजबूत, एकीकृत रिटेल पाऊलखुणा निर्माण करण्यासाठी आमची सततची वचनबद्धता प्रतिबिंबित करते."



**चलती का नाम गाडी**

# राज्यातील कबुतरखान्याच्या वादावर तोडगा काय?

**माझं मत**

**१] जयंत माईणकर [पत्रकार ]**

मागील काही दिवसापासून राज्यात विशेषतः मुबईतील कबुतरखान्याचा वाद जो चिघळला आहे आणि त्याला आता आक्रमक रूप प्राप्त झालेलं आहे हा निव्वळ राजकीय स्टंट बाजीचा प्रकार आहे असं वाटत. मुळात कबुतर खाण्यामुळे या कबुतरांच्या विष्ठेमुळे, उडणाऱ्या पंखांमुळे दमेकरी लोकांची संख्या वाढतेय आणि क्षयरोगासारखा आजार देखील वाढतोय. हेच गंभीर कारण लक्षात घेऊन सामाजिक हिताच्या दृष्टिकोनातून उच्च न्यायालयाने अशा प्रकारची कबुतर खाणे बंद करावीत आणि या कबुतरांना दाना पाणी घालू अन्य असे आदेश दिलेले असताना देखील काही लोक जैन समाजाला पुढे करून हे प्रकरण वाढवीत आहेत. कबुतर हा पक्षी आहे त्याला इतर पक्षांप्रमाणेच मुक्त फिरू द्यावे.

**२] सुमित कोठारी [ संघटक जैन समाज ]**

जैन समाजाची पूर्वापार श्रद्धा आहे कि पशु आणि पक्षांना भूतदया दाखवून त्यांना अन्न पाणी द्यावे. त्यामुळेच मागील अनेक वर्षांपासून मुंबई सह इतर जिल्ह्यांमध्ये देखील जैन मंदिरांच्या आसपास कबुतर खाणे आहेत आणि गाई देखील पाळण्याची प्रथा आहे. मात्र अनेक वर्षा नंतर आताच अचानक कबुतरामुळे दमा आणि क्षय रोग होतो असा शोध काही लोकांना लागला आणि कोर्टाने देखील त्याला दुजोरा दिला. स्वाभाविक पणे यामुळे जैन समाजाच्या भावना दुखावणारच. माझे म्हणणे असे आहे कि जिथे लोकवस्ती नसेल अशा भागात कबुतर खाणे बनवावेत आणि पर्यायी जागा द्यावी म्हणजे लोकांना आजार होणार नाहीत आणि जैन समाजाच्या श्रद्धांची देखील पायमल्ली होणार नाही.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# देशातील ६ हजार रेल्वे स्थानकांवर मोफत वाय-फाय सेवा

**नवी दिल्ली, दि. १२ वृत्तसंस्था**

भारतीय रेल्वेने प्रवाशांच्या सोयीसाठी आता देशभरातील तब्बल ६,११५ रेल्वे स्थानकांवर हायस्पीड वायफाय इंटरनेट कनेक्शनची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. भारतीय रेल्वेच्या या सुविधेमुळे प्रवाशांना प्रवासादरम्यान इंटरनेट वापरणं सोप होणार आहे. त्यामुळे रेल्वे स्थानकांवर वायफाय वापरून अनेक प्रवाशी इंटरनेट संबंधित त्यांची कामे सहज करू शकणार आहेत.




भारत सरकारच्या डिजिटल इंडिया या कार्यक्रमाच्या उद्देशाने देशभरातील ६,११५ रेल्वे स्थानकांवर भारतीय रेल्वे मोफत वाय-फायची सुविधा देत आहे. भारतीय रेल्वेमधील अनेक रेल्वे स्थानकांवर सध्या ४ जी आणि ५ जी वाय-फाय सेवा दिली जाते. या नेटवर्कचा वापर प्रवाशांकडून डेटा कनेक्टिव्हिटीसाठी केला जातो. दरम्यान, खासदार स्वाती मालीवाल यांनी मोफत वाय-फाय सेवा देण्यात येत असलेल्या एकूण रेल्वे स्थानकांच्या संख्येबाबत प्रश्न उपस्थित केला होता. त्यांच्या या प्रश्नाला उत्तर देताना रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या संदर्भातील माहिती दिली. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.

भारतातील काही प्रमुख रेल्वे स्थानके आहेत, त्या ठिकाणी मोफत वाय-फाय सेवा उपलब्ध आहे. यामध्ये हजरत निजामुद्दीन, आनंद विहार टर्मिनल, नवी दिल्ली, दिल्ली जंक्शन, सुरत, अहमदाबाद, वडोदरा, राजकोट, अंबाला कॅन्ट जंक्शन, कर्नाल, पानिपत, रोहतक, गुडगाव, सोलन, शिमला, जम्मू तवी, श्री माता वैष्णो देवी कटरा, रांची, धनबाद जंक्शन, मंगळूर सेंट्रल, यशवंतपूर, बांगरपेट, धारवाड, एर्नाकुलम जंक्शन, कोझिक्कोडे, तिरुवनंतपुरम सेंट्रल, पुणे सेंट्रल, भोईन, मुंबई, भोईपॉलम सेंट्रल भुवनेश्वर, पुरी, कटक, राउरकेला, संबलपूर, अमृतसर, जालंधर शहर, लुधियाना, चेन्नई सेंट्रल, काचेगुडा, हैदराबाद, सिकंदराबाद जं, अलाहाबाद, गोरखपूर जं., मुरादाबाद, गाझियाबाद, मुझफ्फरनगर, मेरठ सिटी, सियालदह, खरगपूर, जं., बरदह, खरगपूर, जं., बरदहाबाद, बरड, खरगपूर या रेल्वे स्थानकांचा समावेश आहे.

# अमेरिका-चीन व्यापार युद्धाला ९० दिवसांचा ब्रेक

**वॉशिंग्टन, दि. १२ वृत्तसंस्था**



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनसोबतचा व्यापार संघर्ष टाळण्यासाठी आयात शुल्कावरील सवलतीला आणखी ९० दिवसांची मुदतवाढ दिली आहे. यामुळे जगातील या दोन सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांमधील संभाव्य जकात युद्ध १० नोव्हेंबरपर्यंत टळले आहे. चीनच्या वाणिज्य मंत्रालयानेही अमेरिकन वस्तूंवरील अतिरिक्त शुल्क ९० दिवसांसाठी स्थगित करणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

ट्रुथ सोशलवरील एका पोस्टमध्ये ट्रम्प यांनी लिहिले की, "मी नुकतेच एका कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी केली आहे, ज्यामुळे चीनवरील शुल्क स्थगितीला आणखी ९० दिवसांची मुदतवाढ मिळेल. करारातील इतर सर्व घटक पूर्वीप्रमाणेच राहतील." यापूर्वी, बीजिंग आणि वॉशिंग्टन यांच्यातील शुल्क सवलतीची मुदत १२ ऑगस्ट रोजी संपणार होती. गेल्या महिन्यात स्टॉकहोममध्ये अमेरिका आणि चीनच्या व्यापार अधिकाऱ्यांमध्ये झालेल्या चर्चेनंतर ही मुदतवाढ अपेक्षित होती. जर ही मुदतवाढ मिळाली नसती, तर एप्रिलमध्ये व्यापार संघर्षाच्या वेळी दिसलेल्या उच्चांकी पातळीवर अमेरिकेने चिनी वस्तूंवरील आयात शुल्क पुन्हा लागू केले असते. या दोन्ही देशांनी मे महिन्यात जिनिव्हा येथे झालेल्या चर्चेनंतर ९० दिवसांसाठी बहुतेक शुल्क स्थगित करण्यास सहमती दर्शवली होती.

या निर्णयामुळे जागतिक बाजारपेठेला हादरा देणारा तणाव वाढण्याची भीती तूर्तास कमी झाली आहे. या वर्षाच्या सुरुवातीला, अमेरिकेने चिनी आयातीवरील शुल्क १४५% पर्यंत वाढवल्याने व्यापार संघर्ष अधिक तीव्र झाला होता. याला प्रत्युत्तर म्हणून चीनने अमेरिकन उत्पादकांसाठी महत्त्वाच्या असलेल्या 'रेअर अर्थ' खनिजांच्या निर्यातीवर निर्बंध घातले होते. मे महिन्यात झालेल्या ९० दिवसांच्या मूळ करारानुसार, अमेरिकेने चिनी वस्तूंवरील शुल्क ३०% पर्यंत कमी केले होते, तर चीनने अमेरिकन उत्पादनांवरील शुल्क १०% पर्यंत कमी करून 'रेअर अर्थ मॅग्नेट'ची निर्यात पुन्हा सुरू केली होती.

# 'आशिया कप' साठी टीम इंडियात मोठे बदल अटळ

**मुंबई, दि. १२ प्रतिनिधी**

आशिया चषक २०२५ स्पर्धेला पुढील महिन्यात, म्हणजेच सप्टेंबरपासून सुरुवात होणार आहे. या स्पर्धेचे वेळापत्रक यापूर्वीच जाहीर झाले असून, सहभागी संघांनी आपापल्या तयारीला सुरुवात केली आहे. भारतीय संघ सध्या विश्रांतीवर आहे. ते थेट आशिया चषक स्पर्धेतच मैदानावर उतरतील. अशा परिस्थितीत, या स्पर्धेसाठी निवडण्यात येणाऱ्या भारतीय संघात कोणकोणत्या खेळाडूंचा समावेश असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

यंदाची आशिया चषक स्पर्धा टी-२० स्वरूपात खेळवली जाणार आहे. सध्या भारतीय टी-२० संघाचे कर्णधारपद सूर्यकुमार यादव सांभाळत आहेत, त्यामुळे या स्पर्धेतही त्यांच्याकडेच नेतृत्व कायम राहण्याची दाट शक्यता आहे. दरम्यान, एक महत्त्वाची घडामोड म्हणजे, मागील काही काळापासून टी-२० संघातून बाहेर असलेल्या शुभमन गिलचे संघात पुनरागमन होऊ शकते. सलामी फलंदाजीसाठी तो एक उत्तम पर्याय ठरू शकतो अशी जोरदार चर्चा सुरू आहे.

यापूर्वी खेळल्या गेलेल्या आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यात अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसन यांनी भारतासाठी सलामीची जबाबदारी सांभाळली होती. अभिषेक शर्मा सध्या टी-२० क्रमवारीत अव्वल स्थानी आहे. त्याला संघातून वगळण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यामुळे, त्याच्यासोबत सलामीवीराची भूमिका कोण पार पाडतो, हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल.

सूर्यकुमार यादव, शुभमन गिल आणि अभिषेक शर्मा यांच्या व्यतिरिक्त संजू सॅमसन याचेही संघातील स्थान निश्चित मानले जात आहे. यष्टीरक्षक-फलंदाज म्हणून त्याला पहिली पसंती दिली जाईल. दुसऱ्या यष्टीरक्षकाच्या जागेसाठी जितेश शर्मा आणि ध्रुव जुरेल यांच्यापैकी एकाचा समावेश केला जाऊ शकतो.

मधल्या फळीत अष्टपैलू खेळाडू म्हणून हार्दिक पंड्या, तिलक वर्मा, शिवम दुबे, अक्षर पटेल आणि वॉशिंग्टन सुंदर यांना स्थान मिळू शकते. गोलंदाजीचा विचार केल्यास, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव, अर्शदीप सिंग आणि हर्षित राणा हे संघात खेळताना दिसू शकतात. विशेष म्हणजे, बऱ्याच काळापासून एकही आंतरराष्ट्रीय टी-२० सामना न खेळलेल्या जसप्रीत बुमराह याचाही संघात समावेश केला जाण्याची शक्यता आहे. निवड समिती त्याच्या नावाचा विचार करते का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
**Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219**

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. **संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219**